सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | गुरुवार, १५ मे २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक १८६ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



प्रत्येक श्रेष्ठ पुरुषाच्या लेखनाचा व भाषणाचा आढावा घेतला, तर असे ध्यानात येते की, केवळ विशुद्ध साहित्यिकांची गोष्ट सोडून दिल्यास, कृतिवीर पुरुषाच्या प्रतिपादनातील काही भाग त्रिकालाबाधित सत्य अशा स्वरूपाचा असतो व काही भाग केवळ तात्कालिक महत्त्वाचा- प्राप्त परिस्थिती, श्रोतृवर्ग यांना ध्यानात घ्यावे लागल्यामुळे एक प्रकारे प्रतिक्रियात्मक स्वरूपाचा असतो. गीतेचे अध्ययन न करता फुटबॉल खेळण्याचा स्वामी विवेकानंद यांनी केलेला उपदेश चिरंतन सत्याच्या श्रेणीत मानता येत नाही.

**- दत्तोपंत ठेंगडी,**
भारतीय मजदूर संघ, भारतीय किसान संघ, स्वदेशी जागरण मंचाचे संस्थापक

# ३१ नक्षलवाद्यांचा खात्मा

## १५० हून अधिक बंकर नष्ट, छत्तीसगडमधील करेगुट्टा जंगलातील कारवाई

**सुकमा, १४ मे**

छत्तीसगड-तेलंगणा सीमेवरील करेगट्टाच्या जंगलात आणि टेकड्यांवर सतत २१ दिवस मोहीम राबवत सुरक्षा दलाने ३१ नक्षल्यांचा खात्मा केला. मारल्या गेलेल्यांमध्ये १६ महिलांसह कुख्यात नक्षल्यांचादेखील समावेश आहे. पाच हजार जवानांनी या भागाला घेराव घातला होता. यावेळी त्यांची १५० हून अधिक बंकर आणि चार शस्त्रास्त्र ठेवण्याची ठिकाणे उद्ध्वस्त केली आणि मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा आणि दारूगोळा जप्त केला.

केंद्रीय राखीव पोलिस दल अर्थात् सीआरपीएफचे महासंचालक जी.पी. सिंह आणि छत्तीसगडचे पोलिस महासंचालक अरुण देव गौतम यांनी बुधवारी घेतलेल्या संयुक्त पत्रपरिषदेत माहिती देताना सांगितले की, करेगुट्टा हा नक्षल्यांचा गड मानला जायचा. कठीण भौगोलिक परिस्थिती असूनही करेगुट्टा टेकडीवर मागील २१ दिवसांपासून सुरक्षा दलाने मोहीम राबविली. यात सीआरपीएफ, नक्षल विरोधी अभियान पथक आणि स्थानिक पोलिस यांच्यासह पाच हजारपेक्षा अधिक जवान सहभागी झाले होते. या कारवाईत राज्य पोलिसांनी केंद्रीय दलाच्या सहकार्याने ३१ नक्षलवाद्यांना ठार मारले आहे. यापैकी २८ जणांची ओळख पटली आहे, तर इतर तिघांची ओळख अद्याप पटलेली नाही. मारल्या गेलेल्या माओवाद्यांवर १.७२ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. मारल्या गेलेल्या नक्षलवाद्यांमध्ये दोघे अतिशय खास आणि विभागीय पातळीचे होते.



नक्षलवाद्यांकडून जप्त करण्यात आलेली शस्त्रे

### डोंगरावर हेलिपॅड तयार

२१ एप्रिल ते ११ मेपर्यंत राबविण्यात आलेल्या मोहिमेत नक्षल्यांसोबत २१ चकमकी झडल्या. बुधवारपर्यंत ३१ मृतदेह ताब्यात घेण्यात आले. तपासात आढळून आले की, मृतदेह पीएलजीए बटालियन क्रमांक १, तेलंगणा राज्य समिती आणि दंडकारण्य विशेष विभागीय समिती आणि प्रतिबंधित सीपीआय (माओवादी) संघटनेतील नक्षल्यांचे होते. मारल्या गेलेल्या पीएलजीएच्या नक्षल्यांच्या शिरावर १.७२ कोटींचे बक्षीस होते. मोहीम यशस्वी करण्यासाठी करेगुट्टा येथील डोंगरावर हेलिपॅडची निर्मिती करण्यात आली होती. *(वृत्तसंस्था)*

### एसएलआर रायफल्स ४५० आयईडी जप्त



या कारवाईत ३५ पेक्षा अधिक विविध प्रकारचे शस्त्रे, एसएलआर रायफल्स, ८१८ बीजीएल शेल, एक स्नायफर रायफल, डेटोनेटर, ऑटोमॅटिक शस्त्रे, ४५० आयईडीसह वैद्यकीय उपकरणेदेखील जप्त केली आहे. यावेळी माओवाद्यांच्या पायाभूत सुविधा उद्ध्वस्त करण्यात आल्या. या कारवाईदरम्यान सुरक्षा दलांचे १८ जवान जखमी झाले असून त्यांच्यावर रायपूर येथील रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे पोलिस महासंचालक अरुण देव गौतम यांनी सांगितले.

# मोफत वाळूची रॉयल्टी मिळणार आता घरपोच

- महसूलमंत्री बावनकुळे यांचे निर्देश
- आठ दिवसांत रॉयल्टी घरपोच न मिळाल्यास तहसीलदार जबाबदार

**मुंबई, १४ मे**

घरकुल बांधकाम करणाऱ्या लाभार्थींना जवळच्या वाळू डेपोधून वाळू देण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांच्या माध्यमातून घरपोच रॉयल्टी पावती द्यावी असे आदेश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यासाठी ३0 लाख घरकुले दिली आहेत.

या घरकुलांना मोफत वाळू देण्याचे धोरण राज्य सरकारने स्वीकारलेले आहे. मात्र, या घरकुलांना वाळू मिळत नसल्याच्या तक्रारी येत आहेत. यासाठी तहसीलदारांनी गटविकास अधिकारी यांची मदत घेऊन ग्रामविकास अधिकाऱ्यामार्फत सर्व घरकुल लाभार्थींना घरपोच वाळू रॉयल्टीची पावती पोहच करणे आवश्यक आहे. याची नोंदही ठेवण्यात यावी. यासाठी जिल्हाधिकारी यांनी पालकमंत्र्यांसोबत तर तहसिलदारांनी आमदारांसोबत बैठक घेऊन त्यांच्या मागणीनुसार वाळूची निर्गती करणे आवश्यक आहे, असे बावनकुळे म्हणाले.

अधिकाऱ्यांनी आपल्या कामात कुठेही चूक करता कामा नये. महसूल संदर्भात यावेळी होणाऱ्या पावसाळी अधिवेशनात एकही तक्रार येता कामा नये. तक्रार आली तर अधिकाऱ्यांवर कारवाई करावी लागेल. वाळू निर्गती धोरणाच्या अं लबजावणीबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मंत्रालयातील दालनात वित्त व नियोजन, मदत पुनर्वसन राज्यमंत्री आशिष जैस्वाल, आमदार आशिष देशमुख, महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजेशकुमार यांच्या उपस्थितीत बैठक झाली. कृत्रिम वाळूबाबतही धोरण आले असून, जिल्ह्यात आता ५0 ठिकाणी नवीन क्रशरला परवानगी द्यावयाची आहे.

# फॉक्सकॉन प्रकल्प होणार उत्तर प्रदेशात

**नवी दिल्ली :** केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी उत्तर प्रदेशातील जेवर येथे ३,७0६ कोटी रुपयांच्या सेमीकंडक्टर अर्थात अर्धसंवाहक प्रकल्प उभारण्यास मान्यता दिली आहे. सुरुवातीला महाराष्ट्र आणि त्यांनतर गुजरातमध्ये जाणारा अर्धसंवाहक निर्मिती प्रकल्प अखेर उत्तर प्रदेशच्या पारड्यात पडला आहे. एचसीएल- फॉक्सकॉन यांच्या संयुक्त उपक्रमाद्वारे मोबाईल फोन, लॅपटॉप आणि ऑटोमोबाईल्ससाठी डिस्प्ले ड्रायव्हर चिप तयार करणार आहेत. या प्रकल्पामध्ये दरमहा २0,000 सेमीकंडक्टर वेफर्स हाताळण्याची क्षमता असेल.

# बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याची घोषणा

- बंडखोरांनी भारतासह जगाला मागितला पाठिंबा, जनता रस्त्यावर

**क्वेट्टा, १४ मे**

पाकिस्तानातील सर्वात मोठा प्रांत असलेला बलुचिस्तान जनता रस्त्यावर उतरली आहे. हा प्रांत स्वतंत्र झाल्याची घोषणा ज्येष्ठ बलुच नेते मीर यार बलोच यांनी बुधवारी केली आहे. बलुचिस्तानला स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा देण्याची मागणी मीर यांनी भारताकडे केली आहे. बलुचिस्तानचा बहुतांश भाग बलुच लिबरेश आर्मीच्या ताब्यात आहे.



आम्ही आमचा संकल्प पूर्ण केला असून बलुचिस्तानच्या लोकांनी त्यांचा निर्णय दिला आहे. बलुचिस्तान आता पाकिस्तानचा भाग राहिलेला नाही. आम्ही भारतासह जगाला आवाहन करतो, की त्यांनी बलुचिस्तानला स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता द्यावी, असे अशी पोस्ट मीर यार बलोच यांनी बुधवारी त्यांच्या समाज माध्यम केली. बलोच यांनी पोस्टमध्ये म्हटले की, बलुचिस्तान वेगळा झाला असून आम्ही आमच्या देशाचा नकाशा जाहीर केला आहे. बलुचिस्तानी लोकांनी स्वतंत्र राष्ट्र घोषित केले आहे. जगाने आम्हाला साथ द्यावी आणि बलुचिस्तानला स्वतंत्र राष्ट्राचा दर्जा द्यावा. अनेक दशकांपासून सुरू असलेला हिंसाचार, नागरिकांचे अपहरणे करणे आणि मानवी हक्कांचे उल्लंघन याविरोधात नागरिकांनी लढा दिला. बीएलए आणि नागरिकांनी पोलिस ठाणे, शासकीय इमारती आणि सैन्य तळांवर ताबा मिळविला आहे.

# पुणे, मुंबईत १० कोटींचे अमंली पदार्थ जप्त

पुणे : महसूल गुप्तचर संचालनालयाने पुणे विमानतळावर व मुंबईत सुमारे १0.३ कोटी रुपयांचे चरससह अंमली पदार्थ जप्त केले आहेत. या प्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे, असे अधिकाऱ्यांनी मंगळवारी सांगितले. गुप्त माहितीच्या आधारे डीआरआयच्या मुंबई क्षेत्रीय विभागाने सोमवारी बँकॉकहून पुण्यात उतरलेल्या दोन प्रवाशांना ताब्यात घेतले. पुणे विमानतळावर व मुंबईत सुमारे १0.३ कोटी रुपयांचे चरससह अंमली पदार्थ जप्त केले आहेत.

# पाण्यासाठी पाकिस्तानची भारताला विनवणी

**इस्लामाबाद :** भारताच्या लष्करी कारवाईमुळे दबावाखाली आलेल्या पाकिस्तानने पुन्हा भारताकडे सिंधू जल वाटप करार सुरू करण्याची विनंती केली आहे. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने हा करार स्थगित केला होता. पाकिस्तानच्या जलसंपदा मंत्रालयाचे सचिव सय्यद अली मुर्तजा यांनी भारताच्या जल शक्ती मंत्रालयाच्या सचिवांना पत्र लिहून, भारताने घेतलेल्या निर्णयाचा पुनर्विचार करावा, अशी मागणी केली.



## महत्त्वाचे...



### दहावी परीक्षेत कोठारी प्रशालेचे यश

**सोलापूर, दि. १४ मे-**

संन्मती ज्ञान प्रसारक मंडळ संचलित श्री नवलबाई फुलचंद शहा कोठारी हायस्कूलचा निकाल ७३.०६ टक्के टक्के लागला आहे. प्रशालेतून अनुक्रमे प्रथम क्रमांक फातिमा आसिफ (९४.६०टक्के), द्वितीय क्रमांक राणी पुजारी (८५टक्के) तर तृतीय मुदसर नदाफ (७७ टक्के) पटकावले आहेत. एकूण विशेष प्राविण्यासह ५, प्रथम श्रेणीत १८, तर द्वितीय श्रेणी २६, उत्तीर्ण श्रेणीत १६ विद्यार्थी आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष सूर्यकांत शहा, सचिव अजितनाथ उपाध्ये, मुख्याध्यापक रमेश यादवाड यांनी केले.




### व्हॅलेंटाईन सर्कल स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के

**सोलापूर, दि. १४ मे-**

व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के निकाला असून प्रशालेतील एकूण ९९ विद्यार्थी एसएससीच्या बोर्डच्या परिक्षेस प्रविष्ट झाले होते. श्रेया लाकडे हिने ९६.४० टक्के मार्क घेऊन प्रथम क्रमांक तेजस्वीनी दुर्गम ९६.२० टक्के घेऊन द्वितीय क्रमांक तसेच उदयकिरण कोंडले यांनी तृतीय क्रमांक पटकावला आहे.तसेच कोमल पेगडा हिने संस्कृत विषयात १०० पैकी १०० गुण मिळविले आहेत.२० विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविले आहे. ६० विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यसह आणि ३३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. सन २०२४-२५ चालू शैक्षणिक वर्षामध्ये क्रीडा स्पोर्ट्स विभागाकडून एसएससी बोर्डाला त्यांना १० मार्क वाढवून देण्यात आली आहे. प्रशालेतील ७ विद्यार्थ्यांना जिल्हा स्तरावर तृतीय क्रमांक पटकाविलेल्या व राज्यस्तरावर ४० तर एकूण ४७ विद्यार्थी सहभागी झालेल्या होते. या विद्यार्थ्यांना क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील व शिवाजी आवताडे व लावण्या दुस्सा यांचे मार्गदर्शन लाभले आहे. यशस्वी विद्यार्थांचे मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी, उपमुख्याध्यापिका मीना दुधनीकर, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर व नागमणी पेगडा, संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापुरे, उपाध्यक्ष यमूना दिड्डी, सचिव संतोष गड्डम व उपसचिव नागेश शेंडगे यांनी अभिनंदन केले.

### अत्याचार केल्याने अल्पवयीन मुलगी गरोदर

**सोलापूर, दि. १४ मे-**

१४ वर्षे अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याने ती गरोदर राहिल्याचा प्रकार शहर परिसरात उघडकीस आला याप्रकरणी एका विरुद्ध पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी पीडीतेच्या आईने



दिलेल्या तक्रारीवरून गवंडी काम करणाऱ्या रोहित शंकर विटकर (रा. सोलापूर) विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी हा शहरातील एका भागात राहण्याचा आहे. त्याने पिडीता अल्पवयीन असल्याचे माहित असूनही तिच्यावर अत्याचार केला यामध्ये ती गरोदर राहिली. हा प्रकार सप्टेंबर २०२४ पासून सुरू असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. अल्पवयीन पीडिता ही गरोदर असल्याचे माहित होतात तिच्या आईने पोलिसात धाव घेऊन आरोपी विरुद्ध तक्रार दाखल केली. यानंतर पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस करत आहेत.



### ज्योतिषशास्त्री परीक्षेत भास्कराचार्य ज्योतिष मंडळाचे यश

**सोलापूर, दि. १४ मे-**

महाराष्ट्र ज्योतिष परिषद मुंबई यांच्या वतीने माहे फेब्रुवारीमध्ये घेण्यात आलेल्या ज्योतिषशास्त्री पदवी परीक्षेचा निकाल परिषदेच्या वतीने जाहीर करण्यात आलेला आहे. या परीक्षेत सोलापूर येथील भास्कराचार्य ज्योतिष मंडळाने उल्लेखनीय यश संपादन केले असून मंडळाचे १५ विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झालेले आहेत. या विद्यार्थ्यांना मंडळाचे अध्यक्ष तुषार कुलकर्णी, जगदीश कारंजकर, माधव कुलकर्णी, अजिता बोरगावकर, हरेकृष्ण नल्ला, राघवेंद्र अरकाल, सुरेश मोहिते, जे.पी. स्वर्णकार यांचे मार्गदर्शन लाभले. मंडळाच्या परीक्षा विभाग प्रमुख श्रीमती किर्तीलक्ष्मी अत्रे, सचिवा सौ. अंजली लंके, सौ. मधुरा कुलकर्णी, नाना फटाले, सिध्दलिंग बेलपत्रे, गुरुशांतय्या स्वामी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. या परीक्षेत मंडळामध्ये विलास आधेली, संतोष चिनगे, वैशाली नंदर्गी हे अनुक्रमे प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाने विशेष श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. इतर यशस्वी विद्यार्थ्यांत रुपाली साळुंखे, मोहिंदर सादूल, मल्लेशम सामल हे विशेष श्रेणीमध्ये तर नरेश गालपल्ली, विनोद कोंडा, महेश बोडा, वैनतेय जोशी, प्रविण रोंगे, दिपक दुपडे, यश पांडे हे प्रथम श्रेणीत तसेच राजू ताला, महेश मेरगू हे द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. मंडळाच्या या यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व ज्योतिष अभ्यासकांकडून अभिनंदन होत आहे.

# दुचाकीच्या अपघातात येडशीतील तरुणाचा मृत्यू



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

बार्शी येडशी रस्त्यावरील उड्डाणपुलाजवळ दुचाकींच्या समोरासमोर झालेल्या अपघातात येडशी येथील संतोष बद्रीनारायण कासट (वय २५) याचा मृत्यू झाला हा अपघात मंगळवारी रात्री साडेनऊच्या सुमारास घडला.

संतोष हा मंगळवारी रात्री दुचाकी चालवीत येरमाळा येडशी रोडने राहत्या घराकडे येत होता. त्यावेळी बार्शी येडशी उड्डाणपुलाजवळ समोरून आलेल्या दुचाकीची समोरासमोर धडक बसली. यात जखमी झाल्याने संतोषची शुद्ध हरपल्याने त्याला धाराशिव येथील सरकारी रुग्णालयात दाखल केले. त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने बुधवारी दुपारी १२:५५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचाराचा दाखल केले होते. परंतु उपचारापर्वीच तो मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या घटनेची नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.

### मालेगावातील महिलेसह तिघांना अक्कलकोटमध्ये मारहाण

सोलापूर : नासिक जिल्ह्यातील मालेगाव येथील महिलेसह तिघांना अक्कलकोट येथे मारहाण करण्यात आली ही मारहाण मंगळवारी रात्री साडेनऊ वाजता पाटील बालाजी परिसरात झाली. उमेश पंडित साळुंखे (वय ३८ )राहुल बापू साळुंखे (वय ३३) व सुरेखा नरेंद्र साळुंखे (वय ३२ सर्व.रा. मालेगाव जि नाशिक) अशी मारहाण झालेल्या तिघांची नावे आहेत. उमेश आणि राहुल असे दोघे अक्कलकोट येतील हॉटेल बालाजीतून जाताना त्यांनी बहिणीला का छेडता अशी विचारणा केली त्यावेळी तेथे असलेल्या चार ते पाच जणांच्या जमावाने त्यांना



लाकडाने तसेच लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. यात उमेशच्या डोक्याला जखम झाली तर राहुलच्या कपाळाला जखम झाली. तसेच सुरेखा यांच्या डाव्या पायाला आणि कमरेला मार लागल्याने नातेवाईक लक्ष्मण साळुंखे यांनी रात्री ११. ४० वाजता शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल केल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### चिवरी फाट्याजवळ दुचाकी घसरल्याने दोघे जखमी

सोलापूर : चिवरी ते सोलापूर येताना दुचाकीचे चाक घसरून झालेल्या अपघातात दोघे जखमी झाले हा अपघात मंगळवारी सायंकाळी ६:३० च्या सुमारास घडला. मनीषा यशवंत पारुणे




( वय ३०) व अजय राजू खटके ( वय २०, रा संगमेश्वर नगर )अशी जखमी झालेल्या दोघांची नावे आहेत. मंगळवारी सायंकाळी दोघे दुचाकी वर बसून चिवरी येथून सोलापूरच्या दिशेने येत होते. चिवरी फाट्याजवळ असताना दुचाकीचे चाक घसरल्याने दोघे खाली पडल्याने मनीषा हिच्या चेहऱ्याला जखम झाली तर अजय हा दोन्ही हात व पायाला मार लागून जखमी झाला. नळदुर्ग येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार रात्री १०.३० वाजता रुग्णवाहिकेतून शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल करण्यात आले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.



## २५ मे ला पुण्यात डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेचा मेळावा

### राज्य कार्यकारिणी पुण्यातील बैठकीत निर्णय : राजा माने

**पुणे, दि.१४ मे-**

तोंडावर असलेल्या पावसाळ्याच्या व देशातील सद्यस्थितीच्या पार्श्वभूमीवर कोकणातील सावंतवाडी येथे होणारे तिसरे महाअधिवेशन स्थगित केल्या नंतर राज्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांचा महामेळावा येत्या २५ मे २०२५ (रविवार) रोजी आयोजित करण्याचा आज येथे झालेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी राजा माने हे होते. राज्य सचिव महेश कुगावकर, सह सचिव केतन महामुनी,राज्य संघटक शामल खैरनार,राज्य कार्यकारिणी सदस्य दीपक नलावडे,अमोल पाटील हे उपस्थित होते. सतीश सावंत, विकास भोसले, इक्बाल शेख,तेजस राऊत,मुरलीधर चव्हाण तसेच पुणे जिल्हा अध्यक्ष गणेश हुंबे, अजिंक्य स्वामी, संजय भैरे,प्रशांत कटारे, राजाराम मस्के आदी या बैठकीत ऑनलाईन सहभागी झाले. महामेळाव्यात महाराष्ट्र महागौरव पुरस्कारांचे वितरण तसेच पत्रकारांच्या मुला-मुलींच्या कल्याणासाठी स्थापन करण्यात आलेल्या प्रतिबिंब प्रतिष्ठानचे उद्घाटन करण्याचा निर्णय झाला. पुणे येथील कार्यक्रम स्थळ व प्रमुख पाहुण्यांची नावे येत्या दोन दिवसांत जाहीर केली जाणार आहेत.

## तौफिक शेख यांच्यासह कार्यकर्त्यांनी केला अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

### राष्ट्रवादी शहरच्या वतीने जंगी स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मे**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार व प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, राज्याचे क्रीडा व अल्पसंख्याक मंत्री दत्ता भरणे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथे माजी नगरसेवक तौफीक शेख, माजी नगरसेवक इब्राहिम कुरेशी, माजी नगरसेवक वहिदा शेख, माजी नगरसेवक नूतन गायकवाड, माजी नगरसेवक तस्लिम शेख, ॲड वसीम शेख, आसिफ राजे, युनूस शेख, यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत




प्रवेश केला. त्याच पार्श्वभूमीवर सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस च्या वतीने जिल्हाध्यक्ष संतोष पवार व कार्याध्यक्ष जुबेर बागवान पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादीभवन येथे स्वागत सत्कार केला. याप्रसंगी महिला अध्यक्ष संगीता जोगदंडकर, ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, अल्पसंख्यांक राष्ट्रीय सचिव फारुख मटके, प्रकाश जाधव, ओबीसीं प्रवेश उपाध्यक्ष सलीम नदाफ, ओबीसी प्रदेश सरचिटणीस बसवराज बगले आदीसह पदाधिकारी व कार्यकर्त उपस्थित होते

## छत्रपती संभाजी महाराजांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवारतर्फे अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षातर्फे छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६८व्या जयंतीदिनी त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास शहराध्यक्ष सुधीर खरटमल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

इतिहासातून मिळणाऱ्या प्रेरणा या वर्तमानातील परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी आणि भविष्यातील वाटचालीसाठी प्रेरणादायी ठरतात. छत्रपती संभाजी महाराजांसारखे युवकांना प्रचंड प्रेरणादायी ठरतील असे इतिहास पुरुष आपल्याकडे होऊन गेले. आपल्या ३२ वर्षांच्या आयुष्यात त्यांनी हे कार्य उभे केले ते सर्वसामान्य माणसांच्या दैनंदिन जीवनातील सर्वच क्षेत्रांना स्पर्श करून जाणारे आहे. त्यांच्या जगण्या आणि मरण्यातही जो पराक्रमाचा इतिहास आहे तो आजही प्रेरणादायी आहे. मात्र आज त्यांना फक्त ढाल, तलवार आणि धर्माच्या चौकटीतच बंद केलेले दिसते. आज त्यांच्या जयंतीनिमित्त तीच चौकट



मोडून ढाल-तलवारीच्या पलीकडचे छत्रपती संभाजी महाराज समजून घेण्याचा आज आपण सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे असे सुधीर खरटमल म्हणाले.

यावेळी जनरल सेक्रेटरी चंद्रकांत पवार, ज्ञानेश्वर सपाटे,सामाजिक न्याय विभाग प्रदेश चिटणीस प्रवीण वाडे, महिला प्रदेश चिटणीस मनीषा माने, रेखा सपाटे, लता ढेरे, उमा केत, शहर उपाध्यक्ष विजय भोईटे, ओबीसी ऐल अध्यक्ष बिरप्पा बंडगर, सोपान खांडेकर, शहर सरचिटणीस सूर्यकांत शिवशरण, ज्ञानेश्वर सोनवणे, संदीप साळुंखे, रामप्रसाद शागालोलू, सुरेश कुंभार, सोशल मीडिया अध्यक्ष शक्ती कटकधोंड आदी उपस्थित होते.



## पदयात्रेने संभाजी आरमारची संभाजी महाराजांना मानवंदना

**तभा व्रतसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

छत्रपती संभाजी महाराजांच्या ३६८ व्या जयंतीनिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे संभाजी आरमारच्या वतीने संभू प्रेरणा रॅली आयोजित करण्यात आली होती. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक अशी पदयात्रा काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवरायांना अभिवादन करून या रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. ढोली-बाजाच्या गजरात शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज - संभाजी महाराजांच्या जयघोषात सोहळा संपन्न झाला.

छत्रपती संभाजी महाराज चौक येथे संभाजी महाराजांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून रॅलीचा समारोप करण्यात आला. याप्रसंगी बोलताना संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांनी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी आमदार विजयकुमार देशमुख, छत्रपती मुस्लिम ब्रिगेडचे अध्यक्ष मतीन बागवान, संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, प्रदेश संघटक प्रकाश डांगे, सरचिटणीस गजानन जमदाडे, उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, जिल्हाप्रमुख अनंतराव नीळ, साहहरप्रमुख सागर ढगे, शिक्षक संघटना प्रमुख अजिंक्य पाटील, जिल्हा संघटक अमित कदम, उपजिल्हाप्रमुख सागर संगवे, उपशहरप्रमुख राज जगताप, दिव्यांग संघटना प्रमुख वासुदेव होणकोंबडे, महिला आघाडीच्या मनीषा महाडिक, विभागप्रमुख मल्लिकार्जुन पोतदार, गुरुनाथ निंबाळे, प्रा. मल्लिकार्जुन परळकर, तुकाराम जाधव आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खोट्या कागदपत्रांच्या आधारे १ कोटी ९५ लाखांचे कर्ज

## कर्जदाराने जामीनदारांची फसवणूक केल्याप्रकरणी कर्जदार, कर्ज मंजूर करणाऱ्या लोकमंगल मल्टीस्टेटच्या अधिकाऱ्यांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

खोट्या कागदपत्रे व सह्यांच्या आधारे १ कोटी ९५ लाखांची कर्ज घेऊन ते न फेडल्यामुळे ती रक्कम ५ कोटीपर्यंत गेली. ही रक्कम वसुल करण्यासाठी कर्जदार, जामीनदार यांना नोटीस दिल्यानंतर खोट्या कागदपत्रांच्या तसेच बनावट सह्यांच्या आधारे कर्ज घेतल्याचे निष्पन्न झाल्याने जामीनदारांची फसवणुक केल्याप्रकरणी कर्जदार व लोन मंजूर करणारे लोकमंगल मल्टीस्टेटचे अधिकाऱ्यांवर जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत देशी दारूचे विक्रेते विकास विरय्या गुत्तेदार (वय ४३, रा. द लॅण्डमार्क, सिव्हील लाईन, सोलापूर) याच्या फिर्यादीवरुन कुलभूषण वासुदेव उपलप (रा. ७-३, इंदिरा निवास, मोदीखाना, केंद्रीय विद्यालयसमोर, सोलापूर) आणि लोन मंजूर करणारे लोकमंगल मल्टिस्टेट को-ऑप. सोसायटी लि., शाखा मित्रनगर, शेळगी येथील संबंधित अधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विकास गुत्तेदार यांचा देशी दारूचा व्यवसाय असून त्यांचे वडील विरय्या यांनी शिंदी विक्रिच्या व्यवसायासाठी कुलभूषण उपलप यांची मोदी येथील जागा भाड्याने घेतली होती. दहा वर्षापूर्वी उपलप यांनी गुत्तेदार यांस कर्जप्रकरणास जामिनदार होता का असे विचारले होते. त्यावेळी गुत्तेदार यांनी जामिदार होण्यास नकार दिला होता. सुभाष नागनाथ जाधव हे गुत्तेदार यांच्या ओळखीचे असून २५ नोव्हेंबर २०२२ रोजी जाधव यांनी लोकमंगल मल्टिस्टेटकडून नोटीस आल्याचे सांगितले. त्यात कुलभूषण उपलप यांनी त्यांच्या बँकेतून १३ मार्च २०१६ रोजी लँड डेव्हलपमेंट कर्ज म्हणून १ कोटी ९५ लाख रुपयांचे कर्ज घेतलेले आहे, त्यांनी कर्जाची परतफेड केलेली नसल्यामुळे ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी मुद्दल व व्याज मिळून कर्जाची रक्कम ही ४ कोटी ७८ लाख ५२ हजार ७२ रुपये इतकी झालेली असून ही रक्कम १५ दिवसाच्या आत सोसायटीत जमा करा, या कर्जाला कर्जदार उपलप व जामीनदार म्हणून गुत्तेदार व जाधव असे जबाबदार असल्याचे लिहिलेले असल्याचे सांगितले. त्यामुळे गुत्तेदार व जाधव यांनी उपलप यांची भेट घेऊन त्यांच्या कर्ज प्रकरणात जामीनदार म्हणून असल्याबाबत विचारणा केली असता उपलप यांनी जामीनदार म्हणून गुत्तेदार व जाधव यांच्या सह्या स्वतः केलेले आहेत, सोसायटीकडून घेतलेले कर्ज तीन महिन्यात परतफेड करणार असून या कर्जाकरीता त्यांच्या मालकीची वळसंगकर हॉस्पीटलशेजारील २ एकर जागा सोसायटीला गहाणखत करून दिलेले असल्याचे सांगितले. अशाप्रकारे उपलप यांनी गुत्तेदार व जाधव समजूत काढली. त्यानंतरही उपलप यांनी सोसायटीमध्ये कर्जाची रक्कम भरली नाही. त्यामुळे लोकमंगल मल्टीस्टेटकडून उपलप, गुत्तेदार व जाधव यांच्याविरुध्द न्यायालयात ५ कोटी ४ लाख २९ हजार ९०० रुपयांच्या वसुलीसाठी दावा दाखल केला व त्याच्या नोटीसा पाठवून दिल्या.

त्यामुळे गुत्तेदार व जाधव यांनी उपलप यांनी कर्ज घेताना व कर्जाच्या नुतनीकरणाकरीता सोसायटीमध्ये सादर केलेल्या कागदपत्रांच्या नकला मिळविल्या. त्या कागदपत्रांची पाहणी केली असता कर्ज मागणीच्या अर्जामध्ये, जामीनदारच्या फॉर्मवर, हमी पत्रावर, वचन चिठ्ठीवर, अखंडीत जामीन खतावर, मल्टीस्टेटच्या हमी पत्रावर, करारनाम्यावर, हप्तेबंदी करारनामा, करारपत्र अशा सर्व कागदपत्रांवर बोगस सह्या केल्याचे दिसून आले. तसेच जामीनदाराच्या फॉर्मवर गुत्तेदार यांचा फेसबुक अकौंटवरील जुना फोटो लावला. तसेच दोघांचेही सिबील खराब झाल्याने त्यांना कोणतीही बँक कर्ज देण्यास तयार नाही. त्यामुळे गुत्तेदार व जाधव यांनी पोलिस आयुक्त यांच्याकडे तक्रारी अर्ज केला होता. या अर्जावरून उपलप आणि लोन मंजूर करणारे लोकमंगल मल्टिस्टेट को-ऑप. सोसायटी लि., शाखा मित्रनगर, शेळगी येथील संबंधित अधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला असून सहायक पोलिस निरीक्षक पवार पुढील तपास करीत आहेत.




### दुचाकीस्वाराच्या मृत्यू; वाहनाचालकाविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

दुचाकीस्वाराच्या मृत्यूप्रकरणी वाहन चालकाविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उमेश सुधाकर जोशी (वय ५३, रा. जानकी नगर, जुळे सोलापूर) असे मरण पावलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. याबाबत अर्चिता उमेश जोशी (वय ४६, रा. जानकी नगर, जुळे सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन अज्ञात दुचाकी चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १२ मे दुपारी रोजी उमेश जोशी हे त्यांच्या एमएच १३ सीआर ७८६५ क्रमांकाच्या दुचाकीवरून घराकडे जात होते. दुपारी अडीचच्या सुमारास विजापूर रोडवरील सैफुल येथे एमएच १३ ईएन १४४४ क्रमांकाच्या दुचाकीवरील स्वाराने दुचाकी भरधाव चालवून जोशी यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात जोशी गंभीर जखमी होऊन मरण पावले तर धडक देणाऱ्या दुचाकीस्वाराच्या पाठीमागे बसलेले दोघे जखमी झाले. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार घुगे पुढील तपास करीत आहेत.

सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित



# इस्रायलच्या हवाई हल्ल्यात ६० नागरिक ठार

## युद्धबंदीच्या आशा मावळल्या, संयुक्त राष्ट्राने फटकारले, गाझात उपासमारीचे संकट

**◆ देईर अल-बलाह, १४ मे**

ओलिसांची सुटका करण्यासाठी इस्रायलने गाझाच्या विविध भागात हल्ले अधिक तीव्र केले. मंगळवारी मध्यरात्रीनंतर गाझातील जबालिया भागात असलेल्या हमासच्या ठिकाणांवर लक्ष्य करीत केलेल्या हवाई हल्ल्यात ६० नागरिकांचा मृत्यू झाला. यात २२ मुलांचा समावेश आहे. जबालिया येथील इंडोनेशियन रुग्णालयाने मृत्यूच्या आकड्याची पुष्टी केली आहे. गाझाचा मदत पुरवठा रोखल्याने येथील लोकांची उपासमार होत आहे. याची दखल घेत संयुक्त राष्ट्राने इस्रायलला फटकारले.



गाझाच्या उत्तर भागातील जबालियात इस्रायलने केलेल्या हल्ल्यात अख्खी कॉलनीच बेचिराख झाली.

हमासने एका इस्रायली-अमेरिकन ओलिसाची सुटका केल्यानंतर हवाई हल्ले करण्यात आले. यामुळे युद्धबंदीच्या आशा मावळल्या आहे. इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी पुन्हा एकदा स्पष्ट केले की, ओलिसांची सुटका होईपर्यंत गाझामधील युद्ध थांबवू शकत नाही. हमासच्या पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्यासाठी इस्त्रायलच्या लष्कराने जबालियाच्या रहिवाशांना परिसर रिकामा करण्याचा इशारा देण्यात आला होता. विशेष असे की अनेक नागरिकांनी या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले होते. इस्त्रायल लष्कराने हल्ल्यासंदर्भात अधिकृत माहिती दिलेली नाही. मात्र गाझातील आरोग्य विभागाने हा हल्ला इस्त्रायलने केल्याचे सांगितले आहे. हवाई हल्ल्यानंतर या भागातील अनेक इमारती जमीनदोस्त झाल्या, ढिगाऱ्यातून ६० मृतदेह बाहेर काढण्यात आले, यात २२ मुलांचा समावेश असल्याचे गाझाच्या आरोग्य विभागाने सांगितले. यापूर्वी १३ मे रोजी इस्रायलने गाझामधील एका रुग्णालयावर हवाई हल्ला केला, त्यात २८ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी ◀(वृत्तसंस्था)

### गाझा युद्ध कसे सुरू झाले?

२०२३ मध्ये हमासच्या नेतृत्वाखालील अतिरेक्यांनी दक्षिण इस्रायलवर क्षेपणास्त्रांचा वर्षाव केल. त्यांनी इस्रायलमध्ये घुसखोरी केली आणि १,२०० लोकांचा बळी घेतला. याला प्रत्युत्तर म्हणून इस्त्रायलने गाझात असलेल्या हमासच्या ठिकाणांवर हल्ले सुरू केले आहे. गाझाच्या आरोग्य मंत्रालयाच्या मते, इस्रायलच्या प्रत्युत्तराच्या हल्ल्यात ५२,८०० हून अधिक पॅलेस्टिनी मारले गेले आहेत, ज्यात अनेक महिला आणि मुले आहेत. ■

### जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत करा

» इस्रायलने गाझातील जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा जाणूनबुजून रोखल्याची टीका संयुक्त राष्ट्रांचे सर्वोच्च मानवतावादी अधिकारी टॉम फ्लेचर यांनी केली. ते म्हणाले, इस्रायल, इजिप्त आणि जॉर्डनमध्ये अन्नसाठा मुबलक आहे आणि ते गाझापासून फक्त ४० किमी अंतरावर आहे. असे असूनही, गाझाच्या लोकांना उपासमारीचा सामना करावा लागणे अतिशय दुःखद आहे. गाझामध्ये १० आठवड्यांपासून मानवतावादी मदत थांबवल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होत आहे.

### इस्रायलने सर्व आरोप फेटाळले

» इस्रायलच्या संयुक्त राष्ट्रांच्या प्रतिनिधीने टॉम फ्लेचर यांच्या विधानाला उत्तर देत म्हटले की ते हमाससारख्या दहशतवादी संघटनेला फायदा देणारी कोणतीही मानवतावादी व्यवस्था स्वीकारणार नाहीत. हमासने आमच्या नागरिकांची हत्या केली आहे आणि त्यांना पुन्हा शक्तिशाली बनण्याची परवानगी देणारी कोणतीही व्यवस्था आम्हाला नको आहे.

### ५ लाख लोकांची उपासमार

» गेल्या १९ महिन्यांपासून गाझामध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे ५ लाख लोक उपासमारीच्या धोक्यात आहेत. इस्रायलने गेल्या तीन महिन्यांपासून गाझा पट्टीला धान्य पुरवठ्यावर बंदी घातली आहे. यावर संयुक्त राष्ट्रांनी गाझातील परिस्थितीवर एक अहवाल सादर केला. यानुसार, जर इस्रायलने निर्बंध हटवले नाहीत तर गाझामधील प्रत्येक पाच लोकांपैकी एक उपासमारीला बळी पडू शकतो. याशिवाय २१ लाख लोकांना दुष्काळाचा सामना करावा लागू शकतो. ■

# २५ वर्षीय हिंदू मुलीवर मोठी जबाबदारी!

## बलुचिस्तानच्या सहायक आयुक्तपदी नियुक्ती

**◆ चगाई, १४ मे**

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला. तथापि, युद्धबंदीनंतर काही प्रमाणात शांतता दिसून येत आहे. दरम्यान, पाकिस्तानमध्ये एका हिंदू महिलेने असा पराक्रम केला की ते ऐकून सर्वांनाच धक्का बसला. पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतातील कशिश चौधरी यांची बलुचिस्तानच्या सहाय्यक आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



२५ वर्षीय कशिश ही अशांत प्रांतात इतकी मोठी जबाबदारी मिळालेली हिंदू अल्पसंख्याक समुदायातील पहिली महिला आहे. कशिश चौधरी हा चगाई जिल्ह्यातील नोशकी शहरातील रहिवासी आहे. ही कामगिरी करून त्याने इतिहास रचला आहे. कशिशने बलुचिस्तान लोकसेवा आयोग परीक्षा उत्तीर्ण होणे ही केवळ वैयक्तिक कामगिरी नाही तर देशातील अल्पसंख्याक समुदायासाठी आशेचे प्रतीक आहे.

कशिशने एका पाकिस्तानी माध्यमांशी बोलताना सांगितले की, हे यश मिळवण्यासाठी तिने तीन वर्षे सतत अभ्यास केला, ज्यामध्ये तिने दररोज किमान ८ तास तयारी केली. शिस्त, कठोर परिश्रम आणि समाजासाठी योगदान देण्याची इच्छा यामुळे मला या प्रवासात पुढे नेले आहे, असे ते म्हणाले. कशिश तिच्या कठोर परिश्रम आणि समर्पणामुळे सहाय्यक आयुक्त बनली आहे. ◀(वृत्तसंस्था)

### महिला सक्षमीकरणाचे आश्वासन

कशिश आणि तिच्या वडिलांनी क्वेट्टा येथे बलुचिस्तानचे मुख्यमंत्री सरफराज बुगती यांच्याशी झालेल्या भेटीत महिला आणि अल्पसंख्याकांच्या विकासासाठी आणि सक्षमीकरणासाठी काम करण्याचे वचन दिले. बलुचिस्तानचे मुख्यमंत्री सरफराज बुगती म्हणाले की, कशिश हा देश आणि बलुचिस्तानसाठी अभिमानाचे प्रतीक आहे. ■



# कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात ४ मराठी चित्रपटाचे प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई १४ मे :**

सिने जगतातील प्रतिष्ठेच्या कान आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या मार्केट विभागासाठी राज्य शासनाच्या दादासाहेब फाळके चित्रनगरी मार्फत निवडण्यात आलेल्या चार मराठी चित्रपटांचे प्रदर्शन करण्यात येणार आहे.

राज मोरे दिग्दर्शित खालीद का शिवाजी, जयंत सोमळकर दिग्दर्शित स्थळ, गजेंद्र अहिरे दिग्दर्शित स्नो फ्लॉवर, महेश मांजरेकर दिग्दर्शित जुनं फर्निचर या चित्रपटांचा समावेश आहे. या महोत्सवाकरिता शासनाच्या अधिकाऱ्यासह चित्रपटांच्या प्रतिनिधीचा चमू बुधवारी कानला रवाना झाला.

१५ मे रोजी सायंकाळी ६.१५ वाजता पॅलेस सी याठिकाणी स्नो फ्लॉवर या चित्रपटाचे प्रदर्शन होईल तर दुपारी दीड वाजता पॅलेस बी येथे खालीद का शिवाजी, १८ मे रोजी सकाळी ९.१५ वाजता पॅलेस जी येथे जुन फर्निचर आणि दुपारी १.३० वाजता पॅलेस एफ येथे स्थळ या चित्रपटाचे प्रदर्शन होणार आहे. मराठी चित्रपटांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध व्हावे आणि निर्मात्यांना प्रोत्साहन मिळावे याकरिता महाराष्ट्र शासन मागील अनेक वर्षांपासून विविध आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये सहभागी होत आहे.

# काश्मिरात अतिरेकी हल्ल्याचा कट उधळला

## शोपियात ठार झालेल्या ३ दहशतवाद्यांकडून शस्त्रसाठा जप्त

**◆ जम्मू, १४ मे**

भारत-पाकिस्तान युद्धविराम घोषणेनंतर ४८ तासांत दक्षिण काश्मीरातील शोपिया जिल्ह्यातील केलर जंगलात दहशतवादी आणि सुरक्षा जवानांमध्ये चकमक झाली. यात लश्कर-ए-तोयबाच्या कमांडरसह ३ दहशतवाद्यांचा खात्मा झाला. ठार झालेल्या दहशतवाद्यांकडून सुरक्षा यंत्रणांनी मोठा शस्त्रसाठा जप्त केला. या कारवाईमुळे जम्मूत अतिरेकी हल्ल्याचा डाव उधळण्यात जवानांना यश आले. सध्या भारतीय सैन्याने काश्मिरात दहशतवाद्यांविरोधात ऑपरेशन केलर सुरू केले आहे.



दहशतवाद्यांजवळून जप्त केलेला शस्त्रसाठा

सीमेवरील गोळीबार बंद होताच सुरक्षा दलांनी जम्मू काश्मिरात दहशतवाद्यांना ठेचण्याचे काम सुरू केले. त्यात मंगळवारी सकाळी शोपिया जिल्ह्यात दहशतवादी आणि सुरक्षा जवान यांच्यात चकमक झाली. यात लश्कर-ए-तोयबाचा कमांडर शाहीद कुट्टे आणि अदनान शफीसह ३ दहशतवादी मारले गेले. यातील तिसरा दहशतवादी अहसान-उल-हक शेख हा पुलवामातील रहिवासी आहे.

या दहशतवाद्यांकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रे, दारुगोळा, हत्यारे आणि संवादासाठी वापरण्यात येणारी उपकरणे जप्त करण्यात आली. जप्त शस्त्रसाठ्यात दोन एके ४७, मॅगजीन, ग्रेनेडचा समावेश आहे. जम्मू-काश्मीर पोलिसांनी सांगितले की, मंगळवारी सकाळी शोपिया जिल्ह्यातील केलर परिसरात काही दहशतवादी लपल्याची माहिती मिळाली. त्यानंतर स्पेशल ऑपरेशन ग्रुप आणि सैन्याचे २० राष्ट्रीय रायफल्स, सीआरपीएफ जवानांनी मोहीम राबवली. यावेळी अतिरेक्यांसोबत झालेल्या चकमकीत लश्कर-ए-तोयबाचे ३ दहशतवादी मारले गेले.

**शाहीद कुट्टेचा अनेक हल्ल्यात सहभाग**

मारला गेलेला दहशतवादी शाहीद कुट्टे शोपियातील चोटीपोराच रहिवासी आहे. मार्च २०२३ साली तो लश्कर ए तोयबात सहभागी झाला. तो लश्करचा कमांडर होता. ८ एप्रिल २०२४ साली दानिश रिसोर्टवर झालेल्या हल्ल्यात त्याचा सहभाग होता.

१८ मे २०२४ साली हिरपोरामध्ये भाजपा सरपंचाची हत्या करण्याचा कटदेखील त्यानेच रचला होता. त्यानंतर ३ फेब्रुवारीला कुलगाम येथे आर्मी जवानाच्या हत्येत त्याचाच सहभाग असल्याचा संशय आहे. ◀(वृत्तसंस्था)

**काय आहे ऑपरेशन केलर? :** ७ मे रोजी पाकिस्तान आणि व्याप्त काश्मिरातील दहशतवाद्यांच्या अड्ड्यांविरुद्ध केलेल्या ऑपरेशन सिंदूर नंतर भारतीय लष्कराने काश्मिरात अतिरेक्यांविरोधात ऑपरेशन केलर सुरू केले आहे. या मोहिमेत तीन दहशतवाद्यांना ठार करण्यात आले आणि त्यांच्या ताब्यातून मोठा शस्त्रसाठा हस्तगत करण्यात आला.

# राज्यातील सर्व देवस्थान जमिनींच्या खरेदी विक्री व्यवहारांची नोंदणी थांबवा

## महसूलमंत्री बावनकुळे

**तभा वृत्तसेवा | विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१४ मे :**

राज्यात देवस्थान इनाम जमिनी मोठ्या प्रमाणावर असून या जमीनींचे खरेदी विक्री व्यवहार होत आहेत. मात्र देवस्थान जमिनीबाबत राज्य सरकार धोरण ठरवित आहे. तोपर्यंत या जमिनींची दस्त नोंदणी करणे थांबविण्यात यावी, असे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी दिले. त्याचबरोबर कोल्हापूर शहर आणि उपनगरे नक्शा योजनेमध्ये बसवून सर्व्हे करण्याच्या सुचना केल्या.

मंत्रालयात पश्चिम महाराष्ट्र देवस्थानच्या जमीनीबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, आमदार अमल महाडिक तर दूरदृश्य प्रणालीद्वारे कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे उपस्थित होते. मंत्री बावनकुळे म्हणाले, देवस्थान इनाम मिळकतीच्या अनुषंगाने शासन स्तरावर धोरण ठरविण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगी खेरीज किंवा न्यायालयाचे आदेश असतील त्याशिवाय राज्यातील सर्व देवस्थानच्या खरेदी आणि विक्रीच्या व्यवहारांची नोंदणी केली जाऊ नये. जर व्यवहार झाले तर त्यास दुय्यम निबंधक यांना जबाबदार धरण्यात येईल.कोल्हापूर शहराचा झपाट्याने विकास होत वाढीव गावठाणाचा सर्व्हे करुन प्रॉपर्टी कार्ड मिळावे अशी मागणीही यावेळी करण्यात आली होती. त्याबाबत बावनकुळे यांनी जिल्ह्यातील शंभर गावांचा समावेश सर्व्हे नक्शा या प्रणालीमध्ये करुन पायलट प्रकल्प तयार करावा अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या

# नऊ राज्यांमध्ये पावसाची शक्यता

**नवी दिल्ली :** हवामान खात्याने बिहार आणि छत्तीसगडसह १४ राज्यांमध्ये वादळ आणि पावसाचा इशारा दिला तर गुजरात आणि आसामसह ९ राज्यांना मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. राजस्थानमधील ११ जिल्ह्यांमध्ये वादळ आणि पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मंगळवारी अनेक शहरांमध्ये हवामान बदलले. अलवर, भरतपूर, जयपूर, हनुमानगड, झुंझुनू येथे दुपारी पाऊस झाला. दरम्यान, बाडमेर, जैसलमेर येथे कमाल तापमान ४१ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त नोंदवले गेले.




# ‘ब्लॅकस्टोन’ची राज्यात ५,१२७ कोटींची गुंतवणूक

- २७, ५१० जणांना मिळणार जॉब
- मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार

**तभा वृत्तसेवा | जमीर काझी**
**मुंबई, दि. १४ मे :**

राज्य शासन व ब्लॅकस्टोन समूहाच्या एक्सएसआयओ लॉजिस्टिक्स पार्क्स आणि होरायझन इंडस्ट्रियल पार्क्स यांच्यात बुधवारी महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे उद्योग सचिव डॉ.पी.अन्बळगन आणि होरायझन इंडस्ट्रियल पार्क्सचे अध्यक्ष आर.के.नारायणन यांच्यात हा करार स्वाक्षरीत झाला. यावेळी उपमुख्यंत्री एकनाथ शिंदे, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासू, उपसचिव लक्ष्मीकांत ढोके, ब्लॅकस्टोन डहायझर्स प्रा. लि.चे वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक तुहिन पारिख, ब्लॅकस्टोन डव्हायझर्स प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक आलोक जैन, एक्सएसआयओ लॉजिस्टिक्स पार्क्सचे व्यवस्थापकीय संचालक आशीष अग्रवाल आदी उपस्थित होते.

हा सामंजस्य करार राज्यातील प्रमुख औद्योगिक आणि मल्टिमोडल लॉजिस्टिक क्षेत्रांमध्ये आधुनिक लॉजिस्टिक्स आणि इंडस्ट्रियल पार्क्सच्या विकासासाठी होणार आहे.या सामंजस्य करारानुसार महाराष्ट्रात १० हून अधिक आधुनिक औद्योगिक व लॉजिस्टिक्स पार्क्स उभारले जाणार आहेत. यासाठी ७९४.२ एकर जमिनीचे क्षेत्रफळ आहे. यापैकी १.८५ कोटी चौ. फूट जमिनीवर बांधकाम करण्यात येईल.

या सर्व प्रकल्पांमध्ये मिळून एकूण थेट परकीय गुंतवणूक ही ५,१२७ कोटी आहे. या करारामुळे थेट व अप्रत्यक्ष अशी एकूण २७,५१० रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहे.

हे लॉजिस्टिक्स पार्क्स नागपूर, भिवंडी, चाकण, खंडवा, सिन्नर, पनवेल यांसारख्या महत्त्वाच्या ठिकाणी विकसित केले जाणार आहेत. हे प्रकल्प पर्यावरणस्नेही, डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चरयुक्त व रोजगारनिर्मितीस प्रोत्साहन देणारे असून, महाराष्ट्र लॉजिस्टिक्स धोरण २०२४ शी सुसंगत असेल.

ही परिवर्तनात्मक भागीदारी नागपूर, मुंबई, पुणे आणि इतर ठिकाणी जागतिक दर्जाचे, पर्यावरण, सामाजिक आणि शासकीय अनुकूल असे औद्योगिक व लॉजिस्टिक्स हब्स तयार करण्याच्या दिशेने पाऊल टाकणारी असून भारतातील उत्पादन, वेअरहाउसिंग व पुरवठा साखळी उत्कृष्टतेसाठी एक सशक्त पायाभूत रचना निर्माण करेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.


श्री. मल्लिनाथ सिद्रामय्या टेंगळेस्वामी, सौ. महानंदा मल्लिनाथ टेंगळेस्वामी
व टेंगळेस्वामी परिवार प्रकाशित व आयोजित





## शिवदास कृत श्री सिध्दराम चरित्र

✻ ग्रंथ प्रकाशन समारंभ ✻

✻ अमृत हस्ते ✻

प.पू.श्रीकाशी जगद्गुरू डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी



✻ प्रमुख उपस्थिती ✻
श्री ष.ब्र. विजय महान्तेश्वर शिवाचार्य स्वामीजी
(चरमूर्ती मठ हवीनाळ ता. चडचण जि. विजापूर)

✻ कार्यक्रमाचे अध्यक्ष ✻
श्री. धर्मराज काडादी
(अध्यक्ष : श्री सिद्धेश्वर देवस्थान पंचकमिटी, सोलापूर)

✻ प्रमुख पाहुणे ✻
आ.श्री. विजयकुमार देशमुख (माजी पालकमंत्री, सोलापूर)
वेदमुर्ती/व्याख्यानकेसरी श्री. बसवराज शास्त्री हिरेमठ
डॉ. अनिल सर्जे (वीरशैव मराठी साहित्याचे अभ्यासक)

✻ आपले विनीत ✻
✻ सौ. महानंदा मल्लिनाथ टेंगळेस्वामी — श्री. मल्लिनाथ सिद्रामय्या टेंगळेस्वामी
✻ सौ. उर्मिला राजशेखर टेंगळेस्वामी — श्री. राजशेखर सिद्रामय्या टेंगळेस्वामी
✻ सौ. सुरेखा चंद्रशेखर टेंगळेस्वामी — श्री. चंद्रशेखर रेवणसिध्दय्या टेंगळेस्वामी
✻ सौ. शांता नागेश टेंगळेस्वामी — श्री. नागेश सिद्रामय्या टेंगळेस्वामी



✻ संयोजक ✻
श्री. मल्लिनाथ सिध्दरामय्या टेंगळे
सौ. महानंदा मल्लिनाथ टेंगळे

कार्यक्रमाची वेळ व स्थळ : दि.१५ मे २०२५ रोजी सकाळी १० वाजता, श्री शिवयोगी सिध्देश्वर मंदिर, सोलापूर

शुभेच्छुक : श्री. रुद्रमुनी डेव्हलपर्स, सोलापूर
श्री. नागनाथ गंगाराम शिवसिंगवाले, श्री. राजशेखर मल्लिकार्जुन गणेचारी

## अग्रलेख...

# स्थलांतरणावर ब्रिटनचा लत्ताप्रहार

ब्रिटनमध्ये नागरिकत्वाच्या नव्या धोरणाची घोषणा करून, पंतप्रधान किर स्टार्मर यांनी देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. हे धोरण स्थलांतरासंबंधी असलेल्या जुन्या नियमांमध्ये मोठा बदल घडवून आणणारे आहे. नव्या धोरणानुसार ब्रिटनमधील स्थलांतरितांना नागरिकत्व मिळविण्यासाठी लागणारा कालावधी ५ वर्षांवरून १० वर्षे करण्यात आला आहे. पंतप्रधानांनी इमिग्रेशन संदर्भात नवे धोरण जाहीर करताना देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान देणाऱ्या परिचारिका, डॉक्टर, अभियंते आणि एआय तज्ज्ञ यासारख्या अत्यंत कुशल लोकांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला आहे. सोबतच नागरिकत्व देताना इंग्रजी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्यात आले आहे. फसव्या स्थलांतरप्रवृत्तींवर कठोर नजर ठेवण्याच्या नव्या तरतुदीमुळे पुढील पाच वर्षांत ब्रिटनमधील स्थलांतरितांच्या संख्येत लक्षणीय घट सुनिश्चित केलेली आहे. ब्रिटनच्या या नव्या धोरणाचा परिणाम जगभरातील स्थलांतरितांवर होणार आहे. भारतही त्यापासून अलिप्त राहू शकणार नाही. कारण भारतालाही शेजारी देशातून होणाऱ्या घुसखोरीमुळे आणि या लोकांनी खोट्या कागदपत्रांच्या आधारे मिळविलेल्या नागरिकत्वामुळे मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यातून राष्ट्रीय सुरक्षेपुढे आव्हान निर्माण झाले आहे. तसेच आव्हान ब्रिटनपुढेही उभे राहिले होते, त्यामुळे नवा कायदा आणून त्याद्वारे स्थलांतरितांना ब्रिटनमध्ये निवास करण्यापासून रोखले जाणार आहे. नव्या धोरणाची घोषणा कारताना, मागील सरकारने देशाच्या खुल्या सीमांचा वापर करून गोंधळ घातल्याचा आरोप पंतप्रधानांनी केला. नव्या धोरणानुसार नागरिकत्व मिळविण्यासाठीची विद्यमान पद्धत कालबाह्य ठरविण्यात आली आहे. नव्या कठोर कायद्यांसह स्थलांतरितांना नागरिकत्व दिले जाणार आहे. स्थलांतरित नागरिक जोवर अर्थव्यवस्था आणि समाजातील स्थान निश्चित करणार नाही, तोवर कोणत्याही विदेशी नागरिकाला ब्रिटनचे नागरिकत्व मिळणार नाही, असा कठोर निर्णय घेतला गेला आहे. स्थलांतरितांमुळे ब्रिटनची राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात आली होती. वाढती घुसखोरी, बनावट कागदपत्रांद्वारे नागरिकत्व मिळविण्याचे प्रकार आणि संभाव्य दहशतवादी अड्ड्यांची शक्यता यामुळे कठोर धोरणांची गरज निर्माण झाली होती. देशाच्या अर्थव्यवस्थेवरचा ताण हलका करण्यासाठीही नवे धोरण घोषित केले गेले. अनेक स्थलांतरित लोक नागरिकत्व मिळवून नोकऱ्या किंवा व्यवसाय न करता आम ब्रिटिश जनतेसाठी असलेल्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक लाभ पदरात पाडून घेत होते. त्यामुळे करदात्यांवर ताण येत होता आणि जनतेत नाराजी निर्माण झाली होती. सरकारने केलेल्या अनेक जनमत सर्वेक्षणांमधून स्थलांतराच्या विरोधात जनतेचा रोष वाढताना दिसून आला होता. सरकारवर त्याविरोधात तीव्र भूमिका घ्यावी आणि ब्रिटिश नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करावे, असा दबाव दिवसेंदिवस वाढत चालला होता. गेल्या काही वर्षांपासून ब्रिटनला ब्रेन ड्रेनचा सामना करावा लागत होता. त्याकडे बघता ब्रिटनला प्रत्यक्ष देशाच्या विकासात मदत करणाऱ्या कुशल कामगारांची गरज होती. त्यामुळे योग्य व्यक्तीसच नागरिकत्व दिले जावे या तत्त्वावर भर दिला गेला.

ब्रिटनमध्ये स्थलांतरित लोक विविध धर्म आणि वंशातील आहेत. त्यात भारतीय वंशाच्या अथवा दक्षिण आशियाई लोकांचा समावेश आहे. आफ्रिकन वंशाच्या मुख्यतः कैरिबियन किंवा आफ्रिकेतील देशांमधून आलेल्या लोकांनी ब्रिटनचे नागरिकत्व मिळविले आहे. युरोपियन युनियनमधील तसेच अरब आणि सीरिया, इराक, अफगाणिस्तान, सोमालिया इत्यादी देशांचे नागरिकही मोठ्या प्रमाणात आढळतात. २०२१ मध्ये ब्रिटनची जनगणना झाली, त्यात स्थलांतरितांच्या वाढत्या लोकसंख्येचा अंदाज ब्रिटिश सरकारला आला. देशाच्या ६.७ कोटी लोकसंख्येत स्थलांतरितांची संख्या (विदेशात जन्म घेतलेली लोकसंख्या) १५ टक्क्यांच्या आसपास आहे. त्यात भारतीय वंशाचे लोक २.३ टक्के , पाकिस्तान आणि बांगलादेशी वंशाचे लोक २.१ टक्के, आफ्रिकन वंशाचे लोक १.८ टक्के तर युपोपियन वंशाचे लोक ३.५ टक्के आहेत. याच १५ टक्क्यांपेकी परदेशी कामगारांची संख्या कमी करणे, हा सरकारचा उद्देश असून, याबाबत ब्रिटिश गृहसचिव यवेट कूपर हाऊस ऑफ कॉमन्समध्ये श्वेतपत्रिका सादर करणार आहेत. ब्रिटनमध्ये स्थलांतरितांबाबतचे कायदे कडक झाल्यामुळे देशाच्या राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा मजबूत होणार आहे. गेल्या काही वर्षांपासून जाणवणाऱ्या कुशल कामगारांच्या कमतरतेचा प्रश्न निकाली निघणार आहे. त्यातून आरोग्य आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्राला मोठा लाभ मिळेल.

स्थलांतरितांच्या समस्यांमुळे ग्रस्त असलेला ब्रिटन हा काही एकमेव देश नाही. जर्मनीतही स्थलांतरितांमुळे सांस्कृतिक आणि सामाजिक संघर्ष झाले आहेत. विशेषतः मध्य-पूर्वेतून येणाऱ्या लोंढ्यांमुळे स्थानिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली. स्वीडनमध्ये उदार स्थलांतर धोरणानंतर गुन्हेगारीचे प्रमाण वाढल्याचे आरोप झाले. त्यामुळे या देशानेही आपली याबाबतची लवचीक धोरणे कठोर केली. मेक्सिकोसारख्या देशातून होत असलेल्या अनधिकृत स्थलांतरामुळे अमेरिकेने सशक्त धोरण आखले. तसेच, ग्रीन कार्ड प्रक्रियाही कठीण केली. त्याचा तोटा त्याच्या काही मित्र राष्ट्रांनाही झाला. जर्मनीत मोठ्या प्रमाणात सीरिया, इराक आणि अफगाणिस्तानातून स्थलांतरित आल्याने तेथे समस्या निर्माण झाल्या. २०१५ नंतरच्या युद्धग्रस्त अवस्थेमुळे सीरियन शरणार्थींना मोठ्या प्रमाणावर प्रवेश देण्यात आला. एकाएकी शरणार्थींची संख्या वाढल्याने त्यांची ओळख पटवणे कठीण होऊन बसले. स्वीडनमध्ये मोठ्या प्रमाणात इराक, सोमालिया, सीरिया येथून स्थलांतर झाले. त्यामुळे गँग वॉर आणि गोळीबाराच्या घटनांमध्ये वाढ झाली. महिलांचे हक्क मारले गेले. शिक्षण पद्धतीमुळे धार्मिक मतभेदांची दरी वाढली. अमेरिकेतील स्थलांतरित मुख्यतः मेक्सिको, ग्वाटेमाला, होंडुरस, भारत, चीन आणि फिलिपिन्समधील आहेत. यामुळे राजकीय मतभेद निर्माण झाले आहेत.

भारत देश तर गेल्या अनेक वर्षांपासून बेकायदा घुसखोरीच्या समस्येविरुद्ध झुंज देतो आहे. भारतात सच्छिद्र सीमांमुळे बांगलादेश, म्यानमार आणि पाकिस्तानातून सातत्याने घुसखोरी होत आहे. यात केवळ सामान्य नागरिकच नाही तर अतिरेकीसुद्धा भारतात प्रवेश करीत आहेत. सीमेवर कुंपण घालूनही या समस्येवर पुरता चाप बसलेला नाही. पैशांच्या लोभापायी काही लोक अशा लोकांना भारतात प्रवेश मिळवून देतात आणि हीच मंडळी पुढे बनावट कागदपत्रांच्या आधारे जन्माचा दाखला, आधार कार्ड, रेशन कार्ड, पॅन कार्ड मिळवतात. शिवाय सरकारी योजना पदरात पाडून घेण्यातही स्थलांतरितांची संख्या मोठी आहे. भारतावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यांमध्ये घुसखोरांनी स्लिपर सेलची भूमिका बजावल्याच्या अनेक घटना उघडकीस आल्या आहेत. घुसखोरांची ओळख पटत नाही. यामध्ये काही दहशतवादी गटांचे सदस्य असण्याची शक्यता असते. अनधिकृत स्थलांतरामुळे शहरी भागांमध्ये वस्त्या वाढतात, संसाधनांवर ताण येतो. ब्रिटनने ज्याप्रमाणे आपला स्थलांतरितांबाबतचा कायदा कडक केला, त्याचप्रमाणे भारताला ओळख पडताळणीची पद्धती अधिक सक्षम करावी लागणार आहे. एनआरसीसारखे कायदे हा त्यावर पर्याय ठरू शकतो. त्याकरिता राजकीय इच्छाशक्तीचीही आवश्यकता आहे. भारतीय जनता पक्ष त्याबाबत आग्रही असला तरी विरोधकांना हा कायदा अन्यायकारक वाटतो. त्यामुळे त्याबाबत सर्वपक्षीय सहमती होण्याची गरज आहे. सुरक्षा यंत्रणांना डिजिटल साधनांनी बळकट करणे, हा एक पर्याय असू शकतो त्याचप्रमाणे सीमेवर सतर्कता वाढवणे आणि ठोस कारवाई करण्यासारख्या उपाययोजना केल्या जायला हव्यात. ब्रिटनसारखे राष्ट्र जेव्हा स्थलांतर धोरण कठोर करते, त्यावर लत्ताप्रहार करते, तेव्हा भारतासारख्या देशांनाही त्यातून शिकण्याची गरज आहे. नागरिकत्व हे केवळ मानवी हक्क नव्हे तर एक राष्ट्रीय जबाबदारी आहे. त्यामुळे त्याचा गैरवापर टाळण्यासाठी राष्ट्रवादी दृष्टिकोन आणि कठोर निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

---

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी लष्करी वापर

सध्या संगणकीय बुद्धिमत्तेचा अर्थात् कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा सगळीकडे बोलबाला आहे. अशा हुशार संगणकीय प्रणालींचा वापर औद्योगिक क्षेत्रापासून घराची साफसफाई करण्यापर्यंत अक्षरशः सर्वत्र होऊ लागला आहे आणि संगणकाने किंवा यंत्रमानवाने करण्याच्या कामांची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे. माणसानेच बनवलेल्या यंत्रणा, माणसाला शक्यच नसलेल्या वेगाने आणि अचूकतेने सूक्ष्म तसेच धोकादायक कामे पटापट करताना पाहूनच थक्क व्हायला होते. असे म्हणायचे कारण म्हणजे हल्ली संगणकीय प्रगतीचा वेग इतका जबरदस्त झाला आहे की आपण त्याचे आश्चर्य करणेच सोडून देऊ की काय, असे वाटू लागले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशिन लर्निंग, बिग डेटा ॲनालिसिस, रोबोटिक्स या आणि यासारख्या घटकांमुळे संबंधित संगणकीय प्रणाली आणि यंत्रणा अधिकाधिक स्वायत्त म्हणजे स्वतंत्रपणे निर्णय घेणाऱ्या आणि स्वयंभू बनत आहेत यात शंकाच नाही. लष्कराच्या दृष्टीने त्यांचे महत्त्व सर्वसामान्यांच्या दैनंदिन व्यवहारांमधील संगणकीकरणाच्या तुलनेने जास्त आहे, कारण अशा यंत्रणा मानवी मेंदूपेक्षा कैकपट जास्त वेगाने निर्णय घेऊन तितक्याच त्वरेने अमलात आणू शकतात, तेही अधिक अचूकतेने. उदा. ताशी शेकडो किलोमीटर वेगाने वाट्टेल तशी वळणे घेणाऱ्या विमानाच्या मागे सोडलेले क्षेपणास्त्र किंवा हजारो किलोमीटर अंतरावरून दुसऱ्या देशातील विशिष्ट लक्ष्यावर सोडलेले भू-लक्ष्यवेधी क्षेपणास्त्र. वाटेतील भौगोलिक तसेच मानवनिर्मित अडथळे टाळून अशी 'गायडेड मिसाईल्स' ठिकाणांवर अचूक पोहोचतात ती त्यांना पुरवलेल्या माहितीचे झटपट विश्लेषण करण्याच्या संगणकीय क्षमतेमुळेच. त्याची माहिती विशेष रंजक आहे.

लष्करी वापराच्या तंत्रामध्ये इस्रायल जास्त तरबेज आहे. इस्रायलने आपल्या युद्धांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला आहे. यात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सायबर युद्धाचा समावेश आहे. हेरगिरीचे आणि युद्धाचे पारंपरिक स्वरूप झपाट्याने बदलले आहे हे खरे. विविध देश 'कोल्ड वॉर'कडून 'कोड वॉर'कडे जात असताना प्रत्यक्ष आघाडीवर बंदुका, विमाने, रणगाडे वगैरे साहित्य वापरून लढल्या जाणाऱ्या चकमकींचे प्रमाण कमी होईल. बदलत्या काळानुसार तंत्रेही बदलली असल्याने 'शस्त्र हे शस्त्रासारखेच दिसले पाहिजे' असा पारंपरिक आग्रह धरण्याचेही दिवस संपले आहेत. सध्या अत्यंत अचूक आणि कार्यक्षम इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा आणि त्याहीपेक्षा सूक्ष्म तंत्रज्ञानाचा जमाना आहे. ड्रोन हे याचे आदर्श उदाहरण आहे. नवतंत्रज्ञानाचा आविष्कार दाखवणारी युद्धे सध्या युक्रेन, रशिया, इस्रायल, सीरिया, जॉर्डन इत्यादी क्षेत्रांमध्ये चालू आहेत. सातत्याने युद्धग्रस्त असलेला प्रदेश म्हणजे इस्रायल-पॅलेस्टाईन, असे म्हणायला हरकत नाही. इस्रायलची शेतीपासून पर्यटनापर्यंतच्या अनेक क्षेत्रांमधली तांत्रिक झेप आपल्याला माहीतच आहे. त्यामुळे इस्रायलचे लष्कर आणि गुप्तचर संघटना (मोसाद) याला अपवाद असू शकतच नाही.



काही वर्षांपूर्वी इस्रायलने संगणकीय दूरनियंत्रित साप (रोबो-रेप्टाईल) तयार करून शत्रुप्रदेशात सोडले होते. असा साप अगदी खऱ्या सापांसारखाच दिसतो. त्याचे डोके म्हणजे कॅमेरा असतो. तो लष्करी किंवा इतर महत्त्वाच्या स्थानांभोवती फिरून, तेथील फोटो लगेच प्रक्षेपित करतो आणि गवतातून वा कुंपणाच्या कडेकडेने सरपटत परत येतो. आता इस्रायलने इलेक्ट्रॉनिक दूरनियंत्रित संगणकीकृत फुलपाखरे तयार केली आहेत. पॅलेस्टाईनमधील हमास चळवळीच्या कार्यकर्त्यांनी गाझा किनारपट्टीवर अशी भिरभिरणारी फुलपाखरे पकडल्याचा दावा केला आहे. कबुतरांच्या अंगावर छोटा कॅमेरा बसवून अद्याप हेरगिरी केली जातेच. परंतु त्यापेक्षा हे फुलपाखरू अधिक प्रभावी आहे, कारण ते आकाराने छोट्या पक्ष्यापेक्षाही लहान असल्याने चक्क खोलीच्या खिडकीतून आत जाऊन टेहळणी करून दोन-चार सेकंदांमध्ये बाहेरही येऊ शकते. यामध्ये जीपीएस वगैरे इतर यंत्रणा बसवलेली असतेच, शिवाय यामध्ये चेहरा ओळखणारे (फेस रेकग्निशन) सॉफ्टवेअरही असावे, असा अंदाज आहे, कारण हमासने पकडलेल्या फुलपाखरामध्ये बेपत्ता तसेच युद्धकैदी इस्रायली सैनिकांची छायाचित्रे आढळली. इस्रायलने युद्धामध्ये, सायबर तंत्रज्ञान आणि स्वयंचलित प्रणालींचा अत्यंत कार्यक्षम वापर केला आहे. ही आधुनिक युद्धशैली केवळ शारीरिक लढाईवर अवलंबून न राहता डिजिटल आणि माहिती-आधारित युद्धाच्या दिशेने सरकत आहे. उद्याची युद्धे हाडामासाचे सैनिक न लढता आपले तंत्र विरुद्ध शत्रूचे तंत्र अशी असू शकते.

कृत्रिम बुद्धिमत्तेमध्येही विविध पातळ्या असतात. त्यांपैकी दोन मुख्य अशा नॅरो (मर्यादित) आणि जनरल (सर्वसाधारण किंवा सर्वसमावेशक म्हणू). 'नॅरो'चा वापर होताना आपण अनेक ठिकाणी पाहतो आणि अनुभवतो. ई-मेलचे स्पॅम फिल्टर, ऑटो सर्च, ऑटो ट्रान्सलेट, स्वयंचलित वाहने, घटना किंवा दस्तावेजांची वर्गवारी तसेच क्रम लावणे, (आपल्याबरोबर) बुद्धिबळ किंवा अन्य बोर्ड गेम्स खेळणारा संगणक आता आढळतात. मात्र 'जनरल ए आय' हे जरा वेगळे प्रकरण आहे. अशा प्रणाली जवळजवळ माणसाप्रमाणे विचार करून निर्णय घेऊ शकतील, भावभावना आणि शब्दांमागचा खरा अर्थही बऱ्यापैकी समजू शकतील आणि मुख्य म्हणजे केलेल्या चुका आणि अनुभवांमधून शिकू शकतील! नॅरो आणि जनरल अशा दोन्ही 'ए आय'चा वापर लष्करी आणि सायबर हल्ल्यांच्या संदर्भात अतिशय प्रभावीपणे केला जाऊ शकतो हे मात्र आत्ताच सिद्ध झाले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून लक्ष्य ओळखण्याची क्षमता वाढवणारा एक रशियन आत्मघातकी ड्रोन युक्रेनवरील आक्रमणाच्या प्रतिमांमध्ये दिसला आहे. या ड्रोनचे नाव कुबला असे आहे. हे शस्त्र (ड्रोन) हवेत उडत असताना, वर्ग आणि प्रकारानुसार लक्ष्याचा शोध घेते. १.२ मीटरच्या पंखांसह, पांढराशुभ्र ड्रोन लहान पायलटलेस फायटर जेटसारखा दिसतो. हे पोर्टेबल लॉन्चमधून उडवले जाते, ते ३० मिनिटांसाठी १३० किलोमीटर प्रति तासापर्यंत वेगाने प्रवास करू शकते आणि तीन किलो स्फोटकांचा स्फोट करून जाणूनबुजून लक्ष्यावर कोसळते. रिमोट ग्राऊंड टार्गेट्स नष्ट करण्यासाठी डिझाईन केलेले हे ड्रोन मार्गदर्शन प्रणालीमधून मानवाने किंवा प्रतिमेमध्ये निश्चित केलेल्या लक्ष्याच्या निर्देशांकांवर मारा करते. स्वायत्त शस्त्रास्त्रांच्या बाबतीत, रशियाने बॉम्ब निकामी करण्यापासून विमानविरोधी आणि अर्थातच हत्या करण्यापर्यंतच्या कामांसाठी मानवरहित शस्त्रे आणि वाहने विकसित केली आहेत. फक्त हवाई नाही तर हे तंत्र समुद्रात पाण्याखालीही कामी येते. महासागरांमध्ये, मानवविरहित नौदल आणि समुद्राखालील वाहनांमध्ये एआयचा समावेश करण्याची योजना आहे. गेल्या नोव्हेंबरमध्ये रशियन संरक्षण मंत्रालयाने जमिनीवरील लक्ष्यांवर, शत्रूच्या जहाजांवर हल्ला करण्यासाठी आणि 'गुप्त मोहीम' पार पाडणाऱ्या विशेष दलाच्या सैनिकांना मदत करण्यासाठी 'कामिकाझे ड्रोन'ने नौदलाच्या जहाजांना सशस्त्र केले होते. कृत्रिम बुद्धिमत्ता ही दुधारी तलवार आहे, याची जाणीव हळूहळू होऊ लागली आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

---

## वेध

**नीलेश जोशी**

# 'कुटुंब व्यवस्था' बलस्थान ठरावे

समाजात सतत वाढत असलेल्या आत्महत्या, मानसिक विकार या समस्यांच्या कारणांचा शोध हे मनोचिकित्सकांसमोर असलेले आव्हान आहे. आतापर्यंत याचा अभ्यास करणाऱ्या सर्वच तज्ज्ञांच्या मते आत्महत्येचा विचार असणाऱ्या व्यक्तीशी जर योग्य पद्धतीने संवाद झाला तर तो आत्महत्येपासून परावृत्त होतो. म्हणजेच संवादाचा अभाव हेच या समस्येचे मूळ आहे. भारतीय संस्कृतीचा पाया हा कुटुंब व्यवस्थेवर भक्कम उभा आहे. त्यातही संयुक्त कुटुंबपद्धतीत हे तर आपले वैशिष्ट्यच. कुटुंब व्यवस्थेत नकळत सर्वांसोबत होणारा मनमोकळा संवाद भावनिक, मानसिक आधार देणारा ठरतो. पण दुर्दैवाने गत काही वर्षांत कुटुंब व्यवस्था गतीने बदलत असल्याचे चित्र आहे. समाजात 'मी आणि माझे' हा संकुचित विचार बळावतोय्. स्वकेंद्रित मानसिकता, पाश्चात्यांचे अंधानुकरण, भौतिक सुखांचा हव्यास आणि त्यातच समाज माध्यमांचा अविवेकी वापर त्यामुळे विस्कळीत झालेल्या कुटुंब व्यवस्थेची घडी पुन्हा नीट बसविण्यासाठी आवश्यक आहे.

कालौघात संयुक्त असलेले कुटुंब सुरुवातीला चौकोनी तर आता त्रिकोणी झाले आहे. खरं म्हणजे कुटुंब व्यवस्थेतून होणारे जीवनमूल्यांची रुजवण, नकळत होणारे संस्कार चारित्र्यसंपन्न पिढी घडविते. कुटुंबातील अनेक छोट्या-मोठ्या रूढी-परंपरा संस्कार देणाऱ्या असतात. याच संस्कारांचे प्रतिबिंब समाजात वावरताना उमटते. उदाहरणार्थ कुटुंबातील नकळत्या वयातील दीड-दोन वर्षांच्या मुलाचा पाय अनवधानाने कुटुंबातील ज्येष्ठ सदस्याला लागला तर कुटुंबातील सर्वच जण त्याला त्याच वेळी टोकून 'त्यांना नमस्कार कर' असे सांगतात. असा आपण सर्वांनीच अनुभवलेला प्रसंग असावा. पण या छोट्याशा प्रसंगात ज्येष्ठांचा आदर करावा, प्रसंगी नमते घ्यावे हा संस्कार त्या मुलाच्या मनावर बिंबतो. अतिशय छोटीशी असणारी ही बाब मोठा संस्कार देते. त्या अबोध वयात असे का करायचे हे जरी त्या लहानग्याला कळले नसले, तरी ज्येष्ठांबद्दल आदरभाव रुजण्यास सुरुवात होते. पण दुर्दैवाने आताच्या चौकोनी कुटुंबात अशा छोट्या संस्कारांकडे दुर्लक्ष होते. आता लहानगे शिशू रडल्यानंतर त्याच्या हातात मोबाईल थोपवून त्याला शांत करण्याचा प्रयत्न होतो. मग त्याला राम-कृष्ण आणि शिवबाच्या कथा सांगाव्या तरी कुणी? छोट्या संस्कारातून मोठी शिकवण मिळेल कशी? हा प्रश्न आहे. जिथे राम-कृष्ण, शिवबा-महाराणा प्रताप यांच्या गोष्टी चिमुकल्यांच्या कानावर पडत नसतील तेथे सायंकाळच्या दिवे लावणीच्या वेळी 'शुभंकरोती'ची अपेक्षा तरी कशी करावी? आई-बाबा, काका-काकूंच्या ऐवजी जेथे मम्मी-पप्पा, अंकल-आंटी म्हटलं जात असेल तेथे स्वभाषेचा संस्कार तरी कसा रुजावा? अशा वातावरणात लहानाचे मोठे झालेल्यांकडून देव, देश, धर्म आणि संस्कृती अनुरूप आचरणाची अपेक्षा करावी का? असे एक ना अनेक प्रश्न समस्या रूपाने समोर येत आहेत. जे पालक कुटुंबात योग्य त्या वेळी संस्कार रुजविण्यासाठी वेळ नसल्याचे कारण देतात तेच पालक पन्नाशीनंतर त्यांच्याच मुलांकडून तो श्रावणबाळ असावा, अशी अपेक्षा करतात, हा विरोधाभासच नव्हे का? मात्र, सद्यःस्थितीत असे चित्र दिसत असले, तरी कुटुंबाचा संस्कार हेच आमच्या संस्कृती आणि देशाचे बलस्थान आहे. या बलस्थानावर आघात करण्यासाठी, कुटुंबकेंद्रित समाज व्यक्तिकेंद्रित व्हावा यासाठी ब्रिटिश काळापासून प्रयत्न सुरू आहेत आणि त्याचेच दुष्परिणाम विविध समस्यांच्या रूपाने आमच्यासमोर आहेत. भौतिक सुख-सुविधा असणाऱ्या साधनांमध्ये झालेली वाढ ही खरी समस्या नसून बदलत असलेली कुटुंब व्यवस्था, कुटुंबामधील घटत असलेला संवाद ही खरी समस्या आहे. त्यामुळे संस्कारासह हरवलेला निकोप संवाद कुटुंबांमध्ये व्हावा यासाठी सर्वांनीच पुढाकार घेण्याची गरज आहे. ही समस्या देशालाच नव्हे तर जगालाही भेडसावत आहे. म्हणूनच संयुक्त राष्ट्र संघाच्या महासभेने आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन साजरा करण्याचा निर्णय घेतला. सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक समस्यांबाबत कुटुंबाना येणाऱ्या अडचणींबाबत जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा उद्देश. १५ मे रोजी साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कुटुंब दिनानिमित्त कुटुंबातील मनमोकळा संवाद होण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजनांचा संकल्प करू या.



९४२२८६२४८४

---

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# आता घेऊनच टाका व्याप्त काश्मीर

व्याप्त काश्मीर हा भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संघर्षाचा ज्वलंत मुद्दा आहे. मुळात व्याप्त काश्मीर या शब्दातच हा भागावर पाकिस्तानने बेकायदेशीररीत्या कब्जा केला असल्याचे स्पष्ट होते. व्याप्त काश्मीर हा पुन्हा भारतात घेतला पाहिजे, अशी आपल्या देशातील जनतेचीही दीर्घकाळापासूनची मागणी आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील ताज्या संघर्षाच्या पृष्ठभूमीवर बेकायदेशीररीत्या बळकावलेले व्याप्त काश्मीर रिकामे करावे, असा इशारा भारताने पाकिस्तानला दिला आहे. व्याप्त काश्मीर हा भारताचाच भाग आहे, यावर आम्ही ठाम आहोत, यात कोणतीही तडजोड होणार नाही, तसेच या मुद्यावर तिसऱ्या देशाची मध्यस्थीही आम्हाला मान्य नाही, या भूमिकेचा भारताने पुनरुच्चार केला आहे.

त्यामुळे व्याप्त काश्मीर म्हणजे काय, असा प्रश्न देशातील जनतेच्या मनात नेहमीच उपस्थित होत असतो. १९४७ मध्ये फाळणी होत भारतातून पाकिस्तानची निर्मिती झाली. अखंड भारतात जम्मू- काश्मीर हे एक संस्थान होते. राजा हरिसिंह हे जम्मू-काश्मीरचे राजा होते. देशाची फाळणी झाल्यानंतर हरिसिंह यांच्यासमोर दोन पर्याय होते, पहिला म्हणजे भारतात कायम राहायचे आणि दुसरा म्हणजे पाकिस्तानात जायचे. मात्र याबाबतचा निर्णय राजा हरिसिंह यांना लवकर घेता आला नाही. कारण त्यांना भारतात कायम राहायचे नव्हते, तसेच पाकिस्तानातही जायचे नव्हते, तर जम्मू-काश्मीरचे स्वतंत्र देश म्हणून अस्तित्व ठेवायचे होते. मात्र जम्मू-काश्मिरात असलेल्या मुस्लिम लोकांची इच्छा पाकिस्तानात जाण्याची होती. त्यांनी राजा हरिसिंह यांच्यावर दबाव आणला. सरदार इब्राहिम यात आघाडीवर होते. हरिसिंह दाद देत नसल्यामुळे त्यांनी पाकिस्तानात धाव घेत तत्कालीन पंतप्रधान लियाकत अली यांची भेट घेतली. जम्मू-काश्मीरच्या स्वतंत्रतेचा मसुदा तयार करण्यासाठी लियाकत अली यांनी एक समिती नियुक्त केली. याचीच परिणती आझाद काश्मीरमध्ये अंतरिम सरकार स्थापन होण्यात झाली. गुलाम नबी गिलकर यांना आझाद काश्मीरचे राष्ट्रपती तर इब्राहिम खान यांना पंतप्रधान नियुक्त करण्यात आले. गिलकर नंतर श्रीनगरला आले असता त्यांना राजा हरिसिंह यांच्या सरकारने अटक केली, त्यानंतर पाकिस्तानने इब्राहिम खान यांना आझाद काश्मीरचे राष्ट्रपती नियुक्त केले.

दरम्यान पाकसमर्थित कबायली लोकांनी जम्मू-काश्मीरवर आक्रमण केले. राजा हरिसिंह या कबायली लोकांचा मुकाबला करू शकले नाही. त्यांनी भारत सरकारकडे मदतीची मागणी केली. भारत सरकारने राजा हरिसिंह यांना मदतीचे आश्वासन दिले, पण एका अटीवर. हरिसिंह यांनी आपले जम्मू-काश्मीर संस्थान आपणहून भारतात विलीन करून टाकावे. राजा हरिसिंह यांनी भारत सरकारची मागणी मान्य करेस्तोवर बराच उशीर झाला. दरम्यान पाकसमर्थित कबायली लोकांनी जम्मू-काश्मीरच्या काही भागांवर आक्रमण करून तो बळकावला. कबायली लोकांनी जम्मू-काश्मीरच्या जेवढ्या भागावर कब्जा केला, तो भाग पाकिस्तानच्या नियंत्रणात गेला असून तो आता व्याप्त काश्मीर म्हणून ओळखला जातो.

विशेष म्हणजे नेहरू आणि राजा हरिसिंह यांच्यात चर्चेचे गुऱ्हाळ सुरू असताना तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या आग्रही भूमिकेने भारताने जम्मू-काश्मीरमध्ये आपल्या फौजा पाठवल्या होत्या. यात आणखी विलंब झाला असता तर आज आपल्या ताब्यात असलेले जम्मू-काश्मीरही पाकिस्तानच्या ताब्यात गेले असते.

व्याप्त काश्मीरचे एकूण क्षेत्रफळ १३ हजार चौरस किमी आहे. २०१७ च्या जनगणनेनुसार तेथील लोकसंख्या ४० लाख आहे. व्याप्त काश्मीर दोन भागांत विभागलेले आहे. एक म्हणजे काश्मीर आणि दुसरा म्हणजे गिलगिट आणि बाल्टिस्तान. हे दोन्ही भाग आझाद काश्मीर म्हणून ओळखले जातात. व्याप्त काश्मीरच्या सीमा पाकिस्तानातील पंजाब प्रांत, अफगाणिस्तानातील वाखान कॉरिडॉर, चीनच्या झिनझियांग तसेच भारताच्या जम्मू-काश्मीरशी जोडल्या आहेत. बाल्टिस्तानातील शक्सगाम आणि गिलगिटमधील रस्कम हा भाग पाकिस्तानने नंतर चीनला देऊन टाकला. याच भागात चीनने पाकिस्तानच्या मदतीने काराकोरम हा महामार्ग बांधला.

व्याप्त काश्मीर हे मूळ जम्मू-काश्मीरच्या तीनपट मोठे आहे. व्याप्त काश्मीरची राजधानी मुजफ्फराबाद असून बाग, नीलम, कोटली, मीरपूर, भीमबर, सुधानोटी, रावलकोट तसेच मुजफ्फराबाद असे आठ जिल्हे यात आहे. पाकिसमर्थित अतिरेकी संघटना लष्कर-ए- तोयबाचे मुख्यालय याच मुजफ्फराबाद जिल्ह्यातील बेट उल मुजाहिदीन येथे आहे.

व्याप्त काश्मीर हा पाकिस्तानच्या थेट नियंत्रणात असला तरी तेथे राष्ट्रपती आणि पंतप्रधान आहेत. व्याप्त काश्मीरचे स्वतःचे सरकार असले तरी ते पाकिस्तान सरकारच्या नियंत्रणातच काम करते. एकप्रकारे व्याप्त काश्मीर हे पाकिस्तानचे मांडलिक राज्य म्हणायला हरकत नाही. व्याप्त काश्मीरमध्ये सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयही आहे. याचाच अर्थ व्याप्त काश्मीर हे पाकिस्तानातील अन्य राज्यांसारखे एक राज्य नाही. राजा हरिसिंह यांच्या विनंतीनुसार तत्कालीन केंद्र सरकारने तातडीने काश्मीरमध्ये आपल्या फौजा पाठवल्या असत्या तर कबायली जम्मू-काश्मीरचा लचका तोडू शकले नसते किंवा त्यांनी जम्मू-काश्मीरच्या या भागात तेव्हा लष्कर पाठवून हा भाग कबायलींच्या ताब्यातून मुक्त केला असता तर हा भाग नेहमीसाठी भारताचा राहिला असता. व्याप्त काश्मीर अस्तित्वातच आले नसते. व्याप्त काश्मीरची जखम आपल्यासाठी नेहमीच भळभळत राहिली नसती.

जम्मू-काश्मीरच्या समस्येचे खापर सुरुवातीपासून तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याचर फोडले जाते, तसेच आता व्याप्त काश्मीरच्या समस्येपासूनही ते स्वतःला वेगळे करू शकत नाही. नेहरूंची सर्वांत मोठी चूक म्हणजे त्यांनी काश्मीरचा मुद्दा संयुक्त राष्ट्रात नेला. अन्यथा हा प्रश्न कधीच सुटला असता.

व्याप्त काश्मीरचा भाग भौगोलिकदृष्ट्या भारतासाठी अतिशय महत्त्वपूर्ण आहे. देशाची सुरक्षा आणि अखंडतेच्या दृष्टीनेही हा भाग मोक्याचा आहे.

त्यामुळे भारताने व्याप्त काश्मीरवरचा आपला दावा कधीच सोडला नाही आणि भारत सोडणारही नाही. व्याप्त काश्मीरवरचा आपला हक्क कायम ठेवण्यासाठी जम्मू-काश्मीर विधानसभेत २५ जागा ठेवण्यात आल्या आहेत. या जागांसाठी निवडणूक होत नसली तरी व्याप्त काश्मीर हा आमचाच भाग आहे, हे यातून सिद्ध होते. आज ना उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील भाजपाचे सरकार व्याप्त काश्मीर भारतात सामील करून घेतल्याशिवाय राहणार नाही. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३७० कलम सहजासहजी रद्द होईल, अयोध्येतील रामजन्मभूमीवर भव्य मंदिर उभे होईल, असे कोणाला वाटत नव्हते, पण ते झाले. तसेच व्याप्त काश्मीरही एक दिवस भारतात आल्याशिवाय राहणार नाही.

९८८१७१७८१७

---

### नदी प्रदूषण, एक गंभीर समस्या

भारतात अनेक नद्या आहेत. नद्या आपली जीवनदायिनी आहे. प्राचीन काळी नद्यांच्या काठानेच मनुष्याने वस्ती वसवली. मनुष्य, प्राणी, पक्षी यांचे जीवन या नद्यांच्या जलावर अवलंबून आहे. पण भारतात पवित्र मानल्या जाणाऱ्या या नद्या आज प्रदूषित झाल्या आहेत आणि याला मनुष्यच कारणीभूत आहे. जलप्रदूषणाच्या अनेक कारणांपैकी औद्योगिक सांडपाणी मुख्यत्वे आहे. मोठे उद्योग, कारखाने यातील रासायनिक पाणी, कचरा नदीत सोडले जाते. तसेच घरगुती कचरा, प्लॅस्टिक इत्यादी गोष्टींमुळे सुद्धा जलप्रदूषण होते. त्याचप्रमाणे हल्ली शेतीसाठी पिकांवर रासायनिक फवारणी केली जाते, त्यामुळे सुद्धा नद्यांचे पाणी प्रदूषित होते. काही ठिकाणी नदीकाठी कपडे धुतले जातात. त्यातील डिटर्जंटने जलप्रदूषण होते. नदीतील जल प्रदूषित झाल्यास त्याच्या वापरामुळे मनुष्याच्या व प्राण्यांच्या आरोग्यावर त्याचा गंभीर परिणाम होतो. प्रदूषित गढूळ पाणी प्यायल्याने कॉलरा, कॅन्सर, त्वचाविकार, श्वसनाचे विकार मनुष्याला होतात. प्राणी सुद्धा याला बळी पडतात. पाण्यात रसायने जमा झाल्याने शेवाळाची वाढ होते. त्यामुळे पाण्यातील ऑक्सिजन कमी होतो. त्याचा गंभीर परिणाम जलचरांवर होतो. ज्या पाण्याशिवाय आपण एक क्षणही राहू शकत नाही त्या प्रती आपली उदासीनता नव्हे कृतघ्नपणा यावरून दिसून येतो. यावर उपाय म्हणून कारखान्यांच्या सांडपाण्यातील विषारी घटक कमी करणे, पर्यावरण पूरक उत्पादने वापरणे, कीटकनाशकांऐवजी जैविक खते वापरणे. यामुळे काही प्रमाणात का होईना प्रदूषण कमी होईल. तसेच पाण्याचे महत्त्व लक्षात घेऊन आपणही ईश्वराने दिलेल्या या अनमोल देणगीप्रति कृतज्ञ राहायला हवे!

**माधवी पत्की**/नागपूर

## वाचक पत्रे

### चिदम्बरम यांची परिपक्वता

पहलगाम येथे दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्यात २६ पर्यटकांची हत्या करण्यात आली. त्याचा बदला म्हणजे आपल्या युद्ध सज्ज विमानांनी ७ मे रोजी क्षेपणास्त्राने हल्ला करून पाकिस्तानमधील ९ दहशतवादी तळ नष्ट करण्यात आले व शेकडो दहशतवाद्यांना ठार करण्यात आले. याबद्दल पाकिस्तानला कसलीही हाकबोंब करता आली नाही. त्यानंतर चार दिवस युद्धसदृश परिस्थिती होती. त्यात पाकिस्तानचे अमाप नुकसान झाले. नंतर अनेक देशांच्या आवाहनानंतर शेवटी पाकिस्तानने गुडघे टेकून दोन्ही देशांनी १० मे रोजी शस्त्रसंधी केली. मात्र काही विरोधी नेत्यांना हीच वेळ कफल्लक पाकिस्तानला धडा शिकवण्याची होती असे वाटत होते. त्यामुळे युद्ध आणखी काही दिवस पुढे चालले तर पाकिस्तान १९७१ च्या युद्धाप्रमाणे गुडघे टेकेल असे वाटत होते. त्यासाठी त्यांना आरपारची लढाई हवी होती. पण काँग्रेसचे माजी अर्थमंत्री पी. चिदम्बरम यांनी वर्तमान परिस्थिती व भविष्याचा, देशहिताचा प्रथम विचार केला. रशिया-युक्रेन संघर्ष तसेच इस्रायल- हमास संघर्ष यामुळे या चारही देशात जो विध्वंस झाला व शेकडो नागरिक व सैनिक ठार झाले हे पाहून सध्याचा काळ हा युद्धाचा काळ नाही निदान भारतासाठी नाही हे मोदींचे धोरण अतिशय योग्य असल्याचे चिदम्बरम म्हणाले. आता यामध्ये दुमत असायचे कारण नाही. मोदींना नाजूक प्रसंगी देशासाठी कुठे थांबायचं हा मोदींचा निर्णय चिदम्बरम यांना अतिशय योग्य वाटला. मात्र काँग्रेसच्याच अनेक नेत्यांनी व विरोधी पक्षाच्या नेत्यांनी काहीतरी खुसपट काढून यावर टीका करण्यास सुरुवात केली आहे. असो काही नेत्यांची धाव सरड्यासारखी कुंपणापर्यंतच असते. ते दूरचे पाहू शकत नाही. संजय राऊत यापैकी एक आहेत. कसल्याही नाजूक परिस्थितीत राजकारण करायचं हेच यांचं काम आहे पण यातून त्यांच्या बुद्धीचीच कफल्लता दिसून येते. काही विरोधी पक्षांचे नेतेही आता मोदींना ओळखू लागले आहेत.

**प्रा. अनिल पळणीटकर**/९३७३२१३६१०

### समृद्धीवर आता चोरांचा धुमाकूळ

समृद्धी महामार्ग अत्यंत सुरक्षित, विना अपघाताचा, कमी वेळेचा, विना चोरांचा अशी अनेक संबोधने असणाऱ्या या महामार्गावर आता वाहनधारकांना लुटणाऱ्या टोळ्या सक्रिय झालेल्या आहेत. लग्न समारंभ आटोपून जाणाऱ्या डॉक्टर दाम्पत्याला नुकतेच लुटण्यात आले आहे.त्यांच्याकडून मोबाईल व ११ लाख १२ हजारांचा ऐवज लुटण्यात आला. गेल्या महिन्यात समृद्धीवर लोखंड घेऊन जाणाऱ्या ट्रकलासुद्धा लुटण्यात आले आहे. या महामार्गवर विनानंबर कार लुटारू टोळी चालवते व नागरिकांना लुटते, ट्रक लुटतात हे सर्व कसे? या समृद्धी महामार्गवर २४ तास महामार्ग पोलिस असताना हे कसे घडते?

याबाबत वरिष्ठ पातळीवर चौकशी व्हावी असे वाटते. या महामार्गाची सुरक्षितता पोलिसांच्याकडे असताना व २४ तास पोलिस गस्त असताना नंबर प्लेट नसलेली कार समृद्धी महामार्गावर धावते कशी? याबाबतही चौकशी व्हावी व समृद्धीवरून जाणाऱ्या वाहनांना व प्रवाशांना अधिकची सुरक्षा उपलब्ध करून द्यायला हवी.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९५०७५३२८१
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# जिल्ह्यात मे महिन्यात सरासरी ५.८ मिमी अवकाळी पाऊस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात ४ ते ५ दिवसांपासून आभाळी वातावरण निर्माण होवून तापमानात कमालीची घट झाली असली तरी दुपारी चांगलाच उकाडा निर्माण होवून सायंकाळी पाऊस हजेरी लावत आहे. मे महिन्यातील दि. १२, १३ रोजी सायंकाळी चांगला पाऊस झाला. या मे महिन्यात अवकाळी पावसाची जिल्ह्यात सरासरी ५.८ मिलिमीटर इतकी नोंद झाली असून, विभागात हा पाऊस सरासरी ८.६ मिलीमीटर इतका नोंदला गेला आहे.

दि. १२ आणि १३ मे रोजी सायंकाळी ६ नंतर अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली होती. दि. १३ रोजी तर पहाटेपर्यंत या पावसाच्या सरी बरसतच होत्या. यामुळे जिल्ह्यातील मे महिन्यात तालुकानिहाय नोंदला गेलेला पाऊस असा उत्तर सोलापूर ५.६ मिमी, दक्षिण सोलापूर १०.२ मिमी,



बार्शी ०.२, अक्कलकोट ११.६, मोहोळ ३.२, माढा ४.१, करमाळा ७.७, पंढरपूर १.८, सांगोला ३.७, माळशिरस ९.२, मंगळवेढा ५.९ तर पूर्ण जिल्ह्यात सरासरी नोंद ५.८ मिमी इतकी झाली आहे. तर पुणे विभागात हा पाऊस सरासरी ८.६ मिलीमीटर इतका नोंदला गेल्याने हा पाऊस सर्वदूर झाल्याचे समजते. इतकेच कायतर मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यात या अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने यंदा मान्सुन लवकर येवून खरिपाच्या पेरण्या वेळेत होण्याचे संकेत मिळत आहेत. यामुळे सध्यातरी शेतकरी बांधव समाधानी असल्याचे दिसत आहे.

मे महिन्याच्या सुरूवातीला तापमानाचा पारा चांगलाच वर गेला होता; म्हणजेच जवळपास ४४.७ अंश सेल्सियसपर्यंत पारा गेल्याने सोलापूरकर चांगलेच उकाड्याने हैराण झाले होते. आता गेल्या आठवड्यापासून वादळी वारे सुरू झाले आहे. आभाळही येत असल्याने तापमान घटले असले तरी अवकाळी पावसाची शक्यताही हवामान खात्याकडून वर्तविण्यात येत होती. त्यानुसार गेल्या ३ ते ४ दिवसांपासून रोजच पाऊस पडू लागला आहे. दरम्यान, मंगळवारी झालेल्या पावसामुळे तापमानाचा पारा अजून खाली म्हणजेच ३३.३ अंशावर आला आहे. यामुळे बुधवारी उकाडा कमी प्रमाणात होता. अजूनही २ ते ३ दिवस राज्याच्या काही भागात हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तविली असून, तर काही ठिकाणी हलका पाऊस किंवा ढगाळ वातावरण राहील असेही सांगितले आहे. तर जून ते सप्टेंबर या कालावधीत मान्सूनचा पाऊस सरासरीच्या १०३ टक्के होईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यामुळे शेतकरी बांधवांतून समाधानाचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, या जोरदार पावसामुळे नांगरण झालेल्या शेतीला तर फायदा होणारच असून, पेरणीपूर्व मशागतीही चांगल्या होणार असल्याची माहिती शेतकरी बांधव देत आहेत. दरम्यान, रोजच असाच पाऊस पडत राहिला तर जूनच्या पहिल्या आठवड्यापासूनच शेतकरी बांधव खरिपाच्या पेरणीस आरंभ करतील, अशीही माहिती शेतकरी बांधवांकडून मिळत आहे.

### पावसाळ्याच्या दृष्टीने प्रशासनही झाले सतर्क

मान्सून कालावधीत मोठ्या प्रमाणात किंवा मुसळधार पाऊस झाल्याने पूर परिस्थिती निर्माण होऊ शकते तसेच जिल्ह्यातील मध्यम व मोठे पाणी प्रकल्प भरल्यानंतर अतिरिक्त पाणी नदीमध्ये सोडल्यानंतर नदीकाठच्या गावामध्ये पूर परिस्थिती येऊ शकते, त्या अनुषंगाने सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवावा. तसेच सर्व गाव, तालुका व उपविभागीय स्तरावरील यंत्रणांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियंत्रण कक्षाच्या संपर्कात राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष कुमार आशीर्वाद यांनी केले. संभाव्य पूरस्थिती मध्ये जिल्ह्यातील १०५ गावे येतात. या सर्व गावांमध्ये संभाव्य आपत्तीच्या अनुषंगाने संबंधित तालुकास्तरीय यंत्रणांनी योग्य उपाययोजना करून ठेवाव्यात. असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

## महत्वाचे...



### सिद्धार्थ संस्थेतर्फे बुद्ध जयंती साजरी

**सोलापूर, दि. १४ मे-**

सिद्धार्थ मागासवर्गीय बहुद्देशीय सामाजिक विकास संस्थेच्या वतीने सालाबाद प्रमाणे याहीवर्षी तथागत गौतम बुध्द यांची जयंती साजरी करण्यात आली. जगजीवनराम वस्ती मोदी येथे संस्थेच्या वतीने गौतम बुद्ध यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापणा व तसेच डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन सामुदायिक बुध्द वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले. प्रमूख पाहुण्यांच्या उपस्थित व मंडळाचे संस्थापक अध्यक्ष दिपक गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली येथील नागरिकांना भोजन देऊन व तसेच खीर वाटप करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून संभाजी आरमारचे अध्यक्ष श्रीकांत डांगे, कुमार जंगडेकर, बाबू म्हेत्रे, संजय जंगडेकर, रतिकांत कमलापुरे, संतोष कदम, अमित मंचले उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्सव अध्यक्ष मथंन जानवेकर, राहुल सोनवणे, विश्वजीत उपालकर,आकाश सोनवणे, शुभम हुच्चे, विशाल सोनवणे, चेतन गवळी, सुजीत उपलाकर, मारुती गवळी, अजय म्हेत्रे, अविनाश शिंदे, अजय कांबळे, दाविद जगले, ईश्वर कांबळे, सुरज शिंदे, दिपक म्हेत्रे यांनी परिश्रम घेतले.



### संभाजी ब्रिगेडच्या वतीने संभाजी महाराजांना अभिवादन

**सोलापूर, दि. १४ मे-**

स्वराज्याचे दुसरे छत्रपती स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६८ व्या जयंतीनिमित्त संभाजी ब्रिगेडच्या वतीने संभाजी महाराज चौकातील संभाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम यांच्यासह जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, महिला जिल्हाध्यक्ष मीनल दास, शहराध्यक्ष मोनाली धुमाळ, वकील आघाडीचे जिल्हाध्यक्ष गणेश कदम, आशितोष तोंडसे, पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष अरविंद शेळके, राजेंद्र माने, दिलीप निंबाळकर, प्रशांत देशमुख, संतोष सुरवसे, मनीषा कोळी, जयश्री जाधव, प्रियांका शेळके, माधुरी चव्हाण, राजनंदिनी धुमाळ, वैभव धुमाळ, आनंदी धुमाळ उपस्थित होते.

### महाराष्ट्र हरिजन सेवक संघ अध्यक्षपदी माजी आमदार मोहन जोशी

**सोलापूर, दि. १४ मे-**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी स्थापन केलेल्या हरिजन सेवक संघ महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी माजी आमदार प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष तथा



सोलापूर जिल्ह्याचे काँग्रेसचे निरीक्षक मोहन जोशी यांची पाच वर्षांकरिता नियुक्ती करण्यात आली आहे हरिजन सेवक संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉक्टर शंकर कुमार संन्याल यांनी मोहन जोशी यांना नियुक्तीचे पत्र नुकतेच दिले. हरिजन सेवक संघाच्या वतीने आदिवासी भागात वस्तीगृहआणि शाळा चालवले जातात तसेच ग्रामीण भागात गरीब विद्यार्थ्यांसाठी शाळा अभ्यासिका चालविल्या जातात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रचार प्रसाराचे हरिजन सेवा संघा तर्फेकरण्यात येते त्यांचा विस्तार आगामी काळात केला जाईल असे मोहन जोशी यांनी निवडीनंतर सांगितले. या निवडीबद्दल देशाचे माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे यांनी अभिनंदन केले.




### शंभूराजे युवा संघटनेतर्फे मान्यवरांचा सत्कार

**सोलापूर, दि. १४ मे-**

छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त शंभूराजे युवा संघटनेतर्फे विविध क्षेत्रात कार्यरत मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. बुधवार दि.१४ मे रोजी संघटनेतर्फे विविध क्षेत्रात कार्यात डॉ. प्रीती कोनी, अश्विन संगवे, विकास चाटी, ॲड. लक्ष्मण पाटील व शिवभक्त अनिल कवडे यांचा सत्कार करण्यात आला. सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. प्रारंभी छत्रपती संभाजी महाराज यांच्या मुर्तीची पूजा शंभूराजे युवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नितीन चव्हाण, शिवपुत्र मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष राम जाधव, विजय पोखरकर यांच्या हस्ते करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकिता दनके यांनी केले. कार्यक्रमास अशितोष इंगवले, प्रताप खंदारे, ऋषिकेश सुरवसकर, नितेश माने, विजय चव्हाण, एल.डी. चव्हाण, राज पंचारिया, राहुल पवार, अभिजीत पवार, शैलेश विन्नू, साहिल घाडगे, गौरव घाडगे, आलोक भोसले, बलभीम डोके, एस.के.चव्हाण, अनुसे, दत्तात्रय सुरवासकर, राम ढाले अभय पांढरे, निकीता चव्हाण, सुनिल स्वामी, गायत्री चराटे, स्मिता चराटे, नताशा चव्हाण, रिद्धी चव्हाण उपस्थित होते.

## माय भारत नागरी संरक्षण ‘स्वयंसेवक दलाची’ होणार निर्मिती

### युवकांना नोंदणी करण्याचे प्रशासनाचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१४ मे-**

माय भारत, युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय, भारत सरकार, देशभरातील तरुणांना माय भारत नागरी संरक्षण स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्यासाठीचे आवाहन सक्रियपणे एकत्रित करत आहे. माय भारत त्यांच्या युवा स्वयंसेवकांच्या गतिमान नेटवर्कला आणि इतर सर्व उत्साही तरुण नागरिकांना पुढे येऊन माय भारत नागरी संरक्षण स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्याचे आवाहन करते आहे. नोंदणी प्रक्रिया सोपी आणि अधिकृत माय भारत पोर्टल: https://mybharat.gov.in द्वारे उपलब्ध आहे. सज्ज आणि प्रशिक्षित नागरी दलाचे महत्व पूर्वीपेक्षा जास्त आहे आणि माय भारत या राष्ट्रीय मोहिमेत योगदान देण्यास वचनबद्ध आहे. म्हणून, माय भारत त्यांच्या युवा स्वयंसेवकांच्या गतिमान नेटवर्कला आणि इतर सर्व उत्साही तरुण नागरिकांना पुढे येऊन माय भारत नागरी संरक्षण स्वयंसेवक म्हणून नोंदणी करण्याचे आवाहन करते. विद्यमान माय भारत स्वयंसेवक आणि या पदावर देशाची सेवा करू इच्छिणारे नवीन व्यक्ती दोघांनाही सामील होण्यास स्वागत आहे. हा उपक्रम केवळ तरुणांमध्ये नागरी जबाबदारी आणि शिस्तीची तीव्र भावना निर्माण करत नाही तर त्यांना व्यावहारिक जीवनरक्षक कौशल्ये आणि गंभीर परिस्थितीत जलद कार्य करण्यासाठी प्रशिक्षण देखील देतो. तरुणांनी पुढे येऊन या राष्ट्रीय कार्यासाठी सर्व इच्छुक तरुणांना जनतेला एकत्रित करण्याचे आवाहन आहे. अधिक माहितीसाठी, माय भारत, जिल्हा युवा अधिकारी राहुल डोंगरे ( भ्रमणध्वनी क्र: ९९७०८२३९३०) यांच्याशी संपर्क साधावा.

## बोरामणीच्या गवताळ सफारी येथे वन्यप्राणी गणना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

दरवर्षी वनविभागाच्या वतीने बुद्ध पौर्णिमेनिमित्त वनजमिनीवरील पाणवठ्यावर वन्यजीवांची गणना करण्यात येते. यामुळे वन्यजीवांच्या प्रजाती, त्यांची संख्या आणि वावर याबाबत माहिती संकलित केली जाते. या संकलीत केलेल्या माहितीच्या आधारे वनविभागास वनव्यवस्थापन आराखडा तयार करण्यास मदत होते. इतकेच नाहीतर पशुप्रेमींचाही आनंद द्विगुणीत होतो.

में महिन्याच्या सुमारास पाण्याची उपलब्धता मर्यादित असल्याने.वन्यप्राणी रात्री जास्त सक्रिय असतात. पाण्यासाठी वन्यजीव वनजमीनीवरील पाणवठ्यावर येतात. पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशात रात्री देखील दृश्यम नता असल्याने प्राणी निरीक्षण



होऊ शकते म्हणून या दिवसाची निवड केली जाते. दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी येथे वनविभागाने बोरामणी गवताळ सफारी सुरू केली आहे. मागील तीन महिन्यांपासून येथे महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा यांसह ऑस्ट्रेलिया येथील पर्यटकांनी भेट दिली आहे. अल्पावधीत लोकप्रिय ठरलेल्या या सफारीमध्ये दि. १२ व १३ मे रोजी सायंकाळी सहा वाजेपासून दुसऱ्या दिवशी सहा वाजेपर्यंत २४ तासाची प्राणी गणना घेण्यात आली. २६० हेक्टर परिसरात पसरलेल्या गवताळ सफारी मध्ये अकरा किलोमीटर लांब सफारी मार्ग आणि एकुण चार पाणवठ्यावर २४ तासांची प्राणी गणना करण्यात आली. यामुळे गवताळ सफारी आणि परिसरात आढळून येणाऱ्या प्राण्यांच्या प्रजाती व त्यांच्या संख्येची नोंद उपलब्ध झाली आहे.

या प्रगणनेत चार निरीक्षण केंद्रावर काळवीट - १७०, खोकड - ०८, लांडगे -०३, निलगाय-१०, रानडुक्कर-१४, जंगली ससे-१४, मुंगुस-१ ,उदमांजर-१ , रानमांजर-२ ,साळींदर -१ यासह ५८ प्रजातींच्या पक्षांची नोंद घेण्यात आली आहे. सदरची आकडेवारी अंतीम आणि स्थीर नसली तरी या परिसरातील जैवविविधतेची ही प्राथमिक अधिकृत नोंद म्हणता येईल.

या पुढे सातत्याने वन्यजीवांची नोंद घेऊन जैवविविधता नोंदवही नियमीत अद्ययावत करण्यात येईल अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित कुमार गांगर्डे यांनी सांगितले. या प्राणी गणनेबाबत सोलापूर उपवनसंरक्षक कार्यालयाचे सहाय्यक वनसंरक्षक अजित शिंदे, रोहितकुमार गांगर्डे, वनपरिक्षेत्र अधिकारी सोलापूर यांनी मार्गदर्शन केले तर वनपाल सावंत, वनरक्षक शिंदे , सफारी व्यवस्थापक चिंदरकर यांच्यासह वनकर्मचारी व सफारी मार्गदर्शक सहभागी झाले होते.

## परिचारिका या वैद्यकीय सेवेच्या भविष्य आहेत : डॉ. शहा

**सोलापूर दि.१४ मे-**

रुग्णसेवा ही ईश्वरसेवा आहे असे समजून परिचारिका सेवा बजावीत असतात. परिचारिका या डॉक्टर व पेशंट या मधला महत्त्वाचा दुवा आहेत. डॉक्टर काही वेळा पुरते रुग्णा सोबत असतात मात्र पूर्णवेळ परिचारिका त्यांच्या संपर्कात असतात. त्यामुळे परिचारिका या त्यांच्या कुटुंबाचा एक भाग झालेल्या असतात. या व्यस्त रुग्णसेवेतून त्यांनी स्वतःसाठी व आपल्या परिवारासाठी वेळ दिला पाहिजे. परिचारिका या स्वस्थ असतील तर रुग्णसेवा देताना त्या अधिक कार्यक्षमतेने काम करू शकतात. परिचारिकाशिवाय वैद्यकीय क्षेत्र हे अपूर्ण आहे त्यामुळेच परिचारिका या वैद्यकीय सेवेच्या भविष्य आहेत असे प्रतिपादन इंडियन मेडिकल असोसिएशन सोलापूरच्या अध्यक्षा डॉ. मंजुषा शहा यांनी केले.



इंडियन मेडिकल असोसिएशन, सोलापूर व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक परिचारिका दिनानिमित्त परिचारिकांचा सत्कार समारंभआयोजित करण्यात आला होता त्याप्रसंगी डॉ. मंजुषा शहा बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते. यावेळी व्यासपीठावर फॅमिली प्लॅनिंग सोलापूर शाखेचे चेअरपर्सन डॉ. एन. बी. तेली, व्हाईस चेअरपर्सन डॉ. आयेशा रंगरेज, आय.एम.ए. चे उपाध्यक्ष डॉ. राजीव प्रधान, सदस्या ॲड. रत्ना शहा- अंत्रोळीकर, आयएमएचे सचिव डॉ. प्रवीण नरोटे, खजिनदार डॉ. निजामउद्दीन कोतवाल, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदी उपस्थित होते. अध्यक्षीय समारोप डॉ. येळेगावकर यांनी केले. यावेळी परिचारिका साठी संगीत खुर्ची, लिंबू चमचा, गायन व रॅम्प वॉक अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धेतील प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक विजेत्यांना प्रमाणपत्र, भेटवस्तू देण्यात आल्या. तर सोलापूर शहरातल्या विविध रुग्णालयातील ८० होऊन अधिक परिचारिकांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे स्वागत डॉ. प्रवीण नरोटे यांनी केले प्रास्ताविक डॉ. राजीव प्रधान यांनी केले. मान्यवरांचा सत्कार प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी केला. सूत्रसंचालन सुगतरत्न गायकवाड यांनी केले. आभार ॲड. रत्ना अंत्रोळीकर-शहा यांनी मानले.

## ‘सनराईज’मध्ये फाईव्ह टॉपरमध्ये मुलीच



**सोलापूर, दि. १४ मे-**

इयत्ता १० वी च्या बोर्ड परिक्षेत सनराईज इंग्लिश मिडीयम स्कूलचा निकाल १०० टक्के लागला असून, यावर्षीही मुलींनीच निकालात बाजी मारली असल्याची माहिती सचिव ज्ञानेश्वर बोबडे आणि रूपाली बोबडे यांनी दिली. शाळेत प्रथम येण्याचा मान प्रणाली भरत राऊत (९८ टक्के) हिने मिळविला. द्वितीय सिमरन जावेद शेख ९७.८० टक्के, तृतीय पूर्वा पांडुरंग वाघ व श्वेता संग्राम डोके ९६.८० टक्के यांनी घेतला. त्यांचे संस्थापक अध्यक्ष संतोष बोबडे यांनी अभिनंदन केले.



**सोलापूर : श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी ट्रस्टचे अध्यक्ष पद्माकर काळे, राजन जाधव, विनोद भोसले, ज्ञानेश्वर सपाटे, संजय जाधव, बजरंग जाधव, विजय पुकाळे, विजय भोईटे, भाऊसाहेब रोडगे, गणेश डोंगरे, लक्ष्मण महाडिक, सूर्यकांत पाटील, लिंबाजी जाधव, सचिन स्वामी, देविदास घुले आदी उपस्थित होते.**

## सापाचा दंश; एकावर उपचार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे -**

राहत्या घरात असताना सापाने दंश केला. हा प्रकार मोहोळ तालुक्यातील कोळेगाव येथे मंगळवारी रात्री साडेनऊच्या सुमारास उघडकीस आला.

दत्तात्रेय रामचंद्र भोई (वय ५२) असे सर्पदंश झालेले व्यक्तीचे नाव आहे. मंगळवारी रात्री दत्तात्रय हे कोळे गावातील राहत्या घरात होते. त्यावेळी त्यांच्या उजव्या हाताला सापाने दंश केला. त्यानंतर त्यांच्यावर मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास नातेवाईक लक्ष्मण यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.


**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
**सार्वजनिक आरोग्य अभियंता - जलवितरण विभाग**

**पहिली मुदतवाढ**

सोलापूर महानगरपालिकेकडील नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत सन २०२५-२६ विभागीय कार्यालय क्र. ३ कडील विविध ठिकाणचे दुषित पाणी पुरवठा करीता नव्याने पाईप लाईन करणे ई-निविदा बाबत.

1) Tender ID : 2025_SMC_1177128_1
2) Tender ID : 2025_SMC_1177156_1
3) Tender ID : 2025_SMC_1177173_1
4) Tender ID : 2025_SMC_1177183_1

या कामाचे टेंडर शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. १५/०५/२०२५ सकाळी १०.०० वा. पासून पाहण्यास उपलब्ध आहेत.

सही/-
प्र. सार्वजनिक आरोग्य अभियंता
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर



**जाहीरनामा**

**अर्जदार - शेख गौस बाबुमियाँ रा. चाकूर ता. चाकुर**
**विरुध्द**
**गैरअर्जदार - मुख्याधिकारी न.पंचायत कार्यालय, मौ. चाकूर ता. चाकुर**
**अर्ज - कलम १३ (३) जन्म-मृत्यु नौदणी कायदा.**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार - शेख गौस बाबुमियाँ रा. चाकूर ता. चाकुर जि. लातुर यांनी १३(३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांचे मुलाचे शेख शहादाफ गौस यांचा जन्म दि.१८/०६/२०१५ रोजी राहत्या घरी झाला असून, मुख्याधिकारी नगर पंचायत ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकूर ता. चाकूर जि. लातूर येथे जन्म नोंद नसल्याने स्वताच्या जन्म तारखेची नोंदनी मुख्याधिकारी नगर पंचायत (ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकूर ता. चाकूर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोणाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.स. दि.०८/०५/२०२५

पुढील तारीख ३०/०५/२०२५

सही/-
आदेशावरून
तहसिलदार चाकूर



**जाहीरनामा**

**अर्जदार - शेख गौस बाबुमियाँ रा. चाकूर ता. चाकूर**
**विरुध्द**
**गैरअर्जदार - मुख्याधिकारी न.पंचायत कार्यालय, मौ. चाकूर ता. चाकुर**
**अर्ज - कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी कायदा.**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार शेख गौस बाबुमियाँ रा. चाकूर ता. चाकुर जि. लातूर यांनी १३/३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार यांचे मुलाचे शेख सहीस्ता गौस यांचा जन्म दि.०१/०६/२०१२ रोजी राहत्या घरी झाला असून, मुख्याधिकारी नगर पंचायत / ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकूर ता. चाकुर जि. लातुर येथे जन्म नोंद नसल्याने त्याच्या जन्म तारखेची नोंदनी मुख्याधिकारी नगर पंचायत ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकूर ता. चाकुर जि. लातुर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणाच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोणाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.स. दि.०८/०५/२०२५

पुढील तारीख ३०/०५/२०२५

सही/-
आदेशावरून
तहसिलदार चाकूर



**जाहिर प्रगटन**

आमचे आशिल कल्याण सदाशिव शितोळे रा. सिंदफळ ता. तुळजापुर जि. धाराशिव/उस्मानाबाद यांनी दिलेल्या माहितीवरून खालीलप्रमाणे जाहिर प्रगटन देण्यात येते की,

१. हे की, कल्याण सदाशिव शितोळे हे मौजे सिंदफळ ता. तुळजापुर जि. धाराशिव / उस्मानाबाद येथील गट नं. ४०२/१ मधील प्लॉट नं. ७५ ज्याचा ग्रामपंचायत मालमत्ता नं. ७५ क्षेत्र १०० चौ.मि. व प्लॉट नं. ७६ ज्याचा ग्रामपंचायत मालमत्ता नं. ७६ क्षेत्र १०० चौ.मि. या मालमत्तेचे कायदेशिर मालक व कब्जेवहिवाटदार आहेत.
२. हे की, मौजे सिंदफळ ता. तुळजापुर जि. धाराशिव / उस्मानाबाद येथील गट नं. ४०२/१ मधील प्लॉट नं. ७५ ज्याचा ग्रामपंचायत मालमत्ता नं. ७५ क्षेत्र १०० चौ.मि. व प्लॉट नं. ७६ ज्याचा ग्रामपंचायत मालमत्ता नं. ७६ क्षेत्र १०० चौ.मि. या जागेचे मुळ मालक मधुकर मारूती धनके यांनी सदरची जागा श्रीमती लक्ष्मीबाई महादेव काळे यांना नोंदणीकृत दस्त नं. २७८१/२०११ दि.०७/०९/२०११ अन्वये विक्री केलेला असून सदरची दस्त दुय्यम निबंधक कार्यालय तुळजापुर येथे नोंदविलेला आहे.
३. हे की, तद्नंतर श्रीमती लक्ष्मीबाई महादेव काळे यांनी वर नमुद जागा ही आमचे आशिल कल्याण सदाशिव शितोळे यांना नोंदणीकृत दस्त नं. ४२९/२०२० दि. ०५/०२/२०२० अन्वये विक्री केलेले आहे.
४. हे की, आमचे आशिल कल्याण सदाशिव शितांळे यांच्याकडून वर नमुद घरजागेच्या अनुषंगाने श्री. मधुकर मारूती धनके यांनी लक्ष्मीबाई महादेव काळे यांच्या हक्कात दुय्यम निबंधक कार्यालय तुळजापुर येथे नोंदणी करून दिलेला दस्त क्र. २७८१/२०११ दि. ०७/०९/२०११ हा मुळ दस्त, नोंदणी पावती, सुची क्र. २ सह दि. ११/०३/२०२५ रोजी तुळजापुर ते सोलापुर रोडवरील हगली गावच्या हद्दीत हरवलेला आहे. वर नमुद दस्त हरवलेबाबत पोलीस स्टेशन सोलापुर येथे दि. १०/०५/२०२५ रोजी रितसर नोंद केलेली आहे.
५. हे की, वर नमुद खरेदीखताचा मुळ दस्त कोणास सापडल्यास / मिळुन आल्यास ०७ दिवसात खाली नमुद केलेल्या पत्यावर परत करावा तसेच कोणास काही आक्षेप असल्यास खालील पत्यावर कळविण्यात यावे. सदरील दस्त हा विविध शासकिय, निम शासकिय, आर्थिक व इतर कायदेशिर कामासाठी आवश्यक आहे तसेच सदर दस्ताचा इतर कोणीही गैरवापर केल्यास त्यास आमचे आशिल जबाबदार राहणार नाहीत.

सबब जाहिर प्रगटन देण्यात आले. दिनांक : १४/०५/२०२५

सही/-
जाहिर प्रगटन देणार
कल्याण सदाशिव शितोळे
रा. सिंदफळ ता. तुळजापुर
जि. धाराशिव तर्फे

सही/-
ॲड. विष्णु डी. मोरे, धाराशिव
खरेदीखताचा दस्त
परत करण्यासाठीचा पत्ता
ॲड. व्ही. डी. मोरे,
लक्ष्मी निवास, घर नं. १९१८,
कोर्ट कॉलनी, साजा रोड, सांजा
ता. जि. धाराशिव मो.नं. ९५४५५१०३६१

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### कुस्तीत ऋतुजा गुरवला सुवर्ण, अभिमन्यूला रौप्य



**पाटणा :** चिवट झुंज देत महाराष्ट्राच्या ऋतुजा गुरवने खेलो इंडिया स्पर्धेतील कुस्ती मैदानात आपले सुवर्णपदकाचे स्वप्न साकार केले. महाराष्ट्राच्या कुस्तीगीरांनी स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी १ सुवर्ण, १ रौप्य व १ कांस्यपदकाची लयलूट केली. ज्ञानभवन सांस्कृतिक हॉलमध्ये सुरू असलेल्या कुस्ती स्पर्धेत कोल्हापूरच्या ऋतुजा गुरवने य मुलींच्या ४६ किलो गटातील फ्रीस्टाईल प्रकारात हरयाणाच्या अन्नूवर मात केली. तिने दुसऱ्या फेरीत ६-२ गुणांची कमाई करीत अंतिम लढत जिंकली. ग्रीको रोमन प्रकारातील ७१ किलो गटात बारामतीच्या १७ वर्षीय अभिमन्यू चौधरवर हरयाणाच्या विनीतकुमाने बाजी मारली. १-९ गुणांनी अभिमन्यूला रूपेरी यशावर समाधान मानावे लागले.

ग्रीको रोमन प्रकारातील ५१ किलो गटात कोहापूरच्या आदित्य जाधवने यजमान बिहारच्या जहिर रजाकला १०-१ गुण फरकाने लोळवून मात करीत कांस्यपदक पटकावले. ५५ किलो फ्रीस्टाइल प्रकारात सोहम कुंभारने मध्यप्रदेशच्या हितेश कुशवाहवर १०-० गुणांनी एकतर्फी पराभव करीत कांस्यपदकावर नाव कोरले. ५५ किलो फ्रीस्टाइल प्रकारात धनराज जमनीक याला राजस्थानचा राकेश कुमार गैरहजर राहिल्याने कांस्यपदक बहाल करण्यात आले. गुरूवारी स्पर्धेचा समोरापही सुवर्णमय करण्यासाठी महाराष्ट्राचे कुस्तीपटू सज्ज झाले आहेत.

### पुनरागमनासाठी गोलंदाजी प्रशिक्षकांची मदत : स्नेह राणा

**नवी दिल्ली :** माझ्या यशस्वी पुनरागमनासाठी गोलंदाजी प्रशिक्षक अविष्कार साळवी यांनी खूप चांगली मदत केली, असे भारतीय ऑफ स्पिनर स्नेह राणा म्हणाली. अलिकडेच भारतीय महिला क्रिकेट संघाने श्रीलंकेत तिरंगी मालिका जिंकली. या मालिकेत स्नेह राणाने सर्वाधिक १५ बळी टिपण्याची किमया केली व तिलाच मालिकावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. फलंदाजीसाठी अनुकूल असलेल्या श्रीलंकेच्या या खेळपट्टीवर स्नेह राणाने अतिशय हुशारीने व कौशल्याने गोलंदाजी केली व ऑस्ट्रेलियाच्या कॅथरीन फिट्झपॅट्रिकच्या दीर्घकालीन विक्रमाची बरोबरी केली. माझे गोलंदाजी प्रशिक्षक अविष्कर सरांनी कोणत्या प्रकारचे चेंडू त्या खेळपट्टीनवर काम करतील हे सांगितले होते. त्यांनी आम्हाला वेगवान गोलंदाजी कमी करण्याचा व फुलर गोलंदाजी करण्याचा सल्ला दिला होता, असे तिने स्पष्ट केले. इतक्या दिवसांनंतर भारतीय संघाच्या पोशाखात मैदानावर परतण्याची संधी मिळाली, याचा मला खूप आनंद झाला. ही जर्सी पुन्हा घालणे खूप चांगले वाटते, असे राणा म्हणाली. राणाने महिलांच्या एकदिवसीय तिरंगी मालिकेत सर्वाधिक बळी घेण्याचा नूशीन अल खादीरचा विक्रमही मागे टाकला आणि २००२ च्या न्यूझीलंडच्या राहेल पुलरचा १२ बळींचा विक्रमही मागे टाकला. विजयाची गती नेहमीच चांगली असते. दबावाखाली अशा परिस्थितीत चांगली कामगिरी केल्यामुळे तुम्हाला अतिरिक्त आत्मविश्वास आणि अनुभव मिळतो, असे राणा म्हणाली. ''आणि वैयक्तिकरित्या, इतक्या दीर्घ कालावधीनंतर, माझ्या देशासाठी कामगिरी करून मालिकावीर म्हणून निवड होणे - हो, यामुळे मला खूप मदत झाली आहे.'' विशेष म्हणजे, २०२५ च्या महिला प्रीमियर लीग लिलावात राणाला निवडण्यात आले नव्हते आणि नंतर तिला जखमी श्रेयंका पाटीलच्या जागी भारतीय संघात आणण्यात आले.

### बांगलादेशचा मुस्तफिजूर दिल्ली कॅपिटल्सशी करारबद्ध

**नवी दिल्ली :** जेएसडब्ल्यू आणि जीएमआरच्या सह-मालकीच्या फ्रॅन्चायझी दिल्ली कॅपिटल्सने बुधवारी ऑस्ट्रेलियन सलामीवीर जॅक फ्रेझर-मॅकगर्कच्या जागी बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमानला करारबद्ध करण्याची घोषणा केली आहे. जॅक फ्रेझर टाटा आयपीएल २०२५ च्या उर्वरित हंगामासाठी अनुपलब्ध असेल, असे फ्रॅन्चायझीने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. दिल्ली कॅपिटल्सने बुधवारी ऑस्ट्रेलियन फलंदाज जॅक-फ्रेझर मॅकगर्कच्या जागी बांगलादेशचा डावखुरा वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमानला करारबद्ध केले आहे. भारत-पाकिस्तान दरम्यानच्या तणावामुळे जॅक फ्रेझर मायदेशी परतल्यानंतर उर्वरित इंडियन प्रीमियर लीगसाठी संघात परतणार नाही. फ्रेझर-मॅकगर्कला मुक्त केल्यामुळे दिल्ली कॅपिटल्सला नुकसान होणार नाही. पहिल्या सहा सामन्यांनंतर त्याला वगळण्यात आले होते. त्याने केवळ ५५ धावा केल्या होत्या. तसेच, जर मिशेल स्टार्क आला नाही, जसे की व्यापकपणे अपेक्षित आहे, तर डेथ ओव्हर्समध्ये तज्ज्ञ असलेला मुस्तफिजुरचा डावखुरा वेगवान गोलंदाज उपयोगी पडेल. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातील लष्करी संघर्षामुळे मॅकगर्क आणि इतर अनेक परदेशी खेळाडू आपापल्या देशात परतले होते. २०१६ मध्ये आयपीएलमध्ये पदार्पण करणाऱ्या मुस्तफिजूरने यापूर्वी २०२२ आणि २०२३ हंगामात दिल्ली कॅपिटल्सचे प्रतिनिधित्व केले होते.

# महाराष्ट्राची ऐतिहासिक कामगिरी

**खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धा**

**ॲथ्लेटिक्समध्ये दहा सुवर्णांसह १५ पदके**



महिला रिले संघाचे सुवर्णपदक थोडक्यात हुकले

◆ **पाटणा, १४ मे**

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेच्या इतिहासात महाराष्ट्राने प्रथमच ॲथ्लेटिक्सच्या मैदानावर १० सुवर्ण, ३ रौप्य व २ कांस्य अशी एकूण १५ पदकांची लयलूट करीत सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत इतिहास घडविला. ही ऐतिहासिक कामगिरी करताना महाराष्ट्राच्या धावपटूंनी तीन नवीन विक्रम प्रस्थापित केले, हे विशेष.

बुधवारच्या दिवशी हर्षल जोगे, भूमिका नेहासे व अंचल पाटील या मराठमोळ्या खेळाडूंनी सुवर्णपदके जिंकून ॲथ्लेटिक्सचे मैदान गाजविले. याचबरोबर महाराष्ट्राच्या महिला रिले संघाने रौप्यपदकाने स्पर्धेची सांगता केली.

मुलांच्या ८०० मीटर शर्यतीत हर्षल जोगे याने १ मिनिट ५३.९९ सेंकद वेळेसह बाजी मारत महाराष्ट्राला ॲथ्लेटिक्समधील पहिले सुवर्णपदक जिंकून दिले. उत्तर प्रदेशच्या ग्यान सिंग यादवने (१ मिनिट ५४.९० सेंकद) रौप्यपदक, तर उत्तराखंडचा सुरज सिंगने (१ मिनिट ५६.७० सेंकद) कांस्यपदक मिळविले.

नाशिकच्या भूमिका नेहासे हिने मुलींच्या २०० मीटर शर्यतीतील बाजी मारत महाराष्ट्राला आणखी एक सुवर्णपदक जिंकून दिले. तिने ही थरारक लढत २४.५१ सेंकदात जिंकली. हरयाणाच्या प्रिशा मिश्रा (२४.६२ सेंकद) हिने रौप्य, तर तिचीच राज्यसहकारी आरती कुमारीने (२४.९४ सेंकद) कांस्यपदक जिंकले.

मुलींच्या उंच उडीत ठाणे जिल्ह्याच्या अंचल पाटील हिने १.६८ मीटर उडी मारत सुवर्णपदकावर मोहर उमटवली. पश्चिम बंगालची समाप्ती घोष १.५५ मीटर उडीसह रौप्यदपक, तर तमिळनाडूची ब्रिंदा ए ही १.५५ मीटर उडीसह कांस्यपदकाची मानकरी ठरली.

**रिले संघाला सुवर्णपदकाची हुलकावणी**

श्रेष्ठा शेट्टी, भूमिका नेहासे, कशिश भगत, मानसी देहरेकर या महाराष्ट्राया चौकडीला मुलींच्या ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत एका सेंकदाच्या फरकाने सुवर्णपदकाने हुलकावणी दिली. ३ मिनिटे ४९.४४ सेंकद वेळेसह महाराष्ट्राला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. हरयाणाच्या संघाने ३ मिनिटे ४८.४४ सेंकद वेळेसह सुवर्णपदकाला गवसणी घातली. तमिळनाडूला ३ मिनिटे ५१.५५ सेंकद वेळेसह कांस्यपदक मिळाले.

**टेनिसमध्ये महाराष्ट्राला सुवर्णसह चार पदके**

**पाटणा :** महाराष्ट्राच्या टेनिसपटूंनी सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत एक सुवर्ण, एक रौप्य व दोन कांस्य अशा एकूण चार पदकांना गवसणी घातली. मुलींच्या दुहेरीत ऐश्वर्या जाधव-आकृती सोनकुसारे या जोडीला सुवर्णपदक मिळाले. ऐश्वर्या जाधवनने मुलींच्या एकेरीतही रौप्यपदकाची कमाई केली. ◂(वृत्तसंस्था)

### महाराष्ट्राचे सुवर्णपदकाचे अर्धशतक, विजेतेपद निश्चित

**५४ सुवर्ण, ४३ रौप्य, ४४ कांस्य पदकांसह पदकतालिकेत अव्वल स्थानावर**

बिहारमधील सातव्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेचे महाराष्ट्राचे सर्वसाधारण विजेतेपद जवळजवळ निश्चित झाले आहे. ५४ सुवर्ण, ४३ रौप्य, ४४ कांस्य पदकांसह पदकतक्यात अव्वल स्थानावर महाराष्ट्र कायम आहे. बुधवारी सुवर्णपदकाचे अर्धशतक साजरा करणारा महाराष्ट्र एकमेव राज्य ठरले आहे.

सलग तिसऱ्या स्पर्धेत विजेतेपद पटकावून महाराष्ट्र हॅट्ट्रिकचा पराक्रम गुरूवारी करणार आहे. ३० सुवर्ण, २३ रौप्य, ४३ कांस्य पदकांसह हरियाणा दुसऱ्या स्थानावर आहे. यामुळे महाराष्ट्राचे खेलो इंडिया स्पर्धेतील पाचव्या विजेतेपदावर आपले नाव कोरले आहे. आतापर्यंत झालेल्या सहा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने चार वेळा, तर हरयाणाने दोन वेळा या स्पर्धेचे सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले आहे.

# दक्षिण आफ्रिकेचे खेळाडू आयपीएल प्लेऑफला मुकण्याची शक्यता

◆ **जोहान्सबर्ग, १४ मे**



ऑस्ट्रेलियाविरुद्ध होणाऱ्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी निवडलेले दक्षिण आफ्रिकेचे खेळाडू आयपीएल प्लेऑफला मुकण्याची शक्यता आहे. दक्षिण आफ्रिका क्रिकेट मंडळ आयपीएलच्या वचनबद्धतेपेक्षा राष्ट्रीय कर्तव्याला प्राधान्य देण्यावर ठाम आहे.

आयपीएल १७ मे रोजी पुन्हा सुरू होईल आणि अंतिम सामना ३ जून रोजी होणार आहे, अशी घोषणा बीसीसीआयने सोमवारी केली.

तथापि, सुधारित वेळापत्रकामुळे डब्ल्यूटीसी अंतिम फेरीतील ऑस्ट्रेलिया व दक्षिण आफ्रिकेतील खेळाडू अडचणीत आले आहेत. फ्रॅन्चायझी व बीसीसीआयने परदेशी क्रिकेट मंडळांना स्पर्धेच्या उर्वरित सामन्यांसाठी त्यांचे खेळाडू उपलब्ध करून देण्याचे आवाहन केले आहे. तथापि, क्रिकेट दक्षिण आफ्रिकेने (सीएसए) डब्ल्यूटीसी अंतिम फेरीच्या तयारीसाठी आपली वचनबद्धता पुन्हा व्यक्त केली आहे.

'परत येणे किंवा खेळणे किंवा पुढे जाणे हा वैयक्तिक निर्णय आहे, असे सीएसएचे राष्ट्रीय संघ आणि उच्च कामगिरी संचालक एनोच एनक्वे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

डब्ल्यूटीसी तयारीच्या बाबतीत आमच्या मूळ योजनेवर ठाम राहणे. २६ मे ही कसोटी खेळाडूंसाठी परतण्याची शेवटची तारीख आहे. मूळ योजना बदलत नाहीत व प्रथम प्राधान्यावर डब्ल्यूटीसी अंतिम सामना आहे. आम्हाला अंतिम सामन्यात खेळायचे आहे, त्यामुळे आम्ही गत एक-दोन दिवसांपासून त्यांच्याशी संवाद साधत आहोत, असे ते म्हणाले.

११ जूनपासून लंडनमध्ये सुरू होणाऱ्या डब्ल्यूटीसी अंतिम फेरीसाठी दक्षिण आफ्रिकेतील ८ खेळाडू - कॅगिसो रबाडा (गुजरात टायटन्स), लुंगी नगिदी (रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू), ट्रिस्टन स्टब्स (दिल्ली कॅपिटल्स), एडन मार्कराम (लखनौ सुपर जायण्ट्स), रायन रिकेल्टन (मुंबई इंडियन्स), कॉर्बिन बॉश (मुंबई इंडियन्स), मार्को जॅन्सन (पंजाब किंग्ज) आणि वियान मुल्डर (सनरायझर्स हैदराबाद) यांना दक्षिण आफ्रिकेच्या संघात स्थान देण्यात आले आहे. सध्या गुजरात टायटन्स, आरसीबी, मुंबई इंडियन्स, पंजाब किंग्ज, दिल्ली कॅपिटल्स आणि लखनौ सुपर जायण्ट्स हे आयपीएल प्लेऑफ स्थानासाठी शर्यतीत आहेत.

दक्षिण आफ्रिकेचे मुख्य प्रशिक्षक शुक्री कॉनराड यांनी सीएसएच्या भूमिकेला दुजोरा दिला.

आयपीएल-बीसीसीआय सोबत आमचा सुरुवातीचा करार असा होता की, अंतिम सामना २५ तारखेला होणार होता, आमचे खेळाडू २६ तारखेला परततील, जेणेकरून त्यांना ३० तारखेला उड्डाण करण्यापूर्वी पुरेसा वेळ मिळेल. सध्या तरी, आम्ही यावर ढकलत नाही आहोत. आम्हाला आमचे खेळाडू २६ तारखेला परत हवे आहेत, असे तो म्हणाला.

'माझ्यापेक्षा जास्त पगार असलेल्या लोकांमध्ये हीच चर्चा सुरू आहे. ते त्यावर काम करत आहेत. आम्हाला आमचे खेळाडू २६ तारखेला परत हवे आहेत आणि आशा आहे की ते फलदायी ठरेल.''

२२ एप्रिल रोजी दक्षिण काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे भारत आणि पाकिस्तानमधील लष्करी संघर्षामुळे आयपीएल हंगाम ९ मे रोजी स्थगित करण्यात आला होता. दुसऱ्या दिवशी जाहीर झालेल्या युद्धबंदीमुळे स्पर्धा पुन्हा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला. नवीन वेळापत्रकानुसार, लीग टप्पा २७ मे रोजी संपेल, २९ मे ते ३ जून दरम्यान प्लेऑफ खेळवण्यात येतील, ज्या तारखा सीएसएच्या वर्ल्ड कपच्या तयारीशी जुळतील. ◂(वृत्तसंस्था)

# सोलापुरच्या आकृती सोनकुसरेला लॉन टेनिस स्पर्धेत सुवर्ण

**खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धा**

**कोल्हापूरच्या ऐश्वर्या जाधवसोबत तेलंगणाच्या जोडीस नमविले**

**सोलापूर, दि. १४ मे-**

पाटणा (बिहार) येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत सोलापूरच्या आकृती सोनकुसरे हिने सुवर्ण पदक पटकाविले. तिने कोल्हापूरच्या ऐश्वर्या जाधव सोबत तेलंगणाच्या दंडू व बसीरेड्डी या जोडीचा ६-०, ६-४ असा पराभव केला. आकृतीला महाटेनिस फाऊंडेशनने पुरस्कृत केले असून ती सध्या पुणे येथे हेमंत बेंद्रे आणि संदीप चौधरी यांच्याकडून प्रशिक्षण घेते.

तिचे राज्य संघटनेचे अध्यक्ष प्रशांत सुतार व जिल्हा संघटनेचे सचिव राजीव देसाई यांनी अभिनंदन केले.



# आशिया चषक हॉकी स्पर्धेत पाकिस्तान संघाचा सहभाग अनिश्चित

**नवी दिल्ली, १४ मे**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर दोन्ही देशांमधील तणावामुळे यावर्षी भारतात होणाऱ्या हिरो आशिया चषक हॉकी स्पर्धेत पाकिस्तान संघाचा सहभाग अनिश्चित आहे. आम्ही सरकारच्या दिशा-निर्देशाची प्रतीक्षा करत आहोत.

स्पर्धेला अजून सुमारे तीन महिने आहेत, पण आमचे सरकार आम्हाला जे सुचवेल त्याचे आम्ही पालन करू, याबद्दल कोणतेही दुमत नाही, असे हॉकी इंडियाने म्हटले आहे. आशिया चषक हॉकी स्पर्धा २७ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर दरम्यान बिहारमधील राजगीर येथे होणार आहे.

यजमान भारत, पाकिस्तान, जपान, कोरिया, चीन, मलेशिया, ओमान आणि चीन तैपेई हे या आशिया चषकाच्या १२ व्या आवृत्तीत सहभागी होणार आहेत, पुढील वर्षी नेदरलॅण्ड व बेल्जियममध्ये होणाऱ्या विश्वचषकासाठी ही पात्रता स्पर्धा असेल. आताच काहीही सांगणे घाईचे आहे, परंतु आम्ही या मुद्द्यावर सरकारच्या निर्देशांचे पालन करू, असे हॉकी संघाचे सरचिटणीस भोलानाथ सिंह यांनी वृत्तसंस्थेला सांगितले. आम्ही सध्या काहीही भाकित करू शकत नाही, विशेषतः अलिकडच्याच पहलगाम हल्ल्यानंतर आणि त्यानंतर भारताने चालवलेल्या ऑपरेशन सिंदूरनंतर परिस्थिती बदलली आहे, असे ते म्हणाले.

# सोलापूरचा पुण्यावर विजय

**राज्य निमंत्रित १६ वर्षांखालील क्रिकेट : अव्वल साखळीस पात्र**






**सोलापूर, दि. १४ मे-**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या १६ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत सोलापूर जिल्हा संघाने एफ गटात २१ गुणासंह अव्वल स्थान पटकाविले. यामुळे सोलापूर अव्वल साखळी स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. शेवटच्या साखळी सामन्यात त्यांनी पुण्याच्या एमसीव्हीएस संघावर पहिल्या डावाच्या अधिक्यावर विजय मिळवित ३ गुण वसूल केले.

छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या सामन्यात सोलापूरने प्रथम फलंदाजी करताना ९० षटकात ७ गडी बाद ३०० धावा केल्या. यात सोहम कुलकर्णी याने नाबाद १३७ धावा करीत शानदार शतक साजरे केले. दर्शील फाळके (४०), इंदात जैन (२५) व विरांश शर्मा (२२) यांनी त्यास साथ दिली. पुण्याकडून साद पठाण याने ७५ धावात तर मनवेंद्र सिंह ४१ धावात प्रत्येकी दोन बळी टिपले. ३०१ धावांचे विजयी लक्ष्य गाठणाऱ्या पुण्याचा डाव १९३ धावात संपुष्टात आला. पुण्याकडून ओम भगत (४०) व साद साबीर (४३) यांनी कामगिरी केली. सोलापूरकडून सोहम कुलकर्णीने ६३ धावात ४ बळी, मयंक पात्रेने २६ धावांत ३ बळी टिपले. श्रवण माळीने ३३ धावांत दोन तर इदांत जैन याने १६ धावात एक गडी बाद केला.

# शासनाच्या महाराष्ट्र खो-खो संघ निवडीत वशिलेबाजीच्या वृत्ताची दखल

## क्रीडा उपसंचालक : राष्ट्रीय खेळाडू असल्यामुळे चाचणीस पाठवले

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ -**

शासनाच्या महाराष्ट्र खो-खो संघ निवडीत वशिलेबाजी हे वृत्त दैनिक तरुण भारतमध्ये प्रसिद्ध झाल्यानंतर क्रीडा उपसंचालक कार्यालय खडबडून जागे झाले आहे.

पुणे विभागाचे क्रीडा उपसंचालक युवराज नाईक यांनी दिलेल्या खुलासानुसार नरेश चांदणे हा खेळाडू गतवर्षी राष्ट्रीय स्पर्धेतील सुवर्णपदक विजेता खेळाडू आहे. त्यामुळे त्याची राज्य चाचणीसाठी शिफारस केली. त्यामुळे सदरच्या वृत्तात काही तथ्य नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

परंतु क्रीडा खात्याच्या महाराष्ट्र संघ निवड निकषातील नियम क्रमांक ८.११ नुसार जे खेळाडू विभागीय स्पर्धेत/चाचणीत सहभागी होऊ शकले नाहीत, अशा खेळाडूंना राज्य स्पर्धेसाठी होणाऱ्या निवड चाचणीसाठी पूर्ण खात्री करूनच उपसंचालक शिफारस करतील


हा नियम प्राथमिक स्तरावर सहभागी झालेल्या खेळाडूला जिल्हा किंवा विभाग स्तरावर सहभागी होता आले नाही. अशा परिस्थितीत गतवर्षीच्या राष्ट्रीय स्पर्धेत प्राविण्य प्राप्त केलेला खेळाडू क्रीडा उपसंचालक निवड चाचणीसाठी शिफारस करू शकतात. मात्र, नरेश चांदणे हा खेळाडू जिल्हास्तरावर सहभागी होऊन त्याची निवड विभाग स्तरावर खेळाडूंमध्ये करण्यात आलेली होती आणि तो विभागीय निवड चाचणीकरिता उपस्थित राहिलेला होता. त्या चाचणीतून त्याची निवड झाली नसल्याने क्रीडा उपसंचालकानी नियमबाह्य शिफारस करून निवड समितीच्या संगणमताने राष्ट्रीय स्पर्धेसाठी आणि नुकत्याच झालेल्या खेलो इंडिया स्पर्धेसाठीही निवड केली आहे.



**शिल्लक फुटबॉलचा मात्र खुलासा नाही**

भारतात होणाऱ्या १७ वर्षांखालील जागतिक फुटबॉल स्पर्धेच्या निमित्ताने वातावरण तयार होण्यासाठी राज्य शासनाच्या क्रीडा विभागाने एकाच दिवशी म्हणजे १० लाख विद्यार्थ्यांनी फुटबॉल खेळावे असे नियोजन १५ सप्टेंबर २०१७ मध्ये केले होते. यासाठी राज्य शासनाने प्रत्येक शाळांना तीन फुटबॉल देण्याचे जाहीर केले होते. यासाठी सोलापूर शहर जिल्ह्यातून १०१२ शाळांची ऑनलाइन नोंदणी झाली होती. तेव्हा युवराज नाईक हे सोलापुरात जिल्हा क्रीडा अधिकारी असताना सर्व शाळांना प्रत्येकी ३ प्रमाणे ३०३६ फुटबॉल वाटप झाल्याचा व शिल्लक फुटबॉल नसल्याचा अहवालही त्यानी वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविला होता. परंतु फुटबॉलचे कित्येक बॉक्स जिल्हा क्रीडा कार्यालयात पडून होते. याबाबतचे वृत्त सप्टेंबर २०१७ मध्ये वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्यानंतर याची चौकशी झाली. ती चौकशी कागदावरच राहिली आणि अजूनपर्यंत क्रीडा कार्यालयात हे फुटबॉल शिल्लक आहे, असे वृत्तही तरुण भारतमध्ये नुकतेच प्रसिद्ध झाले होते. परंतु याचा खुलासा मात्र नाईक यांनी केलेला नाही.

## नियम काय?: विभागीय चाचणीस उपस्थित असल्यानंतर पाठवता येत नाही



नियम - ८.११- राष्ट्रीय स्पर्धेसाठी राज्याचा संघ निवडण्याची कार्यपध्दती-

राज्य स्पर्धेत सहभागी झालेल्या संघातून त्या खेळाच्या मान्य संघ संख्येच्या दुप्पट खेळाडूं तसेच विभागीय स्तरावरील निवड चाचणीसाठी शिफारस केलेल्या व विभागीय उपसंचालकांनी शिफारस केलेल्या अशा सर्व खेळाडूंची निवड चाचणी आयोजित करावी.

अधिकृत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाल्यामुळे अथवा अशा राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय स्पर्धापूर्व शिबीरामध्ये उपस्थिती द्यावी लागल्यामुळे जे खेळाडू विभागीय स्पर्धेत सहभागी होवू शकले नाहीत अशा खेळाडूंना राज्य स्पर्धेसाठी आयोजित होणाऱ्या निवड चाचणीसाठी पूर्ण खात्री करुन विभागीय उपसंचालक शिफारस करतील.

राज्याचा संघ निवडताना राखीव खेळाडूंची निवड करावी. संघातील एखादा खेळाडू स्पर्धेस उपस्थित राहणार नसेल तर क्रमाने उत्कृष्ट किंवा आवश्यकतेनुसार संघातील खेळाडूंच्या जागेनुसार राखीव खेळाडूंना संधी देण्यात यावी.

# सोलापूर विद्यापीठाचा अरुण राठोड भारताच्या विद्यापीठ संघात



**जागतिक विद्यापीठ स्पर्धेसाठी हाफ मॅरेथॉन प्रकारात दुसऱ्यांदा निवड**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मे -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या अरुण धनसिंग राठोड याची जागतिक विद्यापीठ हाफ मॅरेथॉन स्पर्धेसाठी भारताच्या विद्यापीठ संघात निवड झाली आहे. निवडीचे पत्र विद्यापीठात प्राप्त झाले असल्याची माहिती विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. अतुल लकडे यांनी दिली. सलग दुसऱ्यांदा त्याची निवड झाली असून जर्मनी येथे १६ ते २७ जुलै दरम्यान होणाऱ्या स्पर्धेत तो भाग घेईल.

### यंदा कामगिरी नक्की सुधारणार

गतवर्षी म्हणजेच २०२३ मध्ये सोलापूर विद्यापीठाकडून जागतिक विद्यापीठ अर्ध मॅरेथॉन शर्यतीत प्रथमच सहभागी होऊन सुवर्ण पदकापासून २.२० मिनिटे पिछाडीवर होतो. निवडीचे पत्र विद्यापीठात प्राप्त झाले आहे. त्यासाठी मी सोलापूर व नाशिक येथे कसून सराव करीत आहे. यंदा माझ्या कामगिरीत नक्की सुधारणा होईल

**- अरुण राठोड**

**आश्रम शाळा बोरोटीतून कामगिरीची सुरुवात**

परमानंदनगर बाबलाद तांडा (ता. अक्कलकोट) येथील अरुण. आश्रम शाळा बोरोटी येथे सातवीत असतांनाच महाबुले सरांच्या मार्गदर्शनाखाली ४०० व ६०० मीटर धावण्याच्या शर्यतीत त्याने प्रथम स्थान मिळविले. त्यानंतर रुद्रेवडी येथील म्हेत्रे कनिष्ठ आश्रम महाविद्यालयात ३ व ५ हजार मीटर धावण्याच्या शर्यतीत भाग घेतला. रवी राठोड यांनी नेहरूनगर शासकीय मैदानावर स्वामी समर्थ अकॅडमीमध्ये त्यांचा तंत्रशुद्ध सराव घेतला. तेथून त्याची ३, ५ व १० हजार मीटर धावण्याची शर्यतीत जिल्हा, राज्य व राष्ट्रीय अशी कामगिरी बहरली. संगमेश्वर, शिवाजी रात्र महाविद्यालय व सुशीलकुमार शिंदे शारीरिक शिक्षण महाविद्यालय व विद्यापीठ स्पर्धाबरोबरच असोसिएशनच्या १५ हाफ मॅरेथॉन व ३ फुल मॅरेथॉनमध्ये विजेता ठरला. ५० किलो मिटरच्या १ अल्ट्रा मॅरेथॉनमध्येही बाजी मारली. प्राचार्य डॉ. सुरेश पवार, शारीरिक शिक्षण संचालक आनंद चव्हाण, संतोष गवळी, विद्यापीठाचे प्रशिक्षक किरण चोकाककर व अशोक पाटील यांचे मार्गदर्शन त्याची कामगिरी आंतरराष्ट्रीय पातळीवर उंचावण्यात मोलाची ठरली.

### अरुणची आतापर्यंतची कामगिरी

- चीनमध्ये झालेल्या जागतिक विद्यापीठ मॅरेथॉन स्पर्धेत सुवर्ण पदकापासून २.२० मिनिटे पिछाडीवर.
- १७व्या एशियन क्रॉस कंट्री स्पर्धेत कांस्य व सांघिक सुवर्ण
- एकता आंतरराष्ट्रीय स्पर्धेत १४वे स्थान
- १३ राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग, १० व २१ किलोमीटरमध्ये रौप्य व सुवर्ण
- विद्यापीठ चौथ्या खेलो इंडियात १० किलोमीटरमध्ये सुवर्ण व ५ किलोमीटर मध्ये कास्य.
- अखिल भारतीय विद्यापीठ हाफ मॅरेथॉन स्पर्धेत दोन सुवर्ण, दहा हजार मीटर धावणे सुवर्ण

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्वाचे...



### ओन्ली बहुउद्देशीय संस्थेच्या शिबिरात १५१ जणांचे रक्तदान

**बार्शी, दि. १४ मे-**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज व संत महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त ओन्ली समाज सेवा बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने श्रीराम निवास, वाणी प्लॉट येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. यावेळी १५१जणांनी रक्तदान केले. प्रथम धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज व महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस प्रमुख पाहुणे बार्शी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव पी. टी. पाटील, श्रद्धा हॉस्पिटलच्या डॉ. मीनाक्षी पाटील, उद्योजक प्रवीण कसपटे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन शिबिरास सुरुवात करण्यात आली. हे शिबिर श्रीमान रमाभाई शहा रक्तपेढी बार्शी यांच्याकडे करण्यात आले. संस्थेच्यावतीने पुढील काळात घेत असलेल्या उपक्रमास बार्शीतील सर्व हितचिंतकाने मित्र परिवार यांनी असेच सहकार्य करावे, अशी भावनिक प्रतिक्रिया संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी यांनी केली.

### निमगाव विद्यामंदिरचा निकाल ९२ टक्के

**पिलीव, दि.१४ मे-**

माळशिरस तालुक्यातील निमगाव येथील जवाहर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित निमगाव विद्यामंदिर प्रशालेचा दहावीचा निकाल ९२ टक्के लागला असुन श्रीजित धनाजीराव जाधव हा ९४.६० टक्के गुण मिळवून वेळापुर केंद्रात प्रथम आला आहे. प्रशालेत श्रध्दा युवराज मगर ८६.४० टक्के द्वितीय तर समृद्धी सचिन पवार ८२.६० टक्के तृतीय आला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे जवाहर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्रीनिवास इनामदार, सचिवा स्वयंप्रभा इनामदार, सचिव बी. एल. जाधव, मुख्याध्यापक टी. एच. ननवरे यासह संस्थेचे पदाधिकारी सर्व शिक्षक व निमगाव ग्रामस्थांनी अभिनंदन केले.





### 'दक्षिण'मधील कर्मचाऱ्यांच्या यशस्वी पाल्यांचा सत्कार

**वळसंग, दि.१४ मे-**

दहावी व बारावी परीक्षेत यश मिळवलेल्या दक्षिण सोलापूर पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा गटशिक्षणाधिकारी जयश्री सुतार यांच्या हस्ते नुकताच सत्कार करण्यात आला. कार्यालयातील विषयतज्ञ सिद्रामय्या स्वामी यांची कन्या मयुरी स्वामी तसेच तात्यासाहेब सातपुते यांची कन्या जान्हवी सातपुते यांचा सत्कार झाला. यावेळी व्यवसाय मार्गदर्शन व शैक्षणिक संधी याबाबत सूरज ओहोळ यांनी मार्गदर्शन केले. या कर्यक्रमासाठी वळसंग बिटचे विस्तार अधिकारी गुरुबाळ सनके तसेच मंद्रूप बिटचे विस्तार अधिकारी आय्युब कलबुर्गी उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### अजय देशपांडे



**सांगोला,दि.१४ मे-**

सांगोला शहरातील मेनरोड येथील रहिवासी अजय विनायक देशपांडे (वय-६९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ, वहिनी असा परिवार आहे. हिंदू महासभा, आरएसएस, जनसंघ, भाजप असा त्यांचा राजकीय प्रवास होता. पत्रकार विठ्ठल देशपांडे यांचे ते बंधू होत.

### रामचंद्र कोकरे



**सांगोला, दि.१४ मे-**

सांगोला शहरातील महूद रोड, कोकरे वस्ती येथील रहिवासी रामचंद्र आत्माराम कोकरे यांचे मंगळवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, जावई, भाऊ, बहीणी असा मोठा परिवार आहे. त्यांनी बेंगलोर, मुंबई याठिकाणी फार्मासुटीकल कंपनीमध्ये मॅनेजर या पदावर ३३ वर्षे सेवा केली.

### गिरझणी येथील जवानाचे निधन

**अकलुज,दि.१४ मे-**

गिरझणी (ता.माळशिरस) येथील भारतीय सैन्यात नाईक पदावर कार्यरत असलेले जवान लक्ष्मण संजय पवार यांचे प. बंगाल येथील बाग-डोगरा येथे शारीरीक अपघाताने निधन झाले आहे. याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी, लक्ष्मण संजय पवार (वय-३३) हे सध्या पश्चिम बंगाल येथे भारतीय सैन्यात आपले कर्तव्य पार पाडत होते. ते पंधरा दिवसांमध्ये सेवानिवृत्त होणार होते. त्यामुळे त्यांनी त्यांच्या कुटुंबीयांना गावी पाठविले होते. जवान लक्ष्मण पवार यांच्या निधनाविषयी बोलताना प्रांताधिकारी विजया पांगारकर यांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचा हवाला देत जवान लक्ष्मण पवार हे शारीरिक अपघाताने मयत झाल्याचे सांगितले. तसेच प.बंगालवरुन त्यांचे पार्थिव विमानाने पुणे व नंतर मोटारीने गिरझणी गावी आणण्यात येणार आहे. याविषयी त्यांचे बंधु विकी पवार यांनी सांगितले, २०११ साली भाऊ लक्ष्मण हे भारतीय सैन्यात दाखल झाले होते. नंतर त्यांनी लेह-लडाक, हिमाचल प्रदेश-डलहौशी, जम्मू-काश्मिर, पुणे यासह दोन वेळा प.बंगाल येथे कर्तव्य पार पाडले होते. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, नऊ वर्षीय मुलगा, भाऊ, बहीण असा परीवार आहे.



# धगधगता लाव्हा स्वराज्याचा छावा; छत्रपती संभाजी महाराज की जय...!

## स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीउत्सव मिरवणुकीने दुमदुमला परिसर

## ऐतिहासिक देखाव्यातून विविध मंडळांनी छत्रपती संभाजी महाराजांचे रेखाटले जीवनचरित्र



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मे**

धर्मवीर, स्वराज्य रक्षक, स्वराज्याचे धाकले धनी, श्रीमंत श्रीछत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अवघे सोलापूर शहर भगवेमय झाले होते. भगवा झेंडा, गुलालाची मुक्त उधळण, अन् मुखी छत्रपती संभाजी महाराज यांचा जयघोष करत सोलापूर शहरात ऐतिहासिक अशा देखाव्यांनी मि रवणूक काढण्यात आली. शहरातील पार्क चौकातून सदरची मिरवणूक सुरू झाली. या ऐतिहासिक मि रवणुकीमध्ये सुमारे १४ मंडळांनी सहभाग नोंदवला होता.

स्वराज्याचे धाकले धनी, छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमि त्ताने सोलापूर शहरात शिवशंभु प्रेमींनी सालाबाद प्रमाणे यंदाच्या वर्षी देखील उत्साहपूर्ण वातावरणात ऐतिहासिक अशी मिरवणूक काढली. नुकताच सर्वत्र प्रदर्शित झालेल्या ''छावा'' या हिंदी चित्रपटातून संबंध भारतामध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या ऐतिहासिक अशा जीवन चरित्राची माहिती सर्वदूर पसरली आहे. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीच्या औचित्य साधून विविध मंडळांच्या वतीने मिरवणुकीमध्ये छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावरील आधारित सत्यघटनेचे देखावे सादर करण्यात आले. संभाजी म हाराज यांच्या बालपणापासून ते शेवटच्या कैदेतील क्षणापर्यंतचे सर्व देखावे या मिरवणुकीमध्ये याची देही याची डोळा अनुभवण्यास मिळाले. या मिरवणुकीमध्ये सहभागी झालेले शिवशंभू प्रेमींनी हा देखावा अनुभवून मुखी शंभू नामाचा गजर केला.

दरम्यान, सायंकाळी पाच वाजता हुतात्मा चौकातून ऐतिहासिक मिरवणूक सुरू झाली. या मिरवणुकीमध्ये श्रीमंतयोगी प्रतिष्ठान यांच्यावतीने बुधभूषण हा देखावा सादर करण्यात आला होता. या देखाव्यात छत्रपती संभाजी महाराज यांच्या बालपणापासून ते राज्याभिषेकापर्यंतचे क्षणचित्र दाखवण्याचा आले. या देखाव्यातून छत्रपती संभाजी महाराज यांनी आजवर केलेले युद्धाची माहिती प्रसारित करण्यात आली. त्याच पद्धतीने धाकल धनी प्रतिष्ठानच्यावतीने अनाजी दत्तो यांच्या हत्तीच्या पायी देण्याचा शिक्षेचा देखावा सादर केला होता. छावा सामाजिक संस्थेच्या वतीने किल्ले पुरंदर हा देखावा सादर केला होता. छत्रपती संभाजी महाराज यांची सिंहासनाधीश्वर मूर्ती किल्ले पुरंदर येथे विराजमान करण्यात आली होती. तसेच भोईराज तालीम यांच्या वतीने किल्ल्याचा देखावा साकारण्यात आला होता. शंभूराजे राजमुद्रा साकारून छत्रपती संभाजी महाराज यांना अभिवादन करण्यात आले.

वडार समाज रविवार पेठ तालीम यांच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज तसेच प्रभू श्री राम यांच्या पूर्णाकृतीम ूर्तीच्या देखावा साकारण्याचा आला होता. शिवतेज प्रतिष्ठानच्या वतीने देखील या मिरवणुकीमध्ये छत्रपती संभाजी महाराज आणि कवी कलश यांचा कैदेतील देखावा साकारला होता. धर्म शिलाईन स्वराज्य प्रतिष्ठान यांच्या वतीने सिंहासनाधीश्वर छत्रपती संभाजी महाराज यांची प्रतिकृती देखावा साकारला होता. चंद्रासारखा तेजस्वी माझा शंभूराजा असा उल्लेख करण्यात आला होता. त्याच पद्धतीने मावळा प्रतिष्ठान यांच्यावतीने श्री तुळजाभवानी मातेचा स्टँडिंग शो करण्यात आला होता. पत्रा तालीमच्या वतीने रुद्र शंभू प्रतिष्ठानने मिरवणुकीत सहभाग नोंदवला.'' हाथी,घोडे, तोफे, तलवारे, फौज तो तेरी सारी है ... पर जंजीर मे जकडा राजा मेरा अभी सब पे भारी है...! घोषवाक्याने सर्व शंभू प्रेमींचे लक्ष वेधून घेतले होते. छत्रपती संभाजी महाराज यांनी अल्पावधीतच ग्रंथकार म्हणून आपली ख्याती सर्वदूर पसरवली होती. संभाजी महाराजांना अनेक भाषा अवगत होत्या. अल्पवयातच त्यांनी बुधभूषण हा ग्रंथ लिहून काढला. या ग्रंथामध्ये त्यांनी नीतीशास्त्र, राजधर्म, धर्म, राजकारण, प्रशासन यावर प्रकाश झोत टाकला होता. राजाने राजधर्म आणि प्रशासन कसे चालवावे यासंबंधी माहिती या ग्रंथामध्ये समाविष्ट केली होती. एक आदर्श राजा कसा असावा याचे ज्ञानदेखील त्यांनी यामधून दिले होते.

### एलईडी शो, लाईट शो आणि डॉल्बीने घेतले लक्ष वेधून

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या मि रवणुकीमध्ये लेझर शो, लाईट शो, एलईडी शो तसेच डॉल्बी सिस्टीम लावण्यात आली होती. या माध्यम ातून छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित छायाचित्रे तसेच गीत प्रसारित करून मिरवणुकीमध्ये उत्साह भरला. लाईट शो तसेच एलईडी वॉलच्या माध्यमातून मिरवणुकीत अधिक रंगत आणली गेली.

### ऐतिहासिक देखाव्यातून जीवनचरित्र अधोरेखित

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवन चरित्राचे दर्शन या देखाव्यातून घडवण्यात आले. महाराजांच्या जन्मापासून ते मृत्यूचे सर्व क्षणचित्रे देखाव्यांच्या माध्यमातून सादर केले. छत्रपती संभाजी महाराजांनी वयाच्या ३२ व्या वर्षात एक ही युद्ध गमावले नव्हते. सर्व युद्धात त्यांनी आपले राजकीय कौशल्य आणि चाणक्य नीति यांचा वापर करून मुघलांसह पोर्तुगीज, इंग्रज, डच आणि शत्रूंना सह्याद्रीमध्ये धूळ चारली. त्यांनी बुऱ्हाणपुर, कोकण, रामशेज, वाई, गोवा, फौंड असे विविध लढाई जिंकून शत्रूला नेस्तनाबूत केले होते. त्यांच्या शौर्याची गाथा येणाऱ्या पिढीला कळावी, याच उद्देशातून विविध देखावे सादर करण्यात आले होते.

### कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस बंदोबस्त

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या जयंती उत्सव मिरवणूक मार्गावर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी शहर पोलीस आयुक्तालयाच्या वतीने हुतात्मा चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक या मिरवणूक मार्गावर पोलिस अधिकारी, कर्मचारी, महिला पोलीस आणि होमगार्ड यांचा बंदोबस्त लावण्यात आला होता.

# इंदूमती जंगालेंचा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा

## वह्याने तुलाभार; गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे होणार वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १४ मे-**

इंदुमती उद्धव जंगाले यांच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यानिमित्ताने त्यांची शैक्षणिक वह्याने तुलाभार करण्यात आला. या वह्या गुणवंत, गरीब, गरजू विद्यार्थ्यांना देण्यात येणार आहेत. कार्यक्रमास कवी, लेखिका आरती काळे उपस्थित होते.

वाचनाची गायनाची भजनाची धार्मीक कार्याची आवड असणाऱ्या निटनेटकेपणा टापटिप स्वच्छता प्रिय प्रेमळ वक्तशिरपणा जपणाऱ्या अशा बहुगुणी गुणांच्या इंदुमती जंगाले यांच्याकडून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत असे गौरवोद्गार कवी लेखिका आरती काळे यांनी काढले.

याप्रसंगी आरती काळे बोलत होत्या. मुख्याध्यापक शरद जंगाले सर्जेराव चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. शरद फुटाणे, अंजली राजेश पडवळकर, एस एस फडतरे, रमेश फडतरे, सुमती शिर्के, संगीता सुरवसे, जयवर्धन कदम, आनंदराव कदम, नातू शुभम, पुनम, अमृता, सुरज, अथर्व, अश्वीनी, जय, मनोज जंगाले, अरविंद जंगाले आदी मान्यवरांची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी दिपप्रज्वलन स्वामी समर्थाच्या व स्व. उद्धव जंगाले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. इंदुमती उध्दव जंगाले यांची वह्यांनी तुला करण्यात आली. शंकुतला कटारे, अंजली पडवळकर, सुमती शिर्के संगीता सुरवसे जय आदिनी यावेळी इंदुमती जंगाले यांच्या बद्दल आपले मनोगत व्यक्त केलं. याप्रसंगी स्वामीराव वाकडे, राजु भोसले ,स्मिता जगदाळे, नम्रता ग्राम, कौसल्या जाजु, तोरणी पाटील, निंगुताई हिंडोळे, बोरगावकर माणिक साळुंखे, दिपक पडवळकर, मिलिंद साळुंखे, श्रीकांत गोडसे, विकास गोडसे, राजेद्र गोंडाळ, डॉ तिरगुळे ,उज्वला सरदेशमुख, शंकुतला कटारे, निरंजन शहा, सतीश जंगाले, सुनिल साळुंखे, अशोक भोसले, मारुती बावडे, मनोहर चव्हाण ,शुक्राचार्य चव्हाण आदि याप्रसंगी उपस्थित होते. सुत्रसंचालन शंकर पवार यांनी केले. आभार संगीता सुरवसे यांनी मानले.

# कांदलगावात नृसिंह जयंती उत्सवाची सांगता

## शिबीरात ११० जणांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१४ मे-**

कांदलगाव (ता. बार्शी) येथील ग्रामदैवत श्री नरसिंह जयंती यात्रेनिमित्तच्या विविध कार्यक्रमाची व अखंड हरिनाम सप्ताहाची मंगळवारी दि. १३ रोजी सांगता झाली. यावेळी नृसिंह युवक मंडळातर्फेच्या शिबिरात ११० जणांनी रक्तदान केले. श्रीमान रामभाई शहा रक्तपेढीने रक्तसंकलन केले.

येथील भव्य नरसिंह मंदिरात रविवारी प्रकट दिनाचा मुख्य सोहळा झाला. महालिंग महाराज सीतारामगडकर यांचे काल्याचे कीर्तन झाले. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. तत्पूर्वी देवस्थान ट्रस्टच्यावतीने रामराजे फुरडे पाटील यांच्या हस्ते देवाला अभिषेक करण्यात आला. सायंकाळी सात वाजता सर्व गावकरी व भक्तांनी मंदिरात शेरणी वाटप कार्यक्रम झाला. यात गावातील प्रत्येकांनी पेढे, खडीसाखर किंवा गुळाचा शेरणी वाटला. रात्री दहा वाजता गावातून ढोल ताशाच्या गजरात श्री नरसिंहाच्या पालखीची मिरवणूक काढण्यात



आली. यावेळी शोभेच्या दारुची आतिषबाजी करण्यात आली. पारंपरिक बँड, हलगी आणि डीजेच्या तालावर तरुणाई थिरकली. परंपरेप्रमाणे मंगळवारी सकाळी देवाला वाजत गाजत निरोप देण्यात आला. यावेळी महिला पुरुष भाविकांनी फुगड्या खेळत आनंद लुटला. मानकरी मेजर लक्ष्मण नवले, विजय नवले, प्रशांत नवले, बापूसाहेब नवले, शंकर नवले व बंधूंच्यावतीने सर्व भजनी मंडळ व युवकांना मानाचे नारळ देण्यात आले.

# देशमुख पिंपळगाव येथे बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना

**तभा वृत्तसेवा,**
**पांगरी, दि.१४ मे-**

बार्शी तालुक्यातील देशमुख पिंपळगाव येथे प्रबुद्ध प्रतिष्ठानच्या वतीने बुद्ध जयंतीचे औचित्य साधून बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. चलो बुद्ध की ओर या नाऱ्याने पिंपळगाव दणाणून गेले होते. मि रवणुकीचे आकर्षण उंट, डॉल्बी, रथ हे ठरले. मूर्तीची मिरवणूक गावातील मेन रस्त्याने काढण्यात आली. भंते कास्यत, भंते सारी, पुत्र भिक्षुसंग यांच्या प्रवचनातून मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. श्रामनेर शिबिराम ध्ये ज्यांनी सहभाग नोंदवला त्यांची सवाद्य पुष्पवृष्टी करून मिरवणूक काढण्यात आली. या कार्यक्रमाला तालुक्यातून धम्म चळवळीवर प्रेम करणाऱ्यांचा प्रतिष्ठानच्या वतीने १०१ फेटे बांधून सत्कार करण्यात आला. महार बटालियन लिफ्टनल महाराष्ट्र राज्य प्रमुख शिवपुत्र गट कांबळे यांनी पंचशील ध्वजाला सलामी दिली. या कार्यक्रमास बार्शी बौद्ध महासभेचा अध्यक्ष सत्यजित जानराव, सरपंच तानाजी चांदणे, पोलीस पाटील बाळासाहेब चांदणे, शंकर जाधव, रमेश पालखी, शहराध्यक्ष विश्वास वाघमारे, दशरथ उकिरडे, पंडित राजगुरू, भीम गीते गायक, ग्रामस्थ व तालुका पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दहावी परीक्षेत पंढरपूरमध्ये यंदाही मुलींचीच बाजी

## भटुंबरच्या विशाल सलगरला प्रत्येक विषयांत 35 गुण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१४ मे -**

फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये झालेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा ऑनलाईन निकाल मंगळवारी जाहीर झाला. यामध्ये पंढरपूर शहर आणि तालुक्यात विद्यार्थ्यांपेक्षा विद्यार्थिनींनीच बाजी मारल्याचे स्पष्ट झाले.

शहरातील द.ह. कवठेकर प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. प्रशालेतील एकूण विद्यार्थी २२३ पैकी २२० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून प्रशालेचा निकाल ९८.६५ टक्के लागला. प्रशालेतील ९० टक्के पेक्षा अधिक गुण ३४ विद्यार्थ्यांनी प्राप्त केले. विशेष योग्यता (७० ते ८९ टक्के ) गुण ७३ विद्यार्थ्यांनी प्राप्त केले. तर प्रथम श्रेणी(६० ते ६९ टक्के ) गुण ४२ विद्यार्थ्यांनी प्राप्त केले. संस्कृत विषयामध्ये एका विद्यार्थ्याने शंभर पैकी शंभर गुण प्राप्त केले. प्रशालेचे पंचरत्न विद्यार्थी व त्यांना पडलेले गुण पुढील प्रमाणे विनीत विजय शिंदे (प्रथम ९९.२० टक्के), सानिका महेश धर्माधिकारी (व्दितीय ९७ टक्के ), हर्षदा सतीश बुवा आणि रिया प्रमोद गायकवाड ( दोघेही तृतीय ९६.८० टक्के)



, प्रणिती अशोक क्षीरसागर आणि राजवर्धन कुमार पाटील ( दोघांचाही चौथा, ९६.६० टक्के ) आणि अस्मिता अगतराव भोसले (पाचवा ९६.२०टक्के ) येथील कवठेकर प्रशालेचा निकाल ९६.०६ टक्के लागला. एकूण बसलेल्या ३०५ विद्यार्थ्यांपैकी २९३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रशालेतील ९० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त मार्क असणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या २२ आहे. यामध्ये ८२ विद्यार्थ्यांना विशेष गुणवत्ता प्राप्त झाली. संस्कृत मध्ये दोन विद्यार्थ्यांना शंभर पैकी शंभर गुण मिळाले. प्रशाले मधील सर्वप्रथम तीन गुणवंत विद्यार्थी शांभवी औदुंबर ताठे ( प्रथम,९७.४० टक्के), धृती ऋषिकेश उत्पात (व्दितीय ९६ टक्के ) आणि श्रीयोग ज्ञानेश्वर मोरे (तृतीय ९५.८० टक्के). सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे मानद सचिव एस. आर. पटवर्धन, सु.त्रिं.अभ्यंकर, चेअरमन श्रीमती वीणाताई जोशी, अध्यक्ष नाना मालक कवठेकर, पदाधिकारी वा. गो.भाळवणकर, एस.पी. कुलकर्णी, डॉ. अनिल जोशी, संजय कुलकर्णी, ऋषिकेश उत्पात, डॉ. मिलिंद जोशी, मुख्याध्यापक व्ही.एम. कुलकर्णी, उपमुख्याध्यापक एम.आर मुंडे, पर्यवेक्षक आर.एस कुलकर्णी तसेच कवठेकर प्रशालेचे मुख्याध्यापक वि.या.पाटील, उपमुख्याध्यापिका शुभांगी विश्वासे, पर्यवेक्षक श्री.गडदे, श्री शेलार यासह सर्व शिक्षक बंधू-भगिनी आणि शिक्षकेतर कर्मचारी बंधू यांनी केले.

### सर्व विषयात ३५ गुण

पंढरपूर तालुक्यातील भटुंबर येथील विशाल सलगर या विद्यार्थ्याने प्रत्येक विषयांमध्ये ३५ गुण मिळवुन दहावी बोर्ड परीक्षेत ३५ टक्के गुण मिळवित पास होण्याचा विक्रम केला आहे. विशेष म्हणजे विशाल हा शेती व्यवसाया मध्ये घरच्यांना मदत करुन शालेय शिक्षण घेत होता. या वेळी भटुंबरे ग्रामस्थांनी विशालचा पेढे वाटून सत्कार केला.

येथील विद्या विकास मंडळ संचलित आपटे उपलप प्रशालेचा दहावी परीक्षेचा शेकडा निकाल ७९ टक्के लागला. प्रशालेत तुलसी नागेश कबाडे (९२.६० टक्के ) याने प्रथम येण्याचा मान मिळविला. आकांक्षा महादेव देशमुख हिने ९२.२० टक्के गुण मिळवून व्दितीय तर धनश्री दिपक पवार हिने ८९ टक्के गुण मिळवित तृतीय क्रमांक पटकाविला. जान्हवी विजयकुमार कोळी हिने ८८.८० टक्के गुण मिळवित चतुर्थ आणि समृद्धी शिरीष कुलकर्णी ८१.४० टक्के गुण मिळवुन पाचवा येण्याचा मान मिळविला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्या विकास मंडळाचे मानद सचिव एच.जे. डांगे, सहसचिव विलास भातलवंडे, संस्थेचे अध्यक्ष वरुडकर, उपाध्यक्ष डॉ बजाज, संस्थेचे संचालक अरुण गर्गे, राम चंद्र गंगाखेडकर, गुरुनाथ भिडे, सौ.रोहिणी कोर्टिकर, शशिकांत हरिदास अनिल अभंगराव, जयंत हरिदास, मुख्याध्यापक बंडोपंत गुलाखे यांनी अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## दहावीतील गुणवंत विद्यार्थी


अर्णव झंवर
९८.६० टक्के


वरद पाटील
९८ टक्के


सालीक शेख
९४.२० टक्के


श्रीवर्धन कारंजे
९४.२० टक्के


मयुर फुलारी
९२.२० टक्के


श्रीराम निचळ
९०.८० टक्के


स्वरुप लब्बा
९६.२० टक्के


मृणाल केवटे
९५.२० टक्के


अब्दुल्लाह शेख
८० टक्के

## महत्वाचे...

### क्लास न लावता सई सारोळे हिने दहावी परीक्षेत मिळवले ९६ टक्के गुण

**सोलापूर, दि. १४ मे-**

सोलापूर इंडियन मॉडेल स्कूल मधील सई राजकुमार सारोळे हिने दहावीच्या परीक्षेत ९६. ६० टक्के गुण घेऊन यश संपादन केले. इंडियन मॉडेल स्कूलचा दहावीचा निकाल शंभर टक्के लागला आहे. यात ९० टक्केच्यावर गुण असलेले ८२ विद्यार्थी आहेत. सई सारोळे हिने क्लास न लावता यश संपादन केले आहे. त्याबद्दल तिचे इंडियन मॉडेल स्कूलचे सचिव अमोल जोशी, संचालिका सायली जोशी, प्राचार्य सुजाता बुट्टे यांनी अभिनंदन केले आहे. सई हिची अभ्यासातील चिकाटी पाहून वर्गशिक्षक माधुरी कुलकर्णी, सुरेखा होलीकट्टी, पल्लवी कुलकर्णी, अनुराधा खोत, कविता यादव, रुपाली जम्बगे, जेऊरे, शीरशीकर,पेरला, नितीन देशपांडे यांनी वेळ देऊन वैयक्तिक मार्गदर्शन केले. गणितासाठी ऋचा देवस्थळी यांनी आपला वेळ काढून तिच्यासाठी खास मदत केली.





### एसव्हीसीएसच्या खुशीला गणितात मिळाले १०० गुण; प्रशालेचा निकाल ९८.६६ टक्के

**सोलापूर, दि. १४ मे-**

एस. व्ही. सी. एस हायस्कूल एमआयडीसी येथील दहावीचा निकाल ९८.६६ टक्के लागला असून प्रशालेने उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. प्रशालेतील ३७३ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट झाले असून त्यापैकी ३६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. खुशी बिराजदार ९५.८० टक्के प्रथम, आर्या कुलकर्णी ९५.४० टक्के द्वितीय व हर्षिता सरवाड हिने ९५.२० टक्के गुण मिळवून प्रशालेत तृतीय क्रमांक मिळविली. विशेष म्हणजे प्रशालेत प्रथम, द्वितीय व तृतीय येण्याचा मान मुलीनी मिळविला असून प्रशालेतील खुशी बिराजदार या विद्यार्थिनीने गणित या विषयात १०० पैकी १०० गुण मिळविली आहे. प्रशालेतील १२ विद्यार्थ्यांनी ९५ टक्के पेक्षा जास्त गुण मिळविले असून विशेष प्राविण्य श्रेणीत १०९, प्रथम श्रेणीत १३६ व द्वितीय श्रेणीत १०८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. उत्तीर्ण विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी, संस्थेचे सचिव शांतया स्वामी, संचालक शशिकांत रामपुरे, प्रशालेचे मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे, उपमुख्याध्यापक धनंजय नकाते व पर्यवेक्षक संतोषकुमार तारके यांनी अभिनंदन केले.







### दहावीच्या निकालात ऑर्किडची भरारी

**सोलापूर, दि. १४ मे-**

सीबीएसई माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा ऑनलाईन निकाल जाहीर झाला असून यात सोलापूर शहरातील नागेश करजगी ऑर्किड स्कूलने उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. परीक्षेत शाळेतील विद्यार्थी ईश्वरी तावरे ही ९८ टक्के गुण मिळवून प्रथम आली आहे. तर त्रिशा भंडारी ही ९७.२ टक्के गुण घेऊन द्वितीय व वैष्णवी होलेपाटील ही ९६.६ टक्के गुण मिळवून तिसरी तसेच नील श्रीराम हा ९६ टक्के गुण घेऊन चौथा व माहीर पटेल, वरद मालानी हे दोघे ९५.४ टक्के गुण घेऊन पाचवे आलेले आहेत. परीक्षेत एकूण १०३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. परीक्षेत प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांपैकी विशेष प्राविण्य श्रेणीत ५१ तर प्रथम श्रेणीत ३४ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. स्कूलमधील विद्यार्थ्यांच्या या यशासाठी प्राचार्या रुपाली हजारे व सर्व शिक्षकवृंद तसेच पालकांनी परिश्रम घेतले. गुणवंत विद्यार्थी व शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी, सचिवा वर्षा विभुते, व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, प्राचार्या रुपाली हजारे, शाळेच्या मार्गदर्शिका मीना पारखे यांनी अभिनंदन केले.

# छत्रपती शिवराय, संभाजी महाराजांवर अभ्यासक्रम तयार करा

## नरेंद्र पाटील यांचे आवाहन

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात संभाजी महाराज अध्यासन केंद्राचे उद्घाटन

**तभा व्रतसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात स्थापन झालेल्या छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राच्या माध्यमातून हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्यावर अभ्यासक्रम तयार करून नव्या पिढीसमोर त्यांचा जाज्वल्य इतिहास आणि शौर्यगाथा पोहोचवावे, असे आवाहन अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केले.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या मुख्य सभागृहामध्ये छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राचे उद्घाटन पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर हे होते. यावेळी व्यासपीठावर प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, व्याख्याते विशाल गरड, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण वैष्णवी गायकवाड, पारस गायकवाड, अनंत जाधव, चन्नवीर बंकुर, सोमनाथ राऊत यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक व स्वागत छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राचे अध्यक्ष प्रा. सचिन गायकवाड यांनी केले. कार्यक्रमात एमपीएससी उत्तीर्ण विद्यार्थी, यशस्वी खेळाडू, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धेतील विजेते विद्यार्थी यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. मान्यवरांचा परिचय डॉ. विकास शिंदे यांनी करून दिला. सूत्रसंचालन व आभार अध्यासनाचे सचिव डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले.

# 'लोकमंगल'तर्फे कवठे ग्रामस्थांना शासकीय योजनांची माहिती



### संभाजी महाराज जयंती निमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

धर्मवीर छत्रपती संभाजी राजे यांच्या जयंतीचे औचित्य साधून लोकमंगल समृद्ध गाव अभियान अंतर्गत कवठे ग्रामपंचायत येथील बोजप्पा तांडा येथे ग्रामस्थांसाठी शासकीय योजनांची माहिती देण्यात आली.

लोकमंगल समूहाचे अध्यक्ष आ. सुभाष देशमुख यांच्या संकल्पनेतून आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी कल्याणकारी योजनांची माहिती देण्यास सुचविले होते. या अनुषंगाने लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या अध्यक्षा अलका देवडकर व सचिव सचिन परमशेट्टी यांनी कल्याणकारी योजनांचे माहितीपर कार्यक्रम घेतले. यावर लोकमंगल डेव्हलपमेंट फौंडेशनचे समन्वयक श्यामकुमार भंडारे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. वसंतराव नाईक महामंडळाचे प्रतिनिधी आतिश सरवदे यांनी व्याज परतवा तसेच शेती पूरक जोडधंद्यांविषयी माहिती दिली, महामंडळामार्फत एक लाख रुपये बिगरव्याजी कर्ज योजने विषयी माहिती दिली. तसेच लोकमंगल बँकेच्या समन्वयक श्रद्धा कुलकर्णी यांनी लोकमंगल बँकेचे विविध कर्जाविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे समन्वयक श्यामकुमार भंडारी यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना व सूत्रसंचालन केले. यावेळी माजी सरपंच नागनाथ राठोड, विनोद राठोड, ज्ञानेश्वर बंडगर, आनंद चव्हाण, मधुकर पवार, अनिल चव्हाण, राहुल राठोड, किसन राठोड, अनिता राठोड, ललिता पवार, रेशमा राठोड, सुनिता चव्हाण आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लोकमंगल डेव्हलपमेंट फाउंडेशनचे व्यवस्थापक संजय बागल, समन्वयक श्यामकुमार भंडारे, अमोल जोकारे, नितीन अलकुंटे यांनी काम पाहिले.

# मजरेवाडीसह काही भागात आज होणार पाणीपुरवठा

### महावितरणच्या कामामुळे अडचण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

महावितरणकडून ३३ केव्ही लाईनचे दुरूस्तीचे काम सुरु असल्याने वीज पुरवठा पूर्ववत चालू होण्यास १२ ते १३ तासाचा कालावधी लागला आहे. त्यामुळे मजरेवाडीसह काही भागाचा पाणीपुरवठा १ दिवस पुढे म्हणजेच आज गुरुवारी (१५ मे) होणार आहे.

१३ मे रोजी सायंकाळी वादळी वारा व अवकाळी पावसामुळे विद्युतपुरवठा खंडीत झाला होता. महावितरणचे दुरूस्तीचे काम पूर्ण करून दि.१४ मे रोजी ३३ केव्ही लाईन दुपारी १२.४५ वाजता चालू झाली. दरम्यान, साधारणतः वीज पुरवठा पुर्ववत चालू होण्यास १२ ते १३ तासाचा कालावधी लागलेला आहे. त्यामुळे १४ मे रोजीचा होणारा पाणीपुरवठा प्रताप नगर, टिळक नगर, किनारा हॉटेल परिसर, उरलेले टप्पे मजरेवाडी, सहारा नगर, एमआयडीसी भाग, समाधान नगर (भाग), साईबाबा चौक, गीता नगर, कुचन नगर, कुर्बान हुसेन नगर, पंचशील नगर या भागाचा पाणीपुरवठा १ दिवस पुढे म्हणजेच दि.१५ मे २०२५ रोजी होणार आहे.

तसेच गावठाण भागातील मुस्लिम पाच्छा पेठ, रेल्वे लाईन डफरीन चौक, रामलाल चौक, एम्प्लॉयमेंट चौक, तेलंगी पाच्छा पेठ, जमखंडी पूल, साखर पेठ, कन्ना चौक, गणेश पेठ, रविवार पेठ, गांधी नगर १ ते ७, भद्रावती पेठ २५६ गाळे, गुरूवार पेठ, शुक्रवार पेठ, शनिवार पेठ, सोमवार पेठ, टिळक चौक, पेंटर चौक, स्लॉटर हाऊस, बेडर पूल, अशोक नगर ,नळ बाजार चौक, लष्कर भाग, पाथरूट चौक, विद्या नगर, समर्थ नगर आदी भागाचा पाणी पुरवठा १ दिवस पुढे जाणार आहे.

नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा वापर काटकसरीने करुन महापालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.

# ७५ मुलामुलींनी केले मातृ-पितृ पूजन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ मे -**

मंत्रोच्चारात विधिवत ७५ मुलामुलींनी मातृ - पितृ पूजन केले. तसेच माता व मातृभूमीविषयी संकल्प केला. विवेकानंद केंद्र कन्याकुमारी सोलापूर शाखेने आयोजित केलेल्या व्यक्तिमत्त्व विकास शिबिराच्या समारोपानिमित्त या सोहळ्याचे आयोजन केले होते. १० मे रोजी जुळे सोलापुरातील विवेकानंद केंद्र वेदांतिक ॲप्लिकेशन ऑफ योग अँड मॅनेजमेंटमध्ये (वि. के. वयम) या व्यक्तिमत्त्व शिबिराला सुरवात झाली होती. बुधवारी (ता. १४) सकाळी ७५ शिबिरार्थींनी मंत्रोच्चारासह मातृ - पितृ पूजन केले. त्यानंतर पालकांनी आपल्या पाल्यांना रक्षासूत्र बांधले. विक्रम पाठक यांनी पौरोहित्य केले.

दरम्यान, सकाळी शिबिरार्थींनी सामुदायिक ७५ सूर्यनमस्कार घातले. या पाच दिवसीय शिबिरात विविध बौद्धिक सत्रांसह प्रातःस्मरण, सूर्यनमस्कार, योगासने, कलाकौशल्ये, क्रीडायोग, केंद्र वर्ग, संस्कार वर्ग, भजनसंध्या व प्रेरणेतून पुनरुत्थान झाले. समारोप समारंभास आडत व्यापारी सीताराम गुप्ता यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी शिबिरार्थींनी अनुभव कथन केले. शिबिर प्रमुख हरिष टवाणी यांनी अहवाल वाचन केले. नगर प्रमुख रवी कंटली यांनी आवाहन केले. साईराम भंडारे याने सूत्रसंचालन केले.



### मुलांना संस्कार वर्गात पाठवा

समारोप समारंभात विवेकानंद केंद्राचे प्रांत कार्यपद्धती प्रमुख मदगोंडा पुजारी म्हणाले, संघर्षातूनच विकास होऊ शकतो. मात्र, आजकाल पालक सुरक्षिततेच्या चिंतेपोटी आपल्या पाल्यांना मोकळीक देत नाहीत. पालकांनी त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पूरक वातावरण तयार केले पाहिजे. अशा शिबिरांतून धैर्यासह त्यांच्यात विविध कौशल्यांचा विकास करण्याचा प्रयत्न होतो. मात्र, पाच दिवसांत त्यांच्यात ते निर्माण होतील, असे नाही. त्यासाठी सातत्याची गरज आहे. त्याकरिता विवेकानंद केंद्र शहरात विविध ठिकाणी संस्कार वर्ग चालवते. त्यात आपल्या पाल्यांना पाठवावे.

# स्मार्ट सिटीच्या बेशिस्त वाहतुकीला शिस्त कधी लागणार?

### ट्रॅफिक पोलिसांच्या कारवाईनंतरही बेशिस्त वाहतूक सुरूच

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ मे**

शहराच्या बेशिस्त वाहतुकीत गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. शहराच्या गजबजलेल्या परिसरात रिक्षाचालकांसह दुचाकी आणि इतर वाहनांच्या लांबच लांब रांगा दिसून येत आहेत. शहराच्या मध्यवर्ती भागात विशेषतः एसटी स्टँड परिसर, छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नवीवेस त्याच पद्धतीने बाळीवेस, मधला मारुती, प्रमुख रस्त्यांवर वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात होत आहे. अरुंद रस्ते आणि वाहनांची वाढलेली संख्या यामुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होत आहे.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रिक्षाचालकांची बेशिस्त वाहतूक मोठ्या प्रमाणात जाणवते. स्टँडमध्ये जाणाऱ्या प्रवाशांना रस्त्याच्या विरुद्ध दिशेने रिक्षातून प्रवासी सोडले जातात. दुसऱ्या बाजूने येणारी वाहने त्यामुळे खोळंबतात. अशा अवस्थेत वाहतूक कोंडी निर्माण होते. असे चित्र येथे वारंवार दिसून येते. रिक्षाचालकांची बेशिस्त वाहतूक शहराच्या प्रमुख मार्गावर वाढत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर वाहतूक शाखेच्या पोलिसांनी



संबंधित रिक्षांवर कारवाई सुरू केली आहे. तरीही रिक्षाचालकांचा बेशिस्तपणाचा कळस कायम आहे.

उन्हाळी हंगाम लक्षात घेता महामंडळाच्या वतीने सोलापूर स्टॅन्ड मधील दोन्ही प्रवेशद्वार एसटीच्या वाहतुकीसाठी खुले करण्यात आले आहेत. त्यामुळे एसटी स्टॅन्डच्या दोन्ही बाजूंनी एसटी बाहेर पडत आहेत. अशा अवस्थेत रस्त्याच्या मधोमध रिक्षा उभी केल्याने, किंवा विरुद्ध दिशेने रिक्षा स्टॅन्डच्या दिशेने येत असल्याने, वाहतूक कोंडी निर्माण होत असून परिणामी अपघाताचा धोका बळवत आहे. सदरची गंभीर बाब लक्षात घेता वाहतूक शाखेच्या पोलिसांनी बेशिस्त व प्रमाणाच्या बाहेर प्रवासी वाहतूक करणाऱ्या संबंधित रिक्षाचालकांवर कारवाई केली जात आहे. अशा परिस्थितीत देखील रिक्षाचालक विरुद्ध दिशेने बिनधास्तपणे रिक्षा चालवतात. यावर चाप बसावा यासाठी पोलिसांनी कारवाई अधिक तीव्र करावी असा सूर आता शहरवासीयांमधून उमटत आहे.


# उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीची उद्या चाचणी


### शेवटचे ८ मीटरचे काम पोलीस बंदोबस्तात सुरू

### एअर वॉल व वॉश आऊट वॉल बसविण्याचे काम युद्ध पातळीवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

शहराचा महत्त्वकांक्षी प्रकल्प मानला जाणाऱ्या उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे शेवटचे आठ मीटरचे काम बंदोबस्तात सुरू आहे. येथील शेतकऱ्यांनी अडथळा निर्माण केल्याने विलंब होत आहे. एअर वॉल व वॉश आऊट वॉलचे काम युद्ध पातळीवर करण्यात येत असून शुक्रवारी दि. १६ मे रोजी या कामाची चाचणी होणार आहे, अशी माहिती स्मार्ट सिटी योजनेतील तांत्रिक अधिकारी तथा महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी दिली.





सोलापूर शहरातील नागरिकांना लवकरात लवकर जलद वेळेत आणि सुरळीतपणे पाणीपुरवठा करण्याच्या जोरदार हालचाली सुरू आहेत. सोलापूरची जीवनदायी मानल्या जाणाऱ्या उजनी-सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम जवळजवळ पूर्णत्वाकडे आहे. हैदराबाद येथील पोचमपाड कंपनीकडून हे काम करण्यात येत आहे. उजनी ते सोलापूर या एकूण ११० किलोमीटर पैकी शेवटचे केवळ आठ मीटर जलवाहिनी अंथरण्याचे काम आता राहिले आहे. या परिसरातील शेतकऱ्यांनी अडथळा निर्माण केल्याने अखेर पोलीस बंदोबस्तात उर्वरित काम युद्ध पातळीवर करण्यात येत आहे. एअर वॉल व वॉश आऊट वॉल बसविण्याचे काम गतीने करण्यात येत आहे. बुधवारी १४ मे रोजी चाचणी होणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली होती मात्र शेतकऱ्याकडून अडथळा निर्माण झाल्याने विलंब झाला आहे. पोलीस बंदोबस्तात अखेरचे काम करावे लागत आहे. यामुळे ही चाचणी आता शुक्रवारी होणार आहे. दरम्यान, जॅकवेलचे ३५ बाय ४० बाय १८. ५ मीटर खोदाईचे काम एका सिझनमध्ये झाले होते. त्यावर एकूण १२ पंप बसविण्यात आले आहेत. यासह या जॅकवेल कन्स्ट्रक्शनचे व इतर काम पूर्ण झाले आहे. कराराप्रमाणे नोव्हेंबर २०२४ अखेरपर्यंत हे काम पूर्ण करण्याचा प्रयत्न होता. मात्र काही अडथळ्यांमुळे हे काम पूर्ण झाले नाही. आता या कामाची चाचणी शुक्रवारी करण्यात येणार आहे.

### अशी होणार चाचणी प्रक्रिया

उजनी येथे आवश्यक ती तांत्रिक तयारी करण्यात येत आहे. एकदम सर्व पंप सुरुवातीला चालू करता येणार नाही. पहिला एक पंप सुरू करण्यात येईल. त्यानंतर वॉश आऊटला पाणी आल्यानंतर दुसरा पंप चालू करण्यात येईल. दोन पंपावर शेवटपर्यंत पाणी येईल. वरवडे टोलनाक्यावर पाणी पडले की तिथून पुढे लांबोटी सिना नदीत वॉश आऊट घेतले जाणार आहे. पुढे कॅनॉलला वॉश आऊट घेण्यात येईल. त्यानंतर पुढे पाकणी येथे वॉश आऊट घेतल्यानंतर सोरेगाव येथे पाणी पोहोचणार आहे. अशा पद्धतीने ही चाचणी होईल, असेही महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी सांगितले.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






## संभाजी महाराज जयंतीनिमित्त राष्ट्रवादीच्यावतीने अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मे**

स्वराज्याच्या रक्षणासाठी शत्रूशी अखेरच्या श्वासापर्यंत झुंज देणारे महान योध्दा तसंच धैर्य, शौर्य आणि बुद्धिमत्ता यांचं मूर्तिमंत उदाहरण असणारे कुशल नेतृत्व, प्रकांड पंडित, महापराक्रमी, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांना जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत वतीने छत्रपती संभाजी महाराज चौक येथील पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, ज्येष्ठ नेते श्रीनिवास कोंडी, ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी जनरल सेक्रटरी प्रमोद भोसले, युवती अध्यक्ष किरण माशाळकर, युवक प्रदेश सचिव महेश कुलकर्णी, युवक संघटक दत्तात्रय बडगंची. वैद्यकीय पक्षाचे जिल्हाध्यक्ष बसू कोळी, मध्य विधानसभा अध्यक्ष आलमराज आबादीराजे, सोशल मीडिया कार्याध्यक्ष सोमनाथ शिंदे, सरचिटणीस शाम गांगर्डे, दक्षिण विधानसभा कार्याध्यक्ष प्रदीप बालशंकर. सरचिटणीस प्रज्ञासागर गायकवाड. शहर सचिव दत्तात्रय बनसोडे. युवक उपाध्यक्ष यशराज डोळसे उपस्थित होते.

## ▶▶ महत्वाचे...

### आयएमएसच्या ऋतुराज जोशीचे राष्ट्रीय चित्रकला स्पर्धेत यश

**सोलापूर, दि. १४ मे-**

इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरिटेज यांच्या वतीने घेण्यात आलेल्या चित्र पोस्टर स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कूल सीबीएसई मधील इयत्ता ९वीत शिकत असणाऱ्या ऋतुराज जोशी याची राष्ट्रीय विजेता म्हणून निवड झाली आहे. देशभरातून एकूण नऊ हजार विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व ऋतुराज जोशी करणार असून या स्पर्धेमध्ये ११ राज्यातील ११ राष्ट्रीय विजेत्यांची निवड करण्यात आलेली आहे. तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील विठ्ठलाची वारी वर आधारित महाराष्ट्राची संस्कृती, मंदिर शैली, चित्र शिल्प अभ्यास यावर चित्रकाम व लेखन ऋतुराजने केलेले आहे. या चित्राची निवड राष्ट्रीय पातळीवर करण्यात आलेली असून दिनांक ९ ते १२ जुलै रोजी होणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील पारितोषिक वितरण सोहळ्यास व ऐतिहासिक वारसा असलेल्या वास्तूंना व स्थळांना भेटी देण्याकरता दिल्ली येथे शैक्षणिक सहली करता ऋतुराज जोशी याची निवड करण्यात आलेली आहे. ऋतुराजच्या या यशाबद्दल इंडियन मॉडेल स्कूलचे सचिव अमोल जोशी, सायली जोशी, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, अचला राचर्ला, समन्वयक सीमंतिनी चाफळकर, पुष्पांजली काटीकर, श्वेता कोठावळे यांनी अभिनंदन केले.



### चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा छळ; पतीसह सहाजणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १४ मे-**

चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा छळ करणाऱ्या पतीसह सहाजणांवर सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अल्मास जुबेर बागवान (वय ३५, रा. बापूजी नगर, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती जुबेर बागवान, सासू रशिदा बागवान, सासरे रफिक बागवान, नणंद शबाना, साजेदा, दीर जुनेद (रा. फलटण, जि. सातारा) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.जानेवारी २०११ ते ७ जानेवारी २०२५ या कालावधीत अल्मास या सासरी नांदण्यास होत्या. त्यावेळी पती व त्याच्या घरातील लोकांनी लग्नात मानपान केला नाही, स्वयंपाक नीट करता येत नाही, सोने घातले नाही म्हणून चारित्र्याचा संशय घेऊन अल्मास यांच्याकडून मुबारतनामा लिहून घेतला. त्यानंतरही अल्मास यांना मारहाण करून शिवीगाळ करून व्यापाराकरीता माहेरून एक रूपये घेऊन ये म्हणून तिचा जाचहाट केला. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार इनामदार पुढील तपास करीत आहेत.



### चारचाकी वाहनाने धडक देऊन मारहाण करणाऱ्यांविरूध्द गुन्हा

**सोलापूर, दि. १४ मे-**

मंगळवार बाजाराजवळ गणेश शॉपींग सेंटरजवळ चारचाकी वाहनाने धडक देऊन एकास बेदम मारहाण केल्याप्रकरणी चौघांवर जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सोहेल पीरसाब पटेल (वय ४८, रा. शनिवार पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राज संतोष क्षिरसागर, संतोष क्षिरसागर, यश क्षिरसागर, विनायक क्षिरसागर (सर्व रा. बाळे, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



४ मे रोजी सायंकाळी सोहेल पटेल हे टिळक चौक येथून घरी जात होते. त्यावेळी गणेश शॉपींग सेंटरजवळील सेंट्रल हॉस्पीटलजवळ एमएच ०२ ईआर ५०२६ क्रमांकाचा चालक राज क्षिरसागर याने कोंतम चौक येथे कोपऱ्यावर असलेल्या न्यु स्टाईल डोअर दुकानासमोर पटेल यांना राँग साईडने वाहन चालवून समोरून धडक दिली. यामध्ये पटेल यांच्या दोन्ही पायास गंभीर दुखापत झाली आहे. तसेच राज क्षिरसागर याने पटेल यांना मारहाण करून फोन करून आपल्या साथीदारांना बोलावले. राज व त्याच्या साथीदारांनी पटेल यांना हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण करून, चारचाकी वाहनाने धडक देऊन जखमी केले. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

# २८ मे नंतर अकरावीची प्रवेश प्रक्रिया

- ✔ ऑनलाईनमुळे थांबणार आर्थिक लुबाडणूक
- ✔ ११ ऑगस्टला होणार विद्यार्थ्यांचे वर्ग सुरु



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मे-**

मंगळवारी राज्य शिक्षण मंडळाच्या दहावीचा ऑनलाईन निकाल लागला असून उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी यंदा प्रथमच अकरावीसाठी ऑनलाईन प्रवेशप्रक्रीया राबविण्यात येत आहे. २८ मे नंतर अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरू होणार असून ११ ऑगस्टपर्यंत प्रक्रिया सुरू राहणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी दिली.

यावर्षी जिल्हा प्रशासनाने कॉपीमुक्त अभियान राबविल्याने जिल्ह्यातील शाळांचा निकाल तीन टक्यांनी घटला आहे. मात्र उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी गुणवत्ता सिध्द करीत अधिक गुण मिळविले आहेत. त्यामुळे अकरावी प्रवेश प्रक्रियेत गैरप्रकार होण्याची शक्यता असून प्रशासनाने यावर्षी सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया राबविण्याच्या सूचना दिली आहेत. त्यानुसार ८ ते १५ मे दरम्यान सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांची माहिती अद्ययावत करणे बंधनकारक आहे. प्रवेशासाठी असणाऱ्या जागा, शाखा, शाळा व महाविद्यालय दर्जा, तुकडया, अनुदानित की विनाअनुदानित, प्रवेश फी, संकेतस्थळ, संपर्क क्रमांकयासह इतर माहीती देणे बंधनकारक करण्यात आली आहे. माहीती देण्यास व्यवस्थापनाकडून विलंब अथवा टाळाटाळ झाल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. १५ मे रोजी शिक्षणाधिकारींच्या उपस्थितीत बैठक घेऊन माहीती प्रमाणित करून विद्यार्थी प्रवेशसंख्या निश्चित करण्यात येणार आहे. राज्यस्तर, विभागीय स्तर व जिल्हा स्तर अशा तीन टप्प्यावर प्रक्रिया सूरू असणार आहे.

| प्रवेश प्रक्रिया कालावधी | |
|---|---|
| ८ मे ते १५ मे | शाळा महाविद्यालयांची माहीती अद्ययावत |
| ८ मे ते १६ मे | शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी यांनी शाखांची माहीती प्रमाणित करणे |
| १९ मे ते २८ मे | विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रोफाईल तयार करणे |
| १९ मे ते २८ मे | विद्यार्थ्यांनी महाविद्यालय प्राधान्यक्रम भरणे |
| २८ मे ते ११ ऑगस्ट | प्रवेश प्रक्रियेच्या चार फेऱ्या. |

### विद्यार्थ्यांची आर्थिक लुबाडणूक थांबणार

यापूर्वी ऑनलाईन प्रवेशप्रक्रिया नसल्याने शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांकडून प्रवेश संख्या लपविणे, गुणवंत विद्यार्थ्यांचे प्रवेश नाकारणे, अधिक फी अथवा डोनेशन घेऊन प्रवेश देणे तसेच इतर गैरप्रकार व्हायचे. मात्र ऑनलाईन प्रक्रियेमुळे गैरप्रकारांवर आळा बसणार आहे. त्यामुळे पालक व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेचा लाभ घ्यावे.

- **सचिन जगताप,** माध्यमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परीषद सोलापूर

८ मे पासून सुरू करण्यात आलेली व २८ मे पासून सुरू झालेली प्रवेशप्रक्रिया ११ ऑगस्टपर्यंत सुरू राहणार आहे. ११ ऑगस्टला विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाल्यानंतर अकरावी वर्ग सुरू होणार आहेत. शासन आदेशानुसार प्रवेशप्रक्रिया व वर्ग सुरू करण्याच्या तारखेत बदल होऊ शकतात.

१९ मे ते २८ मे पर्यंत विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्यासाठी स्वताची प्रोफाईल तयार करण्याचा कालावधी आहे.विद्यार्थ्यांनी माहीती ऑनलाईन भरून महाविद्यालयांचा प्राधान्यक्रम देणे आवश्यक आहे. शिवाय यावेळी विद्यार्थ्यांना शाखा बदल करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. संस्था व शाळांसाठी व्यवस्थापन कोटा पाच टक्के व अत्यावश्यक परीस्थितीत परीसरातील विद्यार्थी प्रवेशासाठी पाच टक्के असे एकूण दहा टक्के प्रवेश देण्याचा अधिकार देण्यात आला आहे. शिवाय अल्पसंख्यांक व अल्पभाषिक शाळा व महाविद्यालयांना ५० टक्के आरक्षण असून गुणवत्तेनुसार प्रवेशप्रक्रिया राबविणे बंधनकारक आहे. तीन फेऱ्यापर्यंत प्रवेश प्रक्रिया पूर्ण न केल्यास प्रशासनाकडून विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. शिवाय आरक्षणाच्या निर्णयानुसार सर्व प्रवर्गासाठी आरक्षण लागू असणार आहे. २८ मे ते ११ ऑगस्टपर्यंत प्रवेश प्रक्रियेसाठी चार फेर्या होणार आहेत. त्यांच्या तारखा निश्चित नसले तरी या चार फेरीत विद्यार्थी प्रवेश निश्चित करण्यात येणार आहे. त्यानंतर सर्वांसाठी खुली प्रवेश प्रक्रिया घेण्यात येणार आहे.

## मजरेवाडीसह काही भागात आज पाणीपुरवठा

▶ विद्युत वितरण कंपनीकडून दुरुस्तीचे काम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून ३३ केव्ही लाईनचे पेट्रोलिंग व तपासणी करून दुरूस्तीचे काम करण्यात आले. विज पुरवठा पुर्ववत चालू होण्यास १२ ते १३ तासाचा कालावधी लागला आहे. त्यामुळे टाकळी हेडवर्क्स येथून पाण्याचा उपसा न झाल्यामुळे शहरातील मजरेवाडीसह काही भागाचा पाणीपुरवठा १ दिवस पुढे म्हणजेच गुरुवारी (१५ मे) होणार आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीकडून १३२ केव्ही मंद्रुप सबस्टेशनहून ३३ केव्ही एक्सप्रेस फिडर लाईनवरून टाकळी हेडवर्क्स येथे विद्युत पुरवठा केला जातो. दि. १३ मे रोजी सायंकाळी ७.३० पासून वादळी वारा व अवकाळी पावसामुळे विद्युतपुरवठा खंडीत झाला होता. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून ३३ केव्ही लाईनचे पेट्रोलिंग व तपासणी करून ३३ केव्ही लाईनवरून मिटरींग केऑक्स करीता येणा-या केबलचे जॉईटींग किट बस्ट झाल्याने त्याचे दुरूस्तीचे काम पूर्ण करून दि.१४ मे रोजी ३३ केव्ही लाईन दुपारी १२.४५ वाजता चालू करून दिली आहे.

दरम्यान, साधारणतः विज पुरवठा पुर्ववत चालू होण्यास १२ ते १३ तासाचा कालावधी लागलेला आहे. त्यामुळे टाकळी हेडवर्क्स येथून पाण्याचा उपसा न झाल्यामुळे आज दि.१४ मे २०२५ रोजीचा होणारा पाणीपुरवठा प्रताप नगर, टिळक नगर, किनारा हॉटेल परिसर, उरलेले टप्पे मजरेवाडी, सहारा नगर, एमआयडीसी भाग, समाधान नगर (भाग), साईबाबा चौक, गीता नगर, कुचन नगर, कुर्बान हुसेन नगर, पंचशील नगर या भागाचा पाणीपुरवठा १ दिवस पुढे म्हणजेच दि.१५ मे २०२५ रोजी होणार आहे.

## देगाव येथील रत्नाई शिवारात मजुराचा खून

### आठवड्यानंतर सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

सोलापूर ते मंगळवेढा रस्त्यावरील देगाव येथील रत्नाई शिवार प्लॉटींगच्या जागेत कर्नाटकातील मजूरी करणाऱ्याचा दगड डोक्यात घालून खून करण्यात आल्याची घटना उघडकीस आली होती. याप्रकरणी आठवड्यानंतर सलगर वस्ती पोलिस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुर्गप्पा उर्फ रमेश भिमय्या पवार (वय ४२, रा. खणदाळ, जि. गुलबर्गा, कर्नाटक) असे खून झालेल्याचे नाव आहे. याबाबत लक्ष्मी दुर्गप्पा पवार (वय ४०, रा. खणदाळ, जि. गुलबर्गा, कर्नाटक) या महिलेच्या फिर्यादीवरुन मुस्सा उर्फ मुन्ना अब्दुली शेख (वय २८, रा. रिंगरोड, सिध्देश्वर मठाजवळ, गुलबर्गा, कर्नाटक) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी मुन्ना शेख यास अटक केली असून त्यास न्यायालयाने दोन दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.




यातील आरोपी मुन्ना व मयत दुर्गप्पा हे दोघे गेल्या अनेक दिवसापासून सोलापूरात मोल-मजुरीचे काम करण्यासाठी आलेले होते. ते दोघे दिवसभर मिळेल तिथे मोल-मजुरी करून सिध्देश्वर मंदीर परिसरात राहात होते. ६ मे रोजी सायंकाळी मुन्ना व दुर्गप्पा हे दोघे देगाव येथील घुंगे यांच्या रत्नाई शिवार प्लॉटींगमध्ये असणाऱ्या लिंबाच्या झाडाखाली दारू पित बसले होते. त्यावेळी त्या दोघांमध्ये अज्ञात कारणावरून भांडण झाले. त्याचा राग मनात धरून मुन्ना याने दुर्गप्पा याचे डोके लिंबाच्या झाडावर आपटले, त्यामुळे दुर्गप्पा हे खाली पडले. त्यावेळी मुन्ना याने दुर्गप्पा यास ठार मारण्याच्या उद्देशाने तेथे पडलेला दगड दुर्गप्पा याच्या डोक्यात घातला. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने दुर्गप्पा बेशुध्द पडला. त्यावेळी मुन्ना याने जखमी दुर्गप्पाला तेथेच पडलेल्या बॅनरमध्ये गुंडाळून ठेऊन तो निघून गेला. ही बाब सुमारे दोन दिवसानंतर उघडकीस आल्यानंतर दुर्गप्पा याचा मृत्यू झाल्याचे सलगर वस्ती पोलिसांना दिसून आले. त्यामुळे याबाबत चौकशी करून अखेर दुर्गप्पा यांच्या पत्नीच्या फिर्यादीवरुन सलगर वस्ती पोलिस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

यातील संशयित मुन्ना शेख यास सलगर वस्ती पोलिसांनी अटक केली असून त्यास न्यायालयाने दोन दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला. पोलिस उपनिरीक्षक सुरज कुतवळ पुढील तपास करीत आहेत.

## जयशंकर उद्यानासाठी एक कोटी रुपये मंजूर

### माजी सरपंच शिवतेसिंह मोहिते-पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१४ मे-**

येथील जयशंकर उद्यानाच्या सुशोभीकरणासाठी शासनाने एक कोटी रुपये मंजूर झाले असून त्यामध्ये जिजाऊंसह छत्रपती शिवराय व धर्मवीर संभाजी राजांच्या प्रतिमा पुतळे उभारणार असल्याचे माजी सरपंच शिवतेसिंह मोहिते पाटील यांनी जाहीर केले.त्याचवेळी त्याची निविदा प्रक्रिया सुरू झाली असल्याचे ही त्यांनी सांगितले.

येथील जयशंकर उद्यानात छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव अकलूज नगर परिषद तसेच मराठा सेवा संघ, अखंड मराठा समाज, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड यांच्या वतीने साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मराठा सेवा संघाचे पुणे विभागीय अध्यक्ष उत्तमराव माने शेंडगे, अकलूज नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दयानंद गोरे, जनसेवा संघटनेचे अण्णासाहेब शिंदे, मराठा क्रांती मूक मोर्चाचे धनाजी साखळकर, बंटी जगताप, सचिन गायकवाड, मनोरमा लावंड, वनिता कोरडकर, शारदा चव्हाण, आक्काताई माने, जयकुमार गोरे, सचिन पराडे, भारत सांगळे, दिगंबर मिसाळ, अजित माने, सिद्धेश्वर नागटिळक, शिवाजी लोंढे, सुवर्णा घोरपडे आदी उपस्थित होते. यावेळी प्रथम संभाजी महाराजांच्या प्रतीमेस शिवतेजसिंह मोहिते-पाटील व उपस्थितांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



## अवकाळीमुळे शहरातील सखल भागात चिखल व पाणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

सोलापूर शहरात मंगळवारी सायंकाळी तसेच रात्री अवकाळी पावसाचा जोरदार तडाखा बसला. हवामान खात्याच्या वतीने यापूर्वीच सोलापूर शहरात अवकाळी पावसाचा अंदाज वर्तवला होता. त्यानुसार गेल्या दोन दिवसांपासून शहरात अवकाळी पावसाची हजेरी लागत आहे. मात्र मंगळवारी सायंकाळी सात वाजता तसेच रात्री दहा वाजण्याच्या सुमारास अवकाळी पावसाच्या जोरदार सरी शहर परिसरात बरसल्या. यामुळे शहरातील सखल भागात पाणी साचले. तसेच रस्त्यांवर देखील मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहनधारकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागली.

दरम्यान, शहरातील गुरुनानक चौक, कुमठा नाका चौक तसेच नईजिंदगी रोड, पारसी विहीर येथे रस्त्यावर पाणी साचले होते. या रस्त्यावरील खड्ड्यामध्ये पाणी साचल्याने वाहनधारकांना वाहने चालवताना तारेवरची कसरत करावी लागली. खड्डे लहान मोठे असल्याने पाण्यातील खड्ड्यांचा अंदाज न आल्याने अनेक वाहनधारकांना मनस्ताप सहन करावा लागला. गुरुनान चौक ते कुमठा नाका चौक यादरम्यान रस्त्यावर पाणी मोठ्या प्रमाणात थांबले होते. रस्त्याच्या मधोमध खड्डे असल्याने पावसाचे पाणी साचल्याने रिक्षा चालकांसह दुचाकी, चारचाकी वाहनधारकांना खड्ड्यांचा अंदाज आला नाही. महापालिका प्रशासनाने देखील मान्सूनपूर्वकामे करणे गरजेचे होते. परंतु प्रशासनाने नालेसफाई तसेच रोडवरील खड्डे बुजवले नसल्यामुळे शहरवासीयांना पावसासह खड्ड्यांचा त्रास सहन करावा लागला.

त्याचप्रमाणे पारसी विहीर येथे देखील रस्त्याच्या मधोमध पडलेले खड्डे वाहनधारकांना त्रासदायक ठरले. खड्ड्यात रस्ता आहे? की रस्त्यात खड्डा हा प्रश्न? वाहनधारकांना यावेळी पडला. दरवर्षी या रस्त्यांवर खड्डे बुजवण्याचे केवळ दिखावा केला जातो. रोडवरील खड्डे पूर्णतः बुजवले जात नाहीत. वास्तविक पाहता दुबार डांबरीकरण करणे आवश्यक असताना देखील ते सुद्धा केले जात नाही. प्रशासनाच्या उदासीन भूमिकेमुळे वाहनधारक तसेच शहरवासीयांना अवकाळी पावसाचा फटका सहन करावा लागत आहे. पावसामुळे रस्त्यावरील खड्डे उघडे पडले आहेत.


वाहनधारकांची कसरत

> गुरुनानक चौक येथे रस्त्यावर खड्डे पडले आहेत याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे. गुरुनानक चौक ते कुमठा नाका चौक या रोडवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत यापूर्वी या रोडवर दुभाजक आणि स्ट्रीट लाईट उभारण्यात आली परंतु खड्डे बुजवणे महापालिका प्रशासनाला महत्त्वाचे वाटले नाही. सदरचे खड्डे बुजवणे गरजेचे असताना प्रशासन आणि संबंधित अधिकारी यांनी दुर्लक्ष केले. यापूर्वी देखील या रोडवर मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी साचते. ही बाब माहीत असताना देखील या रस्त्यावर दुबार डांबरीकरण करण्यात आले नाही. आता तरी प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे आणि पावसाळा सुरू होण्यापूर्वी दुबार डांबरीकरण करावे.
>
> **- फारुक सय्यद, स्थानिक रहिवासी**

### प्रशासनाने मानसूनपूर्व कामे पूर्ण करावीत

> सोलापूर शहरातील विविध रस्त्यांवर खड्डे मोठ्या प्रमाणात पडलेले आहेत. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचून खड्ड्याचा अंदाज येत नाही. अशा परिस्थितीत अपघाताचा धोका मोठ्या प्रमाणात बळावतो. त्यामुळे महापालिका प्रशासनाने पावसाळ्या अगोदर नालेसफाई तसेच रस्त्यांवरील खड्डे बुजवून घ्यावेत किंवा संबंधित रस्त्यांवर दुबारा डांबरीकरण करावे.
>
> **- शितल पवार, वाहनधारक**

## यंत्रमाग, बिडी कामगारांसाठी रेल्वे स्टेशन ते रे-नगर कुंभारीपर्यंत बससेवा सुरु

### सकाळ - संध्याकाळ दोन बसेसच्या खेपा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

महापालिका परिवहन विभागाच्या वतीने सोलापूर शहरातून रे-नगर कुंभारी येथे घरकुल वसाहतीत राहण्यास गेलेल्या नागरिकांना तसेच यंत्रमाग व बिडी कामगार यांच्यासाठी रेल्वे स्टेशन ते रे - नगर वसाहत, कुंभारी पर्यंत जाण्याकरिता बसच्या दोन खेपा सुरू करण्यात आल्या आहेत. गुरुवार दिनांक ८ मे पासून दोन खेपांमध्ये ही बस सेवा या ठिकाणी सुरू केली आहे. दररोज सकाळी ८ वाजता एक बस व सायंकाळी ५:३० वाजता एक बस अश्या दोन बसेसच्या खेपा चालू करण्यात आल्या आहेत.

त्याचे वेळापत्रक असे - मार्ग क्र. १६ रेल्वे स्टेशन ते रे-नगर घरकुल वसाहत कुंभारी - सकाळी ८ वाजता बस निघेल आणि सकाळी ९:१५ वाजता रे-नगर घरकुल येथे पोहोचणार आहे. दुपार सत्र - सायंकाळी ५:३० वाजता रेल्वे स्टेशन येथून बस सुटेल आणि सायंकाळी ६:४५ वाजता रे-नगर घरकुल येथे पोहोचणार आहे. ही बस रेल्वे स्टेशन - छत्रपती शिवाजी महाराज चौक - कन्ना चौक - पाणी टाकी - सुतमिल - मल्लिकार्जुन नगर - गोदूताई फाटा - कुंभारी गाव - रे नगर घरकुल या मार्गाने धावेल व त्याच मार्गाने परत येईल. सर्व नागरिकांनी तसेच यंत्रमाग कामगार व बिडी कामगार यांनी या बस सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिका उपायुक्त तैमूर मुलाणी यांनी केले आहे.

| मनपा बसचे तिकीट दर या प्रमाणे | |
|---|---|
| रेल्वे स्टेशन ते रे-नगर | रु. ३०/- |
| छ. शिवाजी महाराज चौक ते रे-नगर | रु. २५/- |
| कन्ना चौक ते रे-नगर | रु. २०/- |
| पाणी टाकी ते रे-नगर | रु. २०/- |
| मल्लिकार्जुन नगर ते रे-नगर | रु. २०/- |
| कुंभारी गांव ते रे- नगर | रु. १५/- |

## ज्ञानामृत आनंदलहरी - १११६

**मग मोकलिलें जेथ जाईल । तेथूनि नियमुचि घेऊनि येईल ।**
**ऐसेनि स्थैर्यची होईल । सवेयया कीं ।।**

योगाभ्यासकाचा मार्ग कोणता व कसा असतो, याचे स्पष्टीकरण भगवंतानी अर्जुनाला सविस्तर सांगीतले .त्यानंतर हा मार्ग मला किंवा सामान्यांना पत्करता येईल का ? आणि पत्करला तर तो मार्गक्रमण करता येईल का ? असे प्रश्न अर्जुन विचारत आहे. अर्जुनाला हा मार्ग कठिण वाटत आहे. श्रीकृष्ण सांगत आहेत की, अर्जुना औषध कडू असले तरीही जगण्यासाठी ते घ्यावे लागते. असे कडु औषध जिभेला घ्यावे वाटत नाही. तरी पण ते घेतल्याशिवाय रोग बरा होत नाही. त्याप्रमाणे आपल्या हितासाठी पोषक असणारा हा दिव्यमार्ग कठिण असला तरीही तो आपल्यासाठी चांगला व आवश्यक आहे. केवळ तो इंद्रियांना क्लेशकारक वाटतो म्हणून हा मार्ग सोडू नये. चित्ताला विषय सुखापासून परावृत करुन आपणाला आपला स्वत:चा आत्मपरिचय करुन आत्मसुख देणारा हा मार्ग असल्याने हा मार्ग सोडता कामा नये. आत्मसुखात तल्लीन राहणा-याला पर्वता एवढी दु:खाची संकटे कोसळली तरी त्याला त्याचे कांही वाटत नाही. जेव्हा आत्म सुखाची ओढ मनाला लागते तेव्हा मन आपोआप विषयसुखा पासून दूर जाऊ लागते. म्हणून मानसाने आत्मसुखाच्या ओढीकडे मनाला नेण्याचा प्रथम प्रयत्न करावा. हा योग अवघड असला तरीही काम, क्रोधावर नियंत्रण करुन व इंद्रियांचे नियमन करुन या मार्गावर पदार्पण करावे. दृढ निश्चयाने व निष्काम कर्मयोगी होऊन या मार्गावर चालू लागल्यास मनाला वैराग्य प्राप्त होते. त्यामुळे संकटाची ये-जा संपून, बुध्दी मोठया सुखाने धैर्याच्या राजवाडयात नांदू लागते. या मार्गावर जाण्याचा पहिला टप्पा म्हणजे मनावर नियत्रंन करणे होय. मनावर नियंत्रण करणे तसे अवघड काम आहे. प्रयत्नाअंती नियंत्रण करता आले तर फारच छान, पण जर नियंत्रण शक्यच होत नसेल तर काय करावे ? हे सांगतांना भगवंत म्हणाले,



**मग मोकलिलें जेथ जाईल । तेथूनि नियमुचि घेऊनि येईल ।**
**ऐसेनि स्थैर्यची होईल । सावियाची ।।**

अर्थात, निग्रहाच्या निश्चयाने चित्त स्थिर झाले तर सहजच ते कामास आले असे समजावे. स्वैरपणे भटकणा-या मनाला निग्रह करुन पुन्हा पुन्हा परत आणावे. असे पुष्कळ वेळा घडले म्हणजे ते आपोआप स्थिर होईल, असे भगवंत म्हणाले. निग्रहाचा अभ्यास पुन्हा-पुन्हा केल्याने स्थिरपणा येऊ लागतो. योगाभ्यासाला कठीण मार्गावरुन जाणे शक्य नसणा-यांसाठी हा सोपा मार्ग भगवंतानी सांगीतला आहे. आपण दैनंदिन जीवनात पाहतो की, एखादी कठीण बाब सुध्दा प्रयासाअंती प्राप्त होऊ शकते. मला हे जमणारच नाही, असे म्हणून गप्प बसले तर कांहीही प्राप्त होणार नाही. पण प्रयत्न करायला काय हरकत, म्हणून पुन्हा-पुन्हा प्रयत्न केला तर, असाध्य ते साध्य करीता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे, असे म्हटल्याप्रमाणे असाध्य सुध्दा साध्य होऊ शकते. आपणाला अशी अनेक उदाहरणे पाहायला मिळतात की ज्यांनी अतिप्रयासानंतर कठीण असे साध्य केले आहे. आपल्या मुलांना एखादी गोष्ट येत नाही म्हणून त्यांच्यावर चिडण्यापेक्षा त्यांच्याकडून ती गोष्ट पुन्हा-पुन्हा करुन घ्यावी. नकारात्मक भूमिका घेण्यापेक्षा, सकारात्मक भुमिकेतून प्रयत्न ठेवावा.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : गुरुवार | दिनविशेष - शुभ दिवस, |
| दि. १५ मे २०२५ | छ. संभाजी राजे जयंती |
| विक्रम संवत् २०८१ | वृषभ संक्राती |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसू | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - वैशाख | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. तृतीया (२८.०२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - ज्येष्ठा (१४.०७) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - शिव (०७.०१) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (१५.१८) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** मनात अशांती असल्या कारणाने आपल्याला संकटाचा सामना करावा लागेल. नौकरी रोजगारात जबाबदारीनुसार काम करा.

**वृषभ :** आत्मविश्वास कमी झाल्यामुळे मन लागणार नाही. व्यापार व्यवसाय मध्यम राहील. झालेल्या कामात आलेल्या अडचणीवर मात कराल. मुलांची काळजी राहील.

**मिथुन :** स्पर्धेमध्ये यश मिळेल. कार्य क्षमतेमध्ये वाढ होईल. धार्मिकतेकडे मन झुकेल. अपूर्ण राहिलेले काम वेळेत पूर्ण होण्याचे योग आहेत.

**कर्क :** घरामध्ये पूर्वी ठरलेला शुभ समारंभ पार पडेल. एखादी मौल्यवान वस्तूची खरेदी सर्वांच्या संमतीने होणे शक्य.

**सिंह :** मोठ्या व्यवहारातून पुरेशी काळजी घेत वाटचाल करायची आहे. हितशत्रूंचा काही प्रमाणात त्रास होणे शक्य.

**कन्या :** मागील कामात विशेष यश मिळेल. आपल्या लहानसहान इच्छा: आकांक्षाना पूर्ण होण्यासाठी आवश्यक ती आवक झाल्याने तुम्ही खूश असाल. रागावर नियंत्रण ठेवा.

**तुळ :** व्यापार फायदेशीर राहणार आहे. राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

**वृश्चिक :** लोकप्रियता वाढणार आहे. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल.

**धनु :** विरोधकांपासून सावध रहा. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निर्माण होईल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा.

**मकर :** नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. उतावीळपणा करू नका.

**कुंभ :** आरोग्याची काळजी घ्या. चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल.

**मीन :** मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल. आर्थिक अडचणीमुळे मन त्रस्त राहील.

# दहावीच्या परीक्षेत उज्ज्वल निकालाची परंपरा कायम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

**मार्चमध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेत शहरातील विविध शाळांनी उज्ज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. शहरातील विविध शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे. निकालानंतर विविध शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.**




### चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशाला निकाल ८३.५८ टक्के

दहावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेत चंद्रभागाबाई यलगुलवार प्रशालेने घवघवीत यश संपादन केले. प्रशालीतील दोडमणी शेडूसिंग ८९.८० टक्के हा प्रथम, माने रामचंद्र ८० टक्के हा द्वितीय तर सुरवसे काजल ७८.४० टक्के गुण मिळवून ही विद्यार्थिनी तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. प्रशालीतील दिव्यांग विद्यार्थ्यांचा निकाल शंभर टक्के लागला असून माने रामचंद्र ८० टक्के गुण मिळवून प्रथम, इरवाडकर संकेत ७७.६० टक्के, द्वितीय तर गव्हाणे ज्योती ७७.२० टक्के गुण मिळवून दिव्यांग विद्यार्थ्यात तृतीय येण्याचा मान मिळवला. १००टक्के निकालाची परंपरा दिव्यांग विद्यार्थ्यांनी टिकवून ठेवली. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन नॅब संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश यलगुलवार, उपाध्यक्षा अनुगीता पवार, जनरल सेक्रेटरी के.डी.पाटील, जनरल सेक्रेटरी शशीभूषण यलगुलवार, प्राचार्या सीमा यलगुलवार पर्यवेक्षक डॉ. बंडोपंत पाटील यांनी केले.

### धर्मण्णा सादूल प्रशाला निकाल 100 टक्के

नीलम नगर भाग ३ व ४ येथील श्री धर्मण्णा सादूल प्रशालेचा निकाल १०० टक्के लागला आहे. प्रशालेतील एकूण १२२ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी १०९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. २ विद्यार्थी विशेष प्राविण्य, प्रथम श्रेणीत ५५, द्वितीय श्रेणीत ४९ विद्यार्थी यश संपादन केले आहे. प्रथम भूमी स्वामी, वैष्णवी रेड्डी या दोघींना ८५ टक्के, प्रियंका हिरेमठ ८३.२० टक्के, सुप्रिया स्वामी ८३ टक्के घेवून संपादन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे हारुण पठाण, सचिव आसिफ पठाण, मुख्याध्यापिका तस्लीमबानो पठाण, सय्यद आफरीन यांनी अभिनंदन केले.

### सिंहगड पब्लिक स्कूल निकाल 100 टक्के

सोलापूर : केंद्रिय माध्यमिक शिक्षण मंडळ, (सी.बी.एस.ई.) नवी दिल्लीने १० वी (सी.बी.एस.ई.) चा निकाल जाहीर केला.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी आमच्या सिंहगड पब्लिक स्कूल, केगाव, सोलापूर शाळेच्या मुलांचा प्रगतीचा आलेख हा उंचवणारा असून, चांगल्या निकालाची परंपरा कायम राखत दहावीच्या सर्वच विद्यार्थ्यांनी चांगले गुण प्राप्त करून विशेष प्राविण्यासह घवघवीत यश संपादन केले. यंदा प्रशालेतून इ.१० वीला एकूण ७२ विद्यार्थी बोर्डाच्या परीक्षेस बसले होते. त्यापैकी ६ विद्यार्थीनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवून यश संपादित केले. तसेच १८ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह यशस्वी झाले आहेत. यासह तब्बल ३१ विद्यार्थी प्रथम श्रेणी घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले, सिंहगड पब्लिक स्कूलच्या प्राचार्या शाहीन शेख व उपप्राचार्य प्रकाश नवले तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. १० वी परीक्षेत ९० टक्केपेक्षा जास्त गुण संपादन केलेले विद्यार्थी प्रथम अर्नव झंवर (९८.६० टक्के), द्वितीय आयुष व्यवहारे (९७.६० टक्के), तृतीय संस्कृती दहिभाते ९६.६० टक्के



### श्री सिद्धेश्वर हायस्कूल, निकाल 100 टक्के

दहावी परीक्षेत श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत शाळेच्या गौरव परंपरेत मानाचा तुरा खोवला आहे. विद्यार्थ्यांनी यावर्षीही १०० टक्के निकालाची गौरव परंपरा कायम ठेवली. प्रथम श्रावणी भुरळे ९९.४० टक्के, सुरज अंबुरे ९८.६० टक्के, समृद्धी कोळेकर ९७.४० टक्के. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे चेअरमन धर्मराज काडादी व शिक्षण समितीचे सदस्य विलास कारभारी, ॲड. रेवणसिद्ध पाटील, गुरुराज माळगे, राजशेखर येळीकर, चन्नबसव नाडगौडा, पशुपतिनाथ माशाळ, प्रभुराज मैंदर्गीकर, भीमाशंकर पटणे, समन्वयक संतोष पाटील, मुख्याध्यापक योगेश राऊत व पर्यवेक्षिका निता तमशेट्टी यांनी अभिनंदन केले.



### सहस्त्रार्जुन प्रशाला निकाल 100 टक्के

प्रतीवर्षाप्रमाणे सहस्त्रार्जुन शैक्षणिक संकुलातील मराठी व इंग्रजी माध्यमाचा निकाल १०० टक्के लागला असून मराठी माध्यमातून हिना अमीन सय्यद या विद्यार्थीनीने ९४.४० टक्के गुण प्राप्त करून प्रशालेतून प्रथम येण्याचा बहुमान मिळविला तर शाहीन जमादार हिने ९२.८० गुण मिळवून प्रशालेतून द्वितीय आली आहे. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष संजीवसा बिद्री, शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष राजुसा भुमकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.याप्रसंगी संस्थेचे सचिव जयकुमार कोल्हापुरे, शैक्षणिक संस्थेचे सचिव गजानन गोयल, संस्थेचे पदाधिकारी सदस्य भरतकुमार शालगर, श्रीरामसा पवार, सुरेश बिद्री, गणेश दामजी, संजीव रंगरेज, शिरीष कोल्हापुरे यांच्यासह प्रशालेचे मुख्याध्यापक भगवंत उमदीकर, मुख्याध्यापिका मंजुषा काशीद, मुख्याध्यापक डॉ. विष्णू रंगरेज उपस्थित होते. यंदाच्या वर्षी ७९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून विशेष प्रविण्यात ३२, प्रथम श्रेणी २१, द्वितीय श्रेणी २४ तर २ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले. प्रशालेतील प्रथम ५ विद्यार्थी असे हिना सय्यद ९४.४० टक्के, शाहीन जमादार ९२.८० टक्के, दर्शनराजे माने ९०.४० टक्के, संकल्प स्वामी ८९.४० टक्के, ईशा पाटील ८९.२० टक्के.

### संभाजीराव शिंदे प्रशाला निकाल ९६.७७ टक्के

विडी घरकुल येथील संभाजीराव शिंदे प्रशालेचा दहावीचा निकाल ९६.७७ टक्के लागला असून परीक्षेस एकूण १८६ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १८० विद्यार्थी उत्तीर्ण झालेले असून २९ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले व प्राथम श्रेणीत ४६, द्वितीय ६६, पास श्रेणीत ३९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रथम क्रमांक रामकृष्ण कृष्णवेणी ९०.८० टक्के, द्वितीय स्वप्नील ताकमोगे ८९.६० टक्के, तृतीय आकाश गुंडेटी ८९.२० टक्के गुण मिळविले. यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे, उपाध्यक्ष आ. देवेंद्र कोठे, कोषाध्यक्ष प्रथमेश कोठे, संस्था सदस्या डॉ. राधिका चिलका, मुख्याध्यापक सतीश मल्लाव, मुख्याध्यापिका तनुजा मारपल्ली यांनी अभिनंदन केले.

# जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात इंडियन मॉडेल स्कूलचे यश



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

भारतीय जनता पार्टी अभियंता सेल व पदवीधर प्रकोष्ठ सेल, सोलापूर आयोजित Young Minds and Machines Expo - २०२५ हे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन दि. २८ फेब्रुवारी रोजी विज्ञान दिनाच्या निमित्ताने भरवले गेलेल्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात इंडियन मॉडेल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले.

स्वामी विवेकानंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (पॉलि.) येथे भरवण्यात आलेल्या विज्ञान प्रदर्शनात इंडियन मॉडेल स्कूल (स्टेट बोर्ड), जुळे सोलापूर या शाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने शेती हा प्रकल्प सादर केला. या प्रकल्पाला प्रथम पारितोषिक मिळाले. बक्षिसाचे स्वरूप २५०० रुपये रोख, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे होते. या प्रकल्पात इयत्ता आठवीच्या लोणारकर सारंग संदीप, चि. परदेशी रणवीर कन्हैय्यासिंग, खराडे वल्लभ गणेश, चि. कुलकर्णी सार्थक कपिल आणि जहागिरदार वेदांत अभय या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

त्यांना विज्ञान शिक्षिका शीतल पराग कुलकर्णी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. शाळेचे संस्थापक ए.डी. जोशी, संस्थेचे अध्यक्ष अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, इंडियन मॉडेल स्कूल स्टेट बोर्डच्या मुख्याध्यापिका सुजाता बुट्टे, अपर्णा कुलकर्णी, ममता बसवंती, अचला राचर्ला, रूही काझी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# सम्यक विहारतर्फे बुद्ध जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

भवानी पेठ मड्डीवस्ती येथील युवक क्रीडा मंडळ सम्यक बुद्ध विहारच्या वतीने बुद्ध जयंती साजरी करण्यात आली. तथागत भगवान बुद्ध यांच्या मूर्तीस पुष्पांजली वाहून व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस प्रमुख पाहुणे चीफ मॅनेजर नितीन सहारे, निवृत्त कार्यकारी अभियंता महावितरण संजय साळे, धीरज थोरात यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून सामूहिक बुद्ध वंदना घेण्यात आली. लापशी वाटप करण्यात आले. यावेळी अर्जुन कांबळे, शितज थोरात, युवक क्रीडा मंडळाचे संस्थापक अध्यक्ष आरपीआयचे नेते के. डी. कांबळे, राहुल बनसोडे,उत्सव अध्यक्ष प्रेम तोरणे, जनार्दन मोरे,सुनील कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी कांचन कांबळे, प्रतीक कांबळे, मारुती गायकवाड, सुमित कांबळे, महादेव चंदनशिवे, प्रसाद कांबळे, लखन गवळी, दयानंद डावरे, चंद्रकांत गायकवाड, ओम कांबळे, महादेव चंदनशिवे उपस्थित होते.

# अहिल्यादेवी होळकर जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाची घोंगडी बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर जन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाची घोंगडी बैठक शनिवार दि. १७ मे रोजी सायंकाळी ५ वाजता सोलापुरातील शिवस्मारक सभागृह येथे आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती उत्सव अध्यक्ष अमर हळळी यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्रिशताब्दी जयंती महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येणार आहे. यंदाची जयंती ही व्याख्यान आणि सामाजिक उपक्रम द्वारे मोठ्या प्रमाणात साजरी करण्यात येणार आहे. शनिवारी होणाऱ्या या बैठकीमध्ये नूतन अध्यक्षांची निवड, मागील मागील बैठकीचा एकूण वृत्तांत वाचून दाखवणे, समाजाचे शहरात सभागृह स्थापन करणे, नवीन खर्चास मान्यता देणे, सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना राजमाता पुरस्कार देणे, पुतळा समिती स्थापन करणे, सुभेदार मल्हारराव होळकर यांचा पुतळा स्थापन करण्यासाठी जागा मागणी करणे, ३०० व्या जयंतीनिमित्त चलनी नोटा आणि नाणी काढण्यासंदर्भात भारतीय रिझर्व बँकेस मागणी करणे आदी विषयांवर यावेळी चर्चा आणि निर्णय घेण्यात येणार आहे. या बैठकीस समाजातील ज्येष्ठ नेते , पदाधिकारी व मान्यवर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या पत्रकार परिषदेस महेश गाडेकर, सोपान खांडेकर, विनोद मोटे, मनीषा माने, विद्या हक्के, राजश्री गवळी, किशोर खरात, डी.डी. पांढरे आदी उपस्थित होते.

**त्रिशताब्दी जयंती महोत्सवानिमित्त कार्यक्रम**



# मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात गौतम बुद्ध जयंती साजरी

**सोलापूर :** नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख यांच्या हस्ते पुष्पांजली वाहून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक निलोपर सय्यद, सारंग अंजीखाने, भालचंद्र साखरे,नासिर खान, सायली ढोले, सचिन साखरे आदी उपस्थित होते.

# नान्नज अभयारण्यात वन्यजीव गणना

## रानडुकरे अन् रानमांजरे वाढली; काळविटांची संख्या घटली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

नान्नज अभयारण्यात बुद्ध पौर्णिमेनिमित्त झालेल्या वन्यजीव गणनेनुसार गतवर्षापेक्षा यंदा मोर व काळविटांची संख्या घटली आहे. मात्र, शेतकऱ्यांसाठी उपद्रवी असलेल्या रानडुकरांची संख्या या मोजणीमध्ये १९६ ने वाढली आहे. याचबरोबर रानमांजरेही काही प्रमाणात वाढली असल्याची माहिती वनविभागाकडून मिळाली.

नान्नज अभयारण्य हे माळढोक पक्षासाठी आहे. मात्र त्याचा वावर या अभयारण्यात नगण्यच असतो. सध्या जिल्ह्यात एकच माळढोक वावरत असून, कधीतर दिसतो. या अभयारण्यात हरिण, काळविटे, ससे, कोल्हे, लांडगे, खोकड असे प्राणी मात्र सहज दृष्टीस पडतात, गतवर्षी या गणनेत माळढोक पक्षाचे दर्शन झाले होते. शेतकऱ्यांना उपद्रवी ठरणाऱ्या रानडुकरांच्या संख्येवर नियंत्रण आणणे गरजेचे आहे. अन्यथा आसपासच्या शिवारात ही रानडुकरे कोणतेही पीक येवू देत नाहीत. यामुळे या रानडुकरांचा बंदोबस्त करणे गरजेचे असल्याची भावना काही शेतकरी बांधवांनी व्यक्त केली.



### वन्यप्राणी गणनेत आढळलेले प्राणी

बुध्दपौर्णिमेदिवशी झालेल्या वन्यजीव गणनेमध्ये २०२५-२६ मध्ये लांडगे ८ आढळले, खोकड १९, मुंगुस १२, रानमांजर ११, ससे २६, रानडुक्कर ४४५, सायाळ ८, कोल्हा ७, घोरपड ८, मोर ५०, कुदळ्या पक्षी ९, नीलगाय १५, काळवीट, हरण ३४२.

### पावसामुळे अनेक वन्यजीव पानवठ्यावर आले नाहीत

ही वन्यजीव गणना ही एक वन्यजीवप्रेमींना निसर्गानुभव मिळावा यासाठी आहे. यामुळे ही आकडेवारी अधिकृत म्हणता येणार नाही. अनेक वन्यजीव पाऊस पडल्यामुळे निवाऱ्याबाहेर आलेही नसतील. यामुळे यात अजून वाढही होण्याची शक्यता आहे.

**- किशोर येले, सहाय्यक वनसंरक्षक, वन्यजीव विभाग, पुणे**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# जिल्ह्यातील विविध शाळांचे दहावी परीक्षेत यश

## उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम; गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व कौतुक

### लोकसेवा प्रशालेची स्वरांजली महामुनी तालुक्यात प्रथम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मे-**

**जिल्ह्यात यंदा इयत्ता दहावीच्या परीक्षेत बहुतांश शाळांचे सरासरी निकालाचे प्रमाण उत्कृष्ट राहीले आहे. अनेक शाळांचे निकाल शंभर टक्के लागले आहेत तर अनेक शाळांचे निकाल ९० टक्केपेक्षा अधिक आहेत. चांगले गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांसह त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षक व पालकांचेही सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. अनेक शाळांतून यशस्वी विद्यार्थ्यांचे सत्कारही केले जात आहेत.**

#### मंद्रूपचा निकाल ८७.४३ टक्के

मंद्रूप येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लोकसेवा विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत यशाची परंपरा कायम ठेवली आहे. प्रशालेचा निकाल ८७.४३ टक्के लागला. कॉपीमुक्त तथा सरमिसळ आणि सीसीटीव्हीच्या निगराणीत तणाव विरहित वातावरणामध्ये देखील प्रशालेचा सेमी माध्यमचा निकाल १०० टक्के लागला असून यामध्ये स्वरांजली महामुनी ९९.२० टक्के गुण घेऊन प्रशालेत, केंद्रात व तालुक्यात प्रथम तर गौरी लोभे ९८.२० टक्के गुण घेऊन केंद्रात व तालुक्यात द्वितीय क्रमांक आणि सृष्टी अरबळे ९५.६० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांक मिळविले आहेत.

प्रशालेचा मराठी माध्यमचा निकाल ८१.१५ टक्के लागला असून प्रथम क्रमांक निकिता हुक्केरी ८३.४० टक्के, तर द्वितीय क्रमांक वैष्णवी सुतार ८३.२० टक्के आणि तृतीय क्रमांक वैष्णवी खरात ८०.८० टक्के गुण मिळाले आहे. शाळा स्थापनेपासून प्रथमच स्वरांजली महामुनी या विद्यार्थीनीला ९९.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक तर गौरी लोभे या विद्यार्थीनीला ९८.२० टक्के गुण मिळाले आहेत. स्वरांजली महामुनी तालुक्यात उच्चांक गुणांनी उत्तीर्ण झाली आहे .दहावी परीक्षेत प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये विशेष प्राविण्य ३३, प्रथम श्रेणी ५५, द्वितीय श्रेणी ७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष शिवशरण पाटील, सचिव गुरुसिद्ध म्हेत्रे, सहसचिव आप्पासाहेब म्हेत्रे, संचालक वर्ग, प्राचार्य बसवराज कुमठेकर, पर्यवेक्षक मदगोंडा मलकारी, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दयानंद घाटे, मल्लिकार्जुन वस्तीगृहाचे अधीक्षक श्रीशैल म्हेत्रे यांनी अभिनंदन केले.



### माढ्याच्या साठे प्रशालेचा निकाल ९८.९० टक्के

माढ्यातील सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेचा चालू वर्षाच्या दहावी परीक्षेचा निकाल ९८.९० टक्के इतका लागला असून १८३ विद्यार्थ्यांपैकी १८१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. आठ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्याहून अधिक गुण प्राप्त केलेले आहेत. अमृता चवरे हिने ९६.८० टक्के गुण मिळवित प्रशालेत पहिला येण्याचा मान पटकावला. तर साक्षी चवरे तिने ९६.४८ टक्के गुण मिळवत द्वितीय व सारथी सुरवसे हिने ९४. ४० टक्के गुण मिळत तृतीय क्रमांक पटकावला आहे. प्रशालेमधील आठ विद्यार्थ्यांनी ९० टक्केहून अधिक गुण मिळवत विशेष प्राण्यासह यश संपादन केले आहे. या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्या तथा नगराध्यक्षा मिनल साठे, मुख्याध्यापक नागेश खेडकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धैर्यशील भांगे, उपाध्यक्षा माधुरी साठे, प्रवीण पवार, किरण पवार, भैया खरात यांच्यासह सर्व सदस्यांनी अभिनंदन केले.

## विविध शाळांचे यश...

### यशवंतराव चव्हाण प्रशाला, वैराग निकाल ९६ टक्के

श्री नर्मदेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ मळेगाव संचलित, तडवळे येथील यशवंतराव चव्हाण प्रशालेचा दहावी परीक्षेचा निकाल ९६ टक्के लागला असून यामध्ये अंतरा कदम ८७ ६० टक्के, साक्षी जाधव ८२ टक्के, स्नेहा जाधव ८१.२० टक्के गुण मिळविले आहेत. प्रशालेतून २५ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट होते. त्यापैकी २४ विद्यार्थी पास झाले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष व्ही.बी. पिसाळ, संस्थेच्या सचिव एस.एन. गडसिंग, सहसचिव हेमंत बापू गडसिंग, उपाध्यक्ष प्रमोद जगताप, मुख्याध्यापक सुनिल भोसले यांनी अभिनंदन केले.

### माध्यमिक आश्रम प्रशाला बसवनगर, मंद्रूप, निकाल ९४.४४ टक्के

बसवनगर (ता. दक्षिण सोलापूर) येथील माध्यमिक आश्रम प्रशालेचा दहावीचा ९४.४४ टक्के लागला. येथून एकूण ३६ जणांनी परीक्षा दिली. त्यामध्ये ३४ उत्तीर्ण तर दोन जण अनुत्तीर्ण झाले. प्रशालेत प्रथम- अन्सरे मुस्कान अन्सर (८६.८० टक्के), द्वितीय- नाईक संजना रमेश ८२.४० टक्के, तृतीय- हवालदार सिमरन इमाम ८१.६० टक्के. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष सुभाष (काका) चव्हाण, सचिव किरण (भाऊ) चव्हाण, संचालक सचिन (भाऊ) चव्हाण, प्रशालेचे मुख्याध्यापक राजकुमार कस्तुरे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### अर्णव विद्यालय वैराग, निकाल १०० टक्के

सासुरे फाटा येथील अर्णव माध्यमिक विद्यालयाचा दहावी परीक्षेचा निकाल सेमी माध्यम १०० टक्के व मराठी माध्यम निकाल ९८.३८ टक्के लागला असून यामध्ये अभिलाषा कादे ८८ ८० टक्के, आकांक्षा काटमोरे ८८. ६० टक्के, शितल कादे ८८.४० टक्के, सत्यम पाटील ८७ टक्के १७ विध्यार्थ्यांना ८५ टक्के पेक्षा जास्त गुण प्राप्त झालेले असून गणित व विज्ञानमध्ये ९० गुणांपेक्षा जास्त गुण असणारे २३ विद्यार्थी आहेत. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सचिव रविंद्र कापसे, मुख्याध्यापिका अर्चना डिसले यांनी अभिनंदन केले आ.

### पोदार स्कूल बार्शी, निकाल १०० टक्के

येथील पोदार स्कूलचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला असून उदयन गायकवाड याने ९८ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला आहे. द्वितीय अक्षरा पाटील हिने ९६ टक्के तर वेदांत काशीद ९५.८० टक्के याने तिसरा क्रमांक मिळवला आहे. ९० टक्के पेक्षा अधिक गुण १६ विद्यार्थी. ८० टक्के पेक्षा अधिक गुण ३२ विद्यार्थी. ७५ टक्के पेक्षा अधिक गुण ३४ विद्यार्थी. यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेच्या अध्यक्षा वैशाली कबाडे, शाळेचे सचिव संदीप बरडे, प्राचार्य रविराज बेलुरे यांनी अभिनंदन केले आहे.

### विद्या मंदीर प्रशाला वैराग, निकाल १०० टक्के

वैराग येथील विद्या मंदिर कन्या प्रशालेचा दहावीचा निकाल १०० टकके लागला असून १२६ विद्यार्थ्यांपैकी ५४ मुलींना विशेष श्रेणी तर प्रथम श्रेणीमध्ये ४५ मुली आहेत आहेत. अक्षता पाटील ९७.४० टकके, अक्षरा गवळी ९५.६० टक्के, श्रावणी इंगळे ९५.४० टक्के, स्वराली साखरे ९४.२० टक्के, प्रीती कोरे ९३.८० टक्के, शामल माने ९३.२० टक्के, मशिरा चौधरी ९३ टक्के, गौरी उंबरे ९३ टक्के, सृष्टी गुंड ९२.८० टक्के, प्रतीक्षा मासाळ ९२.४० टक्के, धनश्री देवकर ९०.४० टक्के, अलजिकरा सय्यद ९०.२० टक्के. विद्या मंदिर हायस्कूल वैराग निकाल ९९.०५ टक्के लागला असून यामध्ये वेदांत अडसूळ ८७.६० टक्के, शार्दुल कर्णे ८७.४० टक्के, सोहेल मिर्झा ८७.४० टक्के, हुसेन शेख ८७.४० टक्के, सार्थक यादव ८७.४० टक्के, प्रथमेश गव्हाणे ८७ टक्के, जुबेर सय्यद ८६.६० टक्के, श्रेयस मगर ८५.४० टक्के, संकेत गुंड ८५ टक्के, अथर्व तावसकर ८५ टक्के. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष भूषण भूमकर, चेअरमन मृणाल भूमकर, सचिव निनाद भूमकर ,मुख्याध्यापक कल्याण करंडे, मुख्याध्यापिका एस.आर.वैद्य, पर्यवेक्षक किशोर इंगळे व आर.पी. कोळी यांनी अभिनंदन केले

### शरदचंद्रजी पवार विद्यालय करमाळा, निकाल १०० टक्के

शरदचंद्र पवार विद्यालय वाशिंबे प्रशालेचा दहावीचा निकाल १००टक्के लागला आहे. प्रथम क्रमांक स्नेहा काळे ९४.६० टक्के, स्नेहल कळसाईत ९३ टक्के तृतीय स्नेहल घनवट व प्रिती गोडगे ९१. ८० हिने पटकावला आहे. तसेच ९० टक्के पेक्षा जास्त मार्क मिळवणारे विद्यार्थी पुढील प्रमाणे समिक्षा झोळ, देवयानी गोडगे, कृतिका सावंत तसेच प्रशालेत पहिल्या सहा क्रमांक मिळविणाऱ्या सर्व मुली असून मुलींनी विषेश प्राविण्य संपादीत केले आहे.

### बार्शीचा निकाल कौतुकास्पद : गटशिक्षणाधिकारी नाटके

बार्शी तालुक्यातील १०९ माध्यमिक शाळेतील ५ हजार ५६० विद्यार्थ्यांनी इयत्ता दहावीची परीक्षा दिली होती. त्यापैकी ५ हजार २४६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तालुक्याचा एकूण निकाल ९४.३५ टक्के लागला. परीक्षा दिलेल्या २ हजार३९३ मुलींपैकी २ हजार ३०८ मुली उत्तीर्ण झाल्या. तर ३ हजार १६७ मुलांपैकी २ हजार ९३८ मुले उत्तीर्ण झाले. मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण जास्त आहे. ३३ शाळेतील शंभर टक्के विदयार्थी उत्तीर्ण झाले. तर एकुण ८२ शाळेचा निकाल ९० टक्के पेक्षा जास्त आहे. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी सर्व शाळेच्या आस्थापना व शिक्षकांनी आणखी भर देणे गरजेचे आहे. आजचा निकाल कौतुकास पात्र असल्याचे सांगत, बार्शी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी बालाजी नाटके यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन करत पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### वखारिया विद्यालय बार्शी, निकाल ९६.२३ टक्के

तालुक्यातील उपळे दुमाला येथील श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयाचा दहावी परीक्षेचा निकाल ९६.२३ टक्के लागला असून विद्यालयातील पूनम जुनवनकर हिने ९५.२० टक्के गुण मिळवून उपळे दुमाला केंद्रात प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. पूनम जुनवनकर ९५.२० टक्के प्रथम, ऐश्वर्या बुरगुटे ९३.६० टक्के, द्वितीय तर ओंकार ताटे व स्वरांजली गोरे प्रत्येकी ९३.४० टक्के तृतीय क्रमांक मिळवला आहे. तसेच विद्यालयातील डिस्टिंक्शनमध्ये २५ ग्रेड वन मध्ये १९ तर ग्रेड टू मध्ये ७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर, संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, खजिनदार यांनी आणि शालेय समितीचे चेअरमन, ग्रामस्थांकडून अभिनंदन करण्यात आले.

### कै. नामदेवराव जगताप उर्दू शाळा करमाळा, निकाल शंभर टक्के

करमाळा शहरातील नगरपालिकेच्या कै. नामदेवराव जगताप उर्दू शाळेचा दहावीचा निकाल पहिल्याच प्रयत्नात शंभर टक्के लागला आहे. या वर्षी दहावीच्या परिक्षेला चौदा विद्यार्थी बसले होते त्यापैकी चौदा ही विद्यार्थी चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण झाले आहेत. कै. नामदेवराव जगताप उर्दू शाळेतील पहिला क्रमांक मिस्बा कुरेशी हिने मिळवला आहे. तिला ८८ टक्के मार्क मिळाले आहेत. तर दुसऱ्या क्रमांकाने सबिया शेख ८५ टक्के मार्क मिळवून उत्तीर्ण झाली आहे तिसऱ्या क्रमांकावर रफिया शेख ७७ टक्के मार्क मिळून उत्तीर्ण झाली आहे. मुख्याध्यापक जुबेर जानवडकर, प्रा. इब्राहिम मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले आहे. तसेच कुराण ए हाफीज असलेले मौलाना अब्दुल्ला शेख हे सुद्धा चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण झाले आहेत. या यशाबद्दल जमियत उलमा ए हिंद चे अध्यक्ष मौलाना मोहसीन, आयशा मस्जिदचे मुफ्ती अबुरेहान, जामा मस्जिद चे मौलाना अन्वर, नुरानी मस्जिद चे मौलाना मरगबुल हसन, सकल मुस्लीम समाजचे मार्गदर्शक शहर काझी हाजी कलीम काझी, माजी नगराध्यक्ष शौकत नालबंद, माजी उपनगराध्यक्ष अहमद कुरेशी, अर्बन बँकेचे माजी संचालक फारुख जमादार, जेष्ठ पत्रकार नासीर कबीर जेष्ठ पत्रकार आलिम शेख, पत्रकार अशपाक सय्यद, युसुफ शेख, शकुर शेख, अमिन सय्यद, ॲड. नईम काझी, डॉ सादीक बागवान, डॉक्टर समीर बागवान, ॲड अलीम पठाण, सन राईस क्लास चे प्रा इब्राहिम मुजावर सर, हाजी ख्वाजा हुसेन कुरेशी, जाकीर शेख, याकुब कुरेशी,बकश भाई, समीर शेख, जमीर सय्यद,रमजान बेग, सुरज शेख, जहाँगीर बेग, इकबाल शेख, मुस्तकीम पठाण, इम्तियाज पठाण ,कलीम शेख, फिरोज बेग, उद्योजक जावेद सय्यद, कलंदर शेख, यासीन सय्यद, हमरान मुलाणी, आलीम पठाण, सोयल पठाण, आलिम शेख, चाँद बेग, अरबाज बेग, शाहीद बेग, आरीफ पठाण, शकुर शेख, कयुम मदारी, ताहेर मुलाणी, जहाँगीर शेख, रमीज शेख, करमाळा नगरपालिकाचे मुख्याधिकारी सचिन तापसे, गटशिक्षणाधिकारी अनिल बनसोडे, केंद्र प्रमुख चौधरी यांनी अभिनंदन केले.

## माळशिरस तालुक्याचा दहावीचा निकाल ९४.५१ टक्के

### १७ शाळांचा निकाल 100 टक्के

### ६ हजार ३५६ विद्यार्थी उत्तीर्ण

माळशिरस तालुक्याचा दहावीचा निकाल ९४:५१ टक्के लागला आहे. तालुक्यातून ६ हजार ७२५ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी ६ हजार ३५६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष प्राविण्यासह १ हजार ८०१, प्रथम श्रेणीत २ हजार २५६, व्दितीय श्रेणीत १ हजार ७७१ तर पास श्रेणीत ५२८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तालुक्यातील १७ शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

माळशिरस तालुक्यातील शाळानिहाय निकालाची टक्केवारी पुढीलप्रमाणे :

सदाशिवराव माने विद्यालय अकलूज ९४.६२, मॉडेल मल्टीपर्प स्कूल ८३:३३,श्री. चंद्रशेखर विद्यालय श्रीपुर ९५:३४, डॉ.बी जे दाते प्रशाला नातेपुते ९७.१६,गोपाळ राव देव प्रशाला माळशिरस ९६.२३,कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिलीव ९६.१७,श्री.हनुमान विद्यालय शिंदेवाडी ९३.०२, कर्मवीर बाबासाहेब पाटील विद्यालय सदाशिवनगर ९४, सदाशिवराव माने विद्यालय माणकी ९५.३८,रामलिंग विद्यालय कुरबावी ८९.४७,प्रतापसिंह मोहिते पाटील विद्यालय शिवपुरी ९६:६६,जवाहरलाल शेतकी विद्यालय झिंजेवस्ती ९३.८७,श्री बाणलिंग विद्यालय फोंडशिरस ९६.०३, श्रीनाथ विद्यालय बोरगाव ९७.२९,महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर १००,न्यु इंग्लिश स्कूल वेळापूर ८९.९६, कृष्णानंद विद्यामंदिर पाटीलवस्ती ९०.९०, यशवंतराव चव्हाण विद्यालय फळवणी ९९.१८, दहिगाव हायस्कूल ९५.३१, रात्र प्रशाला अकलुज ६०, मोरजाई विद्यालय मोरोची ९५.९३, जनता विद्यालय मळोली ९८.८२, निमगाव विद्यामंदिर निमगाव ९२.१५.,न्यू इंग्लिश स्कूल धर्मपुरी ८०, विजयसिंह मोहिते विद्यालय वाघोली ९६.३६, श्री.हनुमान विद्या मंदिर तोंडले ७६.९२, हनुमान हायस्कूल तांदुळवाडी ८२.५०, श्री.भैरवनाथ विद्यालय मेडद ९७.१४, माळशिरस प्रशाला माळशिरस ८२, नेवरे हायस्कूल नेवरे ९६.२०,लक्ष्मीबाई कन्या प्रशाला यशवंतनगर ९८.०७, महालिंगेश्वर विद्यालय खुडूस ९९.१२,कन्या प्रशाला माळशिरस ९७.४६, प्रतापसिंह विद्यालय काळेवस्ती चांदापुरी ९६.३४,माध्यमिक विद्यालय लवंग ८६.८८, मोहनराव पाटील विद्यालय बोरगाव ६६.६६,शंकरराव मोहिते पाटील विद्यालय वेळापूर ९७.९७, श्रीमती रत्नप्रभादेवी मोहिते पाटील विद्यालय मांडवे ९७.८७, माध्यमिक विद्यालय बोंडले ८८.३७, श्रीमती पी एन हायस्कूल खंडाळी ८९.७४, गुलमोहर इंग्लिश मीडियम स्कूल माळीनगर ९८.३८, श्रीमती आर एम कन्या प्रशाला नातेपुते ९४.५२, माध्यमिक विद्यालय गुरसाळे ८३.८७, माध्यमिक विद्यालय उंबरे दहिगाव ८८.२३,श्री जयसिंह मोहिते पाटील विद्यालय संग्रामनगर ९६.२२,माध्यमिक विद्यालय लोंढे मोहितेवाडी ९६.९६,संग्रामसिंह मोहिते पाटील माध्यमिक विद्यालय शिंगोर्णी ९७.९५, माध्यमिक विद्यालय चाकोरे ९५.५५,,माध्यमिक विद्यालय चव्हाणवाडी पळसमंडळ ९६.७७,माध्यमिक विद्यालय इस्लामपूर ८४.२१,चंद्रकांत घुगरदरे प्रशाला नातेपुते ८७.७१, माध्यमिक विद्यालय तामशिदवाडी ९५.३४, रणजितसिंह मोहिते पाटील विद्यालय जाधववाडी ९३.३३,आदर्श विद्यालय कोथळे ९७.१४, सावतामाळी विद्यालय माळेवाडी अकलूज ८६:९५, अकलाई विद्यालय अकलूज ६९.३८, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले विद्यालय माळशिरस ९९.१०, शिवपार्वती माध्यमिक विद्यालय वाफेगाव ३८.०९, श्रीनाथ विद्यालय तरंगफळ ९३.७५, शासकीय आश्रम शाळा सवतगव्हाण ७२.७२,लोकविकास मराठी मिडीयम स्कूल वेळापूर ९५,शिवशंभो माध्यमिक विद्यालय माळशिरस ९८.२९,माध्यमिक आश्रमशाळा ९५.४५,सदाशिवराव निवासी प्रशाला ९५:२३,गोविंद प्रा.माध्य.आश्रम शाळा ८९:४७, महात्मा फुले विद्यालय माळशिरस ९३:३३

#### तालुक्यातील १७ शाळांचा निकाल १०० टक्के

महर्षी शंकरराव मोहिते प्रशाला यशवंतनगर, शंकरराव मोहिते-पाटील इंग्लिश स्कूल धवलनगर, जिजामाता कन्या प्रशाला अकलूज, विजयसिंह मोहिते-पाटील विद्यालय विजयनगर, विजयसिंह मोहिते-पाटील विद्यालय कोळेगाव, गीताई प्रशाला मोटेवस्ती भांबुर्डी, माध्यमिक विद्यालय तांदुळवाडी, समता माध्यमिक विद्यालय पिरळे,आर एस कुलकर्णी विद्यालय गिरवी, श्रीराम माध्यमिक विद्यालय पानीव, विष्णुपंत कुलकर्णी इंग्लिश मीडियम स्कूल माळशिरस, सेंट मेरी इंग्लिश स्कूल माळशिरस, इंदिराबाई आगाशे इंग्लिश मिडीयम स्कूल श्रीपूर, रत्नत्रय विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय सदाशिवनगर, श्रीराम इंग्लिश स्कूल पानीव, सेंट जोन्स इंग्लिश स्कूल वेळापूर, न्यू सेमी इंग्लिश स्कूल खुडुस.

## ‘उत्तर’ मध्ये वडाळा, गुळवंची, हिरज शाळेचा निकाल १०० टक्के

**मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत वडाळा येथील श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू हायस्कूल, सदगुरू आण्णा माऊली माध्यमिक विद्यालय, गुळवंची, इंडियन पब्लिक स्कूल हिरज या तीन शाळांचा निकाल १०० टक्के लागला असून शाळा निहाय निकाल पुढीलप्रमाणे -**

### न्यू हायस्कूल, वडाळा

परिक्षेला १०१ विद्यार्थी बसले होते. सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रशालेचा निकाल १०० टक्के लागला. प्रथम अनुष्का करळे ९७ टक्के, द्वितीय आर्या दिनेश साठे ९३.८० टक्के, तृतीय क्रमांक आदिती अरुण दराडे ९३ टक्के . सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, संस्थेचे मार्गदर्शक बळीरामकाका साठे, अध्यक्ष जितेंद्र साठे, मुख्याध्यापिका डॉ. वैशाली साठे यांनी अभिनंदन केले.

### सदगुरू अण्णा माऊली माध्यमिक विद्यालय गुळवंची

जोगेश्वरी कला, क्रीडा व शिक्षण प्रसारक मंडळ वडाळा संचालित श्री. सदगुरू अण्णा माऊली माध्यमिक विद्यालय गुळवंची प्रशालेचा निकाल १०० टक्के लागला. प्रथम क्रमांक -शिंदे संभाजीराजे राजेंद्र (७७.२० टक्के) द्वितीय बोराडे लक्ष्मी संभाजी (७६.२० टक्के), तृतीय चव्हाण गौरी अरुण (७५.८० टक्के). प्रशालेतील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग पवार यांनी अभिनंदन केले.

### एस.बी.विद्यालय, हिरज

अपूर्वा अभिमीत ज्ञानपीठ,हिरज संचलित एस.बी.विद्यालय व इंडियन पब्लिक स्कूलचा निकाल १०० टक्के लागला. विद्यालतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे विद्यार्थी पुढीलप्रमाणे - मराठी माध्यम - बोबडे सुमित समाधान ( ९६.४० टक्के), सपाटे शिवराज विलास ( ९३.६० टक्के), कलादाते शिवाजी गणेश (९३.६० टक्के), वाघ प्रवीण महादेव ( ९२.४० टक्के), इंग्रजी माध्यम - मादास तेजल सतिश (९४.८० टक्के) बारड अक्षरा रघुनाथ (९४.६० टक्के), चिटकुल विद्या आनंद (९२.८० टक्के). सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा भांजे यांनी अभिनंदन केले.

### शिवप्रभु माध्यमिक प्रशाला अकोलेकाटी

प्रशालेचा निकाल ९० टक्के लागला. प्रथम क्रमांक - प्रतीक्षा तात्या लामकाने (८७.८० टक्के), द्वितीय क्रमांक - अथर्व सुरेश आतकरे (८४.८० टक्के), तृतीय क्रमांक आरती उत्तम गवळी (८४.४० टक्के) सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तम बरडे, मुख्याध्यापक शंकर वडणे, संस्थेचे सहसचिव सुरेश जगताप यांनी अभिनंदन केले.

### श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, गावडीदारफळ

गावडी दारफळ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचा निकाल ९५.४५ टक्के लागला. प्रथम - आरती धनाजी खटाळ (७७.२० टक्के) द्वितीय मोहित मधुकर वाघमारे (७५.६० टक्के) तृतीय हर्षदा हनुमंत शिंदे (७४. ८० टक्के) सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर पवार, सचिव चांगदेव कदम, सहसचिव नागेश पवार यांनी अभिनंदन केले.

### श्री गणेश विद्यालय बीबी दारफळ

शाळेचा निकाल ९६.३४ टक्के इतका लागला. प्रथम साबळे संपदा दत्तात्रय ( ९३.२० टक्के), द्वितीय सर्वगोड तेजस्विनी विजय (८५.२० टक्के), तृतीय क्रमांक दंडगुळे प्रतीक्षा जालिंदर (८५ टक्के) व साठे प्रतीक्षा अर्जून (८५ टक्के) मुख्याध्यापक श्रीशैल गुरव यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### महात्मा गांधी विद्यालय कळमण

प्रशालेचा निकाल ९४.८० टक्के लागला. प्रथम क्रमांक (विभागून) पाटील आदिती अजितकुमार (९२.४० टक्के) व राऊत अपर्णा प्रदीप (९२.४० टक्के), द्वितीय क्रमांक मसाळ आर्या योगेश्वर (९१ टक्के), तृतीय क्रमांक पाटील श्रेया सूर्यकांत (९०.४६ टक्के). सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव सुनील पाटील, प्रशालेच्या मुख्याध्यापिका शोभा पाटील यांनी अभिनंदन केले.

### महात्मा फुले हायस्कूल, मार्डी

प्रशालेचा निकाल ९४.८९ टक्के लागला. प्रथम आर्या विठ्ठल बनसोडे ( ८५.२० टक्के), द्वितीय श्वेता संतोष गवळी (८५ टक्के), तृतीय संगीता राजेश शिंदे (८१.२० टक्के). यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष व सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अविनाश मार्तंडे, मुख्याध्यापक सुजित इनामदार यांनी अभिनंदन केले.

### श्री ब्रह्मागायत्री विद्यामंदिर (कृषि) रानमसले

प्रशालेचा निकाल ९४.५९ टक्के लागला. प्रथम भोसले सानिका नाना (९४.६ टक्के), द्वितीय साठे अंजली ज्योतिराम (९२.४ टक्के), तृतीय क्रमांक गरड स्वाती मुकुंद (८९.८० टक्के) सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अध्यक्ष भारत गरड, संस्थेचे सचिव भिमराव तगारे, प्रशालेचे मुख्याध्यापक महादेव गवळी यांनी अभिनंदन केले.

### कै. महादेवराव शिंदे माध्यमिक प्रशाला पाकणी

प्रशालेचा निकाल ९२.१० टक्के लागला. प्रथम श्रीकृष्ण शत्रुघ्न देवकर (८२.२० टक्के), द्वितीय गणेश गोविंद यादव (८०.२० टक्के), तृतीय अनिशा अमर गुंड (७८.८० टक्के) सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे प्राचार्य दत्तात्रय शिंदे, प्राथमिक आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता शिंदे, प्रशालेच्या मुख्याध्यापिका रुक्मिण वाकडे यांनी अभिनंदन केले.

### नालंदा माध्यमिक आश्रम शाळा भोगांव

प्रशालेचा निकाल ९१.२० टक्के लागला. प्रथम मुंढे अथर्व शंकर (८१.६० टक्के), द्वितीय सातपुते सुप्रिया संतोष (७६.६० टक्के), तृतीय घोडके सुमित चंद्रकांत (७३.६० टक्के) सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक सचिव व रिपाइंचे प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, प्राचार्य महेशकुमार सरवदे यांनी अभिनंदन केले.

## अक्कलकोट तालुक्याचा निकाल ८५.८८ टक्के

**अक्कलकोट दि १३ मे**

दहावी परिक्षेचा अक्कलकोट तालुक्याचा निकाल ८५.८८ टक्के लागला असून यंदा देखील मुलींनीच बाजी मारल्याचे स्पष्ट झाले आहे.

यंदा तालुक्यातून दहावी परीक्षेसाठी २ हजार २४९ मुले तर १ हजार ९२३ असे एकूण ४१७२ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. यामध्ये १ हजार ८२२ मुले, १ हजार ७६१ मुली उत्तीर्ण होऊन अक्कलकोट तालुक्याचा ८५.८८ टक्के इतका निकाल लागला आहे. यामध्ये श्री शहाजी प्रशाला ८३.९०, श्रीमंत निर्मलाराजे कन्या प्रशाला ९७.७८, मंगरूळे प्रशाला ९६.९१, कल्याणशेट्टी हायस्कूल ९२.२२, श्री शारदा माता इंग्लिश मीडियम स्कूल १००, आयएमएस इंग्लिश मीडियम स्कूल १००, विद्याभारती विद्यालय १००, श्री बसवेश्वर प्रशाला ९२.५७, ग्रामीण विद्या विकास विद्यालय ७९.७२ इतका निकाल लागलेला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तालुक्यातील विविध स्तरातून अभिनंदन होत आहे. निकालानंतर त्याची प्रत मिळविण्यासाठी विविध कॉम्प्युटर सेंटर व झेरॉक्स केंद्रावर एकच गर्दी होती. उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी आनंद द्विगुणित करण्यासाठी पेढे घेण्यासाठी एकच गर्दी केली होती.

आपला
# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## पंढरपुरात आज महाराजस्व समाधान शिबीराचे आयोजन

### लाभ घेण्याचे तहसीलदार लंगुटे यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १४ मे-**

पंढरपूर महसूल विभागांतर्गत ११ मंडल स्तरावर उद्या दि. १५ मे रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान राबिवण्यात येत आहे. या शिबीरातून आवश्यक दाखले देण्यात येणार असून याचा लाभ विद्यार्थी, नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

इयत्ता दहावी व बारावी परिक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. शालेय विद्यार्थ्यांना पुढील प्रवेशासाठी आवश्यक दाखले (उदा. उत्पन्न, वय व अधिवास, जातीचा दाखला, नॉन क्रिमीलेयर दाखला व इतर दाखले देण्यासाठी तसेच नागरिकांना रहिवाशी, उत्पन्न व जातीचे दाखले देण्यासाठी पंढरपूर तालुक्यात दि.१५ मे रोजी पंढरपूर, भाळवणी, पुळूज, कासेगांव, तुंगत, भंडीशेगांव, खर्डी, चळे, रोपळे, करकंब, पटवर्धन कुरोली या महसूल मंडलाचे ठिकाणी मंडल अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी यांच्या कार्यालयात विशेष शिबीर आयोजित करण्यात येत आहे.

या मंडलातील नागरिक, विद्यार्थी यांनी आपापल्या मंडलाच्या केंद्राच्या ठिकाणी जावून लाभ घ्यावा यावेळी मंडलनिहाय महा ई सेवा केंद्र चालक यांची नेमूणक करण्यात येत आहे. तरी शालेय विद्यार्थी व नागरिकांनी गांवनिहाय महा ई सेवा केंद्र चालक यांच्याशी संपर्क साधवा असे आवाहन केले आहे.

## महत्वाचे...



### पंढरपूर नगर परिषदेच्या वतीने संभाजी महाराज यांची जयंती साजरी

**पंढरपूर, दि. १४ मे -**

येथील नगर परिषदेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीच्या निमित्त पुतळ्याचे पूजन पंढरपूर नगर परिषदेचे उपमुख्याधिकारी अँड. सुनील वाळूजकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आरोग्य अधिकारी नागनाथ तोडकर, खरेदी परीक्षक विजय शहाणे, प्रशासकीय अधिकारी रवींद्र सूर्यवंशी, जयंत पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी माजी नगरसेवक प्रशांत शिंदे, सतीश शिंदे, संदीप मुटकुळे, नागेश माळी, अमोल सर्वगोड उपस्थित होते.

### एमपीएससी परीक्षेत सुशील दरक यांची उपअभियंतापदी निवड

**गौडगांव, दि. १४ मे**

बार्शी तालुक्यातील गौडगांव येथील किराणा व्यापारी जुगल किशोर दरक यांचे सुपुत्र सुशील दरक यांनी २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र शासनाच्या उपअभियंता परीक्षेत घवघवीत यश संपादन केले.



जि. प. शाळा गौडगांव येथे प्राथमिक शिक्षण पूर्ण करुं माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण लातूर येथे पूर्ण केल्यानंतर के. के. वाघ इंजिनिअरींग कॉलेज नांदेड येथे सिव्हील इंजिनिअरींग शिक्षण पूर्ण केले. महाराष्ट्र शासनाने २०२३ मध्ये चझडउ अंतर्गत सहाय्यक अभियंता सार्वजनीक बांधकाम विभागाच्या पद भरतीसाठी घेतलेल्या परीक्षेत सुशील दरक यांनी घवघवीत यश संपादन केले. सुशील दरक यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



### सांगोला महाविद्यालयात छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी

**सांगोला,दि.१४ मे-**

सांगोला येथील सांगोला महाविद्यालयामध्ये छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मराठी विभागप्रमुख डॉ.बबन गायकवाड यांचेहस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी डॉ.बबन गायकवाड यांनी छत्रपती संभाजी महाराज हे बहुजनांसाठी कार्य करणारे राजे होते. त्यांनी सर्व जाती-धर्मांच्या लोकांना आपल्या मंत्री मंडळात घेतले होते. तसेच ते थोर साहित्यिक म्हणून ओळखले जातात. त्यांनी पश्चिम महाराष्ट्रापासून उत्तर महाराष्ट्रापर्यंत तसेच खानदेशापासून तंजावर पर्यंत राज्य स्थापन करण्यासाठी महत्वाचे योगदान दिले. आजच्या काळात छत्रपती संभाजी महाराजांच्या विचारांची गरज असून, त्यांच्या विचारांचे आचरण प्रत्येकाने करावे असे मत मनोगतात व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे नियोजन डॉ.अमोल पवार, बाबासो इंगोले यांनी केले. यावेळी प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



### कासेगावात छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी

**कासेगांव, दि.१४ मे -**

तालुक्यातील कासेगाव येथील मावळा प्रतिष्ठानच्यावतीने छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.छत्रपती संभाजी महाराज यांचा जन्म १४ मे १६५७ रोजी पुरंदर येथे झाला. मराठा साम्राज्याचे दुसरे छत्रपती होते. संभाजी महाराजांनी बुधभूषण हा संस्कृत ग्रंथ, तर नायिकाभेद, नखशीख आणी सातसतक हे ब्रज भाषेतले ग्रंथ लिहीले. संभाजी महाराज यांना लहानपणापासूनच रणांगणावरील मोहिमा आणी डावपेच यांचे बाळकडू मिळाले. छत्रपती संभाजी म हाराज यांच्या मुर्तीचे पुजन करण्यात आले व मावळा प्रतिष्ठानच्या वतीने प्रसाद वाटप करण्यात आला.

### विद्या विकास विद्यालयाचा निकाल १०० टक्के

**वैराग दि १४ मे**

येथील विद्या विकास विद्यालयचा दहावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. यामध्ये संस्कृती तोंडे ८४ टक्के , निखिल डोळे ८२ टक्के ,राजश्री घुगे ८० टक्के गुण मिळवून प्रथम,द्वितीय व तृतीय आले. यासह सर्व विद्यार्थ्यांचे भालगांव शिक्षण मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनिल घुगे, सचिव लता शिवदास सानप, मुख्याध्यापक मधुकर कराड, कर्मचारी ग्रामस्थ पालकांनी अभिनंदन केले.

## खतांची लिंकिंग केल्यास गुन्हा दाखल करणार

### कार्यशाळेत कृषी विकास अधिकाऱ्यांचा खत विक्रेत्यांना इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

बि-बियाणे, खतांची विक्री करताना जिल्ह्यातील विक्रेत्यांकडून लिंकिंगच्या प्रकारात वाढ होत आहे. खत व बी-बियाणे विक्रेत्यांनी लिंकींग केल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. शिवाय लिंकींगचा फटकाही बसत आहे. म्हणून लिंकींगसंदर्भात शेतकऱ्यांनी लेखी तक्रार दिल्यास संबंधित दुकानदारांच्या विरोधात गुन्हा दाखल करणार असल्याचा इशारा जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी हरिदास




हावळे यांनी दिला आहे. बुधवारी जिल्हा परिषदेतील यशवंतराव चव्हाण सभागृहात जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालय, जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून जिल्हास्तरीय कृषी निविष्ठा विक्रेत्यांची खरीप हंगाम पूर्व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कृषी विकास अधिकारी हावळे यांनी इशारा दिला आहे. यावेळी जिल्ह्यातील २०० पेक्षा जास्त खते, बि-बियाणे, किटकनाशक दुकानदार कार्यशाळेस उपस्थित होते.

या विक्रेत्यांना आरसीएफ कडून पॉस मशिनचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी कृषी आयुक्तालयाच्या नोडल अधिकारी तथा कृषी अधिकारी वृषाली देशमुख, उपविभागीय कृषी अधिकारी बाबासाहेब लांडगे, संजय वाकडे, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक बाळासाहेब बाबर, सागर बारवकर, लक्ष्मण वंजारी, मोहीम अधिकारी अजय वगरे यांच्यासह तालुका कृषी अधिकारी व पंचायत समितीचे कृषी अधिकारी उपस्थित होते.

दर्जेदार निविष्ठा पुरवठा करावा, लिकिंग विरहित खत पुरवठा करावा, साथी पोर्टलच्या माध्यमातून बि-बियाण्यांची विक्री करावी, खते, बि-बियाणे आणि किटकनाशक कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करुन विक्री करावी अशा सूचना कृषी विकास अधिकारी हावळे यांनी कार्यशाळेत दिल्या आहेत. अक्कलकोट पंचायत समिती कृषी अधिकारी सचिन चव्हाण यांनी आभार मानले.

### कार्यशाळेस यांनी केले मार्गदर्शन

किटकनाशके हाताळता घ्यायची काळजी विषयी महेश स्वामी , जैविक खतांचा प्रभावी वापर याविषयी सयाजी गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. जमीन आरोग्य पत्रिका आधारीत खतांच्या वापराविषयी विजय जाधव यांनी सविस्तर माहिती दिली. यावेळी वृषाली देशमुख यांनी विषमुक्त अन्ननिर्मितीकरीता निविष्ठांचा विवेकबुध्दीने वापर करण्याविषयी मार्गदर्शन केले.

## अक्कलकोटच्या लोकअदालतीमध्ये एक हजार ९६१ प्रकरणे निकाली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे-**

अक्कलकोट येथील न्यायालयात राष्ट्रीय लोकअदालतीत दाखलपूर्व व न्यायालयीन प्रलंबित अशी एकूण १९६१ प्रकरणे निकाली काढण्यात आली. तसेच विविध विभागाची सुमारे १,०२,७२,१८०/- इतक्या रकमेची तडजोड व दंड स्वरूपात वसुली करण्यात आली, अशी माहिती तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष एम. एम. कल्याणकर यांनी दिली.

राष्ट्रीय लोकअदालतीसाठी जिल्हा विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश मनोज एस. शर्मा, सचिव यु. पी. देवर्षी यांच्या मार्गदर्शनाखाली दोन पॅनलची स्थापना करण्यात आली होती. पॅनलमध्ये दिवाणी न्यायाधीश एम. एम. कल्याणकर



आणि सह दिवाणी न्यायाधीश एन.ए एल. शेख यांनी पॅनल प्रमुख म्हणून काम पाहिले. तसेच अॅड. ए. जे. घिवारे यांनी पॅनल विधीज्ञ म्हणून काम पाहिले. सदर लोकअदालीतमध्ये ८१ प्रलंबित प्रकरणे व १८८० दाखलपूर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली. लोकअदालतीमध्ये वैवाहिक हक्काची पुर्नस्थापना होवून मिळणेबाबतच्या दाव्यामध्ये विधीसेवा समितीचे अध्यक्ष एम. एम. कल्याणकर व अॅड. बोराळकर व अॅड. उडचाण यांनी समुपदेशन करुन, सदर प्रकरणामध्ये समेट घडवून आणला व पाच वर्षापासून विभक्त राहत असलेल्या दाम्पत्यांना एकत्र आणले.

लोकअदालतीमध्ये विधीज्ञ संघाचे अध्यक्ष अॅड. हल्ले, सचिव अॅड. बाके तसेच सरकारी वकील सरवदे, कांबळे, विधीज्ञ संघाचे सदस्य, अॅड. सापटणेकर, अॅड. मंगरुळे, अॅड. उडचाण, अॅड. हर्डीकर, अॅड. व्ही.बी. पाटील व इतर विधीज्ञ पंचायत समितीचे गट विस्तार अधिकारी संजय पाटील व आय. एम. पठाण तसेच अक्कलकोट न्यायालयाचे सहा अधिक्षक किशोर रणदिवे, न्यायालयीन कर्मचारी श्रीमती मादगुंडी, विशाल कांबळे, मुळे, बमचंडे, किणगी, मोरे, धनंजय यामजले, नदाफ, पठाण, बालाजी कांबळे, शहाबादे, कोनापुरे, व्हनमाने, शेख उपस्थित होते.

## संभाजी महाराजांचे चरित्र तरुणांना आदर्शवत

### संजय आवताडे : मंगळवेढा शिवजयंती मंडळातर्फे कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.१४ मे**

छत्रपती संभाजी महाराजांचे चरित्र आजच्या युगात तरुणांना आदर्शवत आहे असे मत उद्योजक संजय आवताडे यांनी व्यक्त केले ते मंगळवेढा येथील सार्वजनिक शिवजयंती सुवर्ण महोत्सव मंडळाच्या वतीने आयोजित केलेल्या छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव सोहळ्या निमित्त बोलत होते.

सुरवातीस मूर्तीची प्रतिष्ठापना संजय आवताडे यांच्या हस्ते व रामचंद्र वाकडे, दत्तात्रय जमदाडे, प्रा येताळा भगत, शशिकांत चव्हाण, सिद्धेश्वर आवताडे यांच्या उपस्थितीत करण्यात आली. यावेळी शिवालयातून निघालेल्या भगव्या पदयात्रेतून संभाजी महाराज की जय, हर हर महादेव अशा घोषणांनी परिसर दुमदुमून निघाला. यावेळी आवताडे म्हणाले, शंभूराजांनी शेवटच्या श्वासापर्यंत स्वाभिमान ठेवून स्वराज्यासाठी केलेले बलिदान कायम स्मरणात राहणारे आहे. एकही लढाई न हरणारा जगाच्या पाठीवर असणारा एकमेव राजा म्हणून संभाजी महाराज ओळखले जातात असे सांगून संभाजी महाराज जयंतीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या यावेळी जन्मोत्सवानिमित्त सर्वांना मिठाई वाटून आनंद साजरा करण्यात आला यावेळी सर्व आजी-माजी अध्यक्ष,सार्वजनिक शिवजयंती सुवर्ण महोत्सव समितीचे सर्व सदस्य,शिव शंभू भक्त उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक व सूत्रसंचालन माजी अध्यक्ष प्रा. विनायक कलुबर्मे यांनी केले.

## मंद्रूपमध्ये अवकाळी पावसाचे आगमन

### खरीप हंगाम पेरणीपूर्व मशागतीस सुरूवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मे.**

मंगळवारी दिवसभर उकाड्याने हैराण असलेल्या मंद्रूप परीसरातील शेतकरी व नागरीकांना संध्याकाळी झालेल्या अवकाळी पावसामुळे दिलासा मिळाला. शिवाय खरीप हंगामातील पेरणीपूर्व मशागतीस सुरूवात होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. मंद्रूप परीसरात मंगळवारी रात्रभर पावसाचा रिपरिप सूरू होता. त्यामुळे अनेक शेतीच्या बांधात पावसाचे पाणी साचले होते.

यावर्षी फेब्रुवारीपासूनच तापमानाचा पारा ४० अंशापर्यंत गेला होता. शिवाय मार्च महिनाअखेर व एप्रिल महिन्याच्या सुरूवातीस पारा ४४ अंशावर गेल्याने उकाड्याने नागरीक हैराण झाले होते. त्यामुळे नागरीक उकाड्यापासून बचाव करण्यासाठी कुलर, पंखा व इतर साहीत्यांचा वापर करून पावसाच्या प्रतीक्षेत होते. ८ एप्रिलपासून ऊन्हाचा पारा ४० अंशाच्या खाली आला. शिवाय अवकाळी पाऊस पडत असल्याने नागरीकांना दिलासा मिळाला आहे. मंगळवारी दुपारी अवकाळी पावसास सुरूवात झाली. अचानक आलेल्या पावसामुळे पशूपक्ष्यांसह उघडयावर राहणाऱ्या नागरीकांची तारांबळ उडाली. या अवकाळी पावसामुळे खरीप हंगामाच्या पेरणीपूर्व मशागतीस सूरूवात होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## जिल्हा परिषद पतसंस्थेच्या शिबीरात ३१ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मे-**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती, राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था क्रमांक १ चा ९१ वा वर्धापनदिन तसेच युध्दात जखमी झालेल्या जवानांसाठी घेण्यात आलेल्या शिबीरात ३१ जणांनी रक्तदान केले. प्रारंभी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन झाले. शिबीराचे उदघाटन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते झाले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप कोहीणकर, शिक्षणाधिकारी कादर शेख, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. घाडगे आदि उपस्थित होते.

### छत्रपती संभाजी महाराज जयंती व ९१ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजन




संस्थेने वर्धापन दिनाचे औचित्य साधुन शिबीर घेतले व देशासाठी युध्दात जखमी झालेल्या जवानासाठी रक्त संकलन केले हे चांगले काम असल्याचे प्रतिपादन कुलदीप जंगम यांनी केले. याप्रसंगी ३१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदात्यांचा संस्थेच्या वतीन रोप, प्रमाणपत्र व भेट वस्तु देऊन सत्कार करण्यात आला.

डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैदयकीय महाविदयालय व श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुगणालय यांचे रक्तकेंद्र प्रमुख डॉ. जयश्री विस्ते, वैदयकीय अधिक्षक डॉ. स्मिता गवळी, अधिक्षक दिपक बनाळे यांनी रक्तदान शिबीर यशस्वीपणे पार पाडले. या कार्यक्रमास पंडीत भोसले, बी. टी. मोहिते, दयानंद परिचारक, चेअरमन डॉ. एस. पी. माने , व्हा. चेअरमन सुरेश कुंभार , संचालक विष्णु पाटील, शहाजहान तांबोळी, श्रीधर कलशेटटी, तजमुल मुतवल्ली, विजयकुमार घेरडे, विशाल घोगरे, गजानन मारडकर, शिवानंद म्हमाणे, शिवाजी राठोड, किरण लालबोंद्रे, विकास शिदे चेतन वाघमारे, मृणालिनी शिंदे, स्वेता राऊत, तज्ञ संचालक श्रीशैल देशमुख, नितीन शिंदे आदी उपस्थित होते. कार्यक्रम पार पाडणेसठी विलास मसलकर, रोहित धुले, योगेश हब्बु, अमित सलगर व उमेश खंडागळे, डी. एल. देशपांडे, लेखनिक अशोक पवार, सुभाष काळे, नितीन येमुल, विनोद कदम आदिंनी परीश्रम घेतले.

## शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजच्या २१ विद्यार्थ्यांची जॉन डियर कंपनीत निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१४ मे-**

सांगोला येथील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमधील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन विभागातील २१ विद्यार्थ्यांची पुणे येथील जॉन डियर इंडिया कंपनीमध्ये निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. आर.ए.देशमुख यांनी दिली.



साक्षी माने, राजेश्वरी बाबर, साक्षी माळी, प्रतिभा घोडके, किरण पाटील, स्नेहा इंगळे, संचिता कदम, आदिती खराडे, गौरी येलपले, तेजल काशीद, अक्षदा बाबर, साक्षी माने, विजय काटकर, रोहित मराठे, हर्षल इंगवले, पृथ्वीराज गायकवाड, रितेश पासले, स्वप्निल शिंदे, अतुल गायकवाड, प्रितम भडंगे आणि प्रज्वल मोळक या विद्यार्थ्यांची निवड झाली असल्याची माहिती ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा.पी.सी.चव्हाण यांनी दिली. संस्थाध्यक्ष बाबुराव गायकवाड, सचिव अंकुशराव गायकवाड, विश्वस्त मंडळ, डॉ. आर. ए. देशमुख, प्रा. पी. सी. चव्हाण, सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. या विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन विभागप्रमुख प्रा.आनंद गायकवाड व विभागीय टीपीओ समन्वयक प्रा.ऋषिकेश गयाळी यांचे मार्गदर्शन लाभले.

## पंढरीत राष्ट्रमाता अहिल्यादेवी स्मारकाचे ३१ मे रोजी भूमिपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१४ मे -**

राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांचे पंढरपुरात भव्य स्मारक उभा करण्यासाठी पंढरपूर नगरपरिषदेकडून इंद्रप्रस्थ शॉपिंग सेंटर पाठीमागे असलेली वीस गुंठे जागा देण्यात आली आहे. राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीचे औचित्य साधून ३१ मे रोजी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते स्मारकाचे भूमिपूजन करण्यात येणार असल्याची माहिती स्मारकाचे सदस्य व भाजपचे नेते माऊली हळणवर यांनी दिली

मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे स्मारकाची मागणी धनगर समाजातर्फे करण्यात आली होती. त्यास यश आले असून नगरपरिषदेने वीस गुंठे जागा दिली आहे. राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीचे औचित्य साधून ३१ मे रोजी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते स्मारकाचे भूमिपूजन होणार आहे. यावेळी आमदार गोपीचंद पडळकर, आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक उपस्थित राहणार आहेत.